नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५५ * अंक १८० * * नागपूर * मंगळवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

खरीखरी..

## पाकडे : जन्मजात वाकडे

काल भारताच्या बहाद्दर क्रिकेटपटूंनी पाकिस्तानला चारी नव्हे, तर आठही मुंड्या चीत केलेले आहे. अंतिम सामन्यामध्ये भारताचे तीन खेळाडू पटापट बाद केले आणि आता आपण भारताला बाद करून आपणच एकमेव आबाद होणार, असा त्यांचा म्हणजेच पाकड्यांचा आत्मविश्वास वाढला होता. पण त्या स्वप्नरंजनामध्ये ते जेव्हा अखंड बुडाले होते तेव्हाच भारताच्या देशप्रेमी खेळाडूंनी विजय खेचून आणला आणि पाक नसलेल्या नापाक पाकड्यांचे मंत्री मोहसीन नकवी यांच्या हातून विजेतेपदाची सोनेरी ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. खरे तर भारताने पाक बरोबर निरंतर प्रेमाने राहायचे ठरवले होते, पण त्यांच्या म्हणजे पाकिस्तानच्या पोटातच कपट होते. कारण कबालीच्या नावावर पाकिस्तानच्या सेनेने काश्मीरवर हल्ला केला आणि नंतर तटस्थ राहणाऱ्या राजे हरिसिंग यांना भारताचे पाय धरावे लागले होते. पाकिस्तानचा हाच खोटेपणा पावलोपावली दिसतो आहे पाकड्यांचे वाकडे पंतप्रधान शरीफ भाई यांनी ऑपरेशन सिंदूरच्या वेळी आपला विजय झाला, असे संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर जाहीर करून टाकले. आधी आपण भारताची सहा विमाने पाडली असे जाहीर वक्तव्य केले होते. आता तर सहाचे सात झाले आहेत. पण त्याला हे ठाऊकच नाही की भारताशी बात करता करता आपण चित होता होता बचावलेलो आहे. भारताची लाथ पडल्याबरोबर आता पडलो तरीही त्यांची टांग वरच आहे. भारतासमोर जिंकलो अशी बतावणी करत, "अभी मारा अब फिरसे मार भला असे बोलायचे" आणि पुन्हा मारले तर पुन्हा तोंड वाकडे करून तेच बोलायचे. हाच पाकिस्तानच्या मागील अनेक लढ्यांचा इतिहास आहे. रात्री एकच्या नंतर पाकिस्तानातील अनेक दहशतवादी तळ आपण उध्वस्त केले होते. सामान्य नागरिकांना कोणताही त्रास न देता अनेक महत्त्वाच्या सैनिक तळांचाही नायनाट करून टाकला होता. १५ ऑगस्ट रोजी झालेल्या कौन बनेगा करोडपतीच्या एपिसोड मध्ये आपल्या तिन्ही दलाच्या रणरागिणी उपस्थित होत्या आणि त्यांनी अमिताभ बच्चन यांच्या प्रश्नाला उत्तर दिले आणि त्यावेळी भारतीय सैन्याच्या बहादूरीच्या ज्या काही कथा सांगितल्या. त्यामुळे प्रत्येक देशभक्ताची छाती अभिमानाने फुलून आली. त्यावेळच्या कारवाईमध्ये पाकड्यांचे बरेच हवाई अड्डे उध्वस्त झालेले आहेत आणि जे उद्ध्वस्त झालेले आहेत त्याचे दुरुस्तीही झालेली नाही. हे सत्य संपूर्ण जगासमोर आलेले आहे. मग राष्ट्रसंघाच्या बैठकीत बोलताना शरीफ किती खोटे बोलतात यावर चर्चा न केलेलीच बरे कारण शरीफांच्या खोटेपणावर सट्टा लावला असता. तर आज भारतातले किती जरी लोक करोडपती झाले असते. या शहाबाजने सिंधू नदीचे पाणी रोखले तर आम्ही भारतावर हल्ला करू अशी धमकी दिली होती. पण या शरीफी सोडलेल्या शरीफाला भारतानेच असे आव्हान दिले की, "सिंधू नदीचे पाणी रोखच बेट्या आणि त्यानंतर हल्ला करून दाखव, मग आम्ही तुला बरोबर बघतो". असे भारताने प्रती आव्हानच देऊन टाकले. सध्याच्या परिस्थितीमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प म्हणजेच येडपट आणि सनकी माणूस आहे, अशा ट्रम्प यांचे पाय धुवून त्या पाण्याला अमृत समजून पिणाऱ्या मुनीर आणि शरीफ यांच्यासाठी सौदी अरेबिया अर्थपुरवठा करणार आहे. म्हणजेच सौदी अरेबियाही साथ देणार आहे, असे म्हणतात. अरे लेको हो भारताने युद्ध थांबवावे म्हणून तुम्ही आमच्या भारताचे पाय धरलेत ही मर्दुमकी आहे की गांडूपणा आहे, हे एकदा तरी सांगून टाका. पाकिस्तानच्या या हटवादी पणाला आणि भूमिकेला आपण गेले साडेसात दशके बघत आहोत. परंतु हे पाकडे नेहमीच वाकडे असतात आणि यांचे शेपूट नेहमीच वाकडे राहणार हेच खरे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## दीनदयाल संस्थेच्या प्रकल्पांची पाहणी

### पंडित दीनदयाल सेवा प्रतिष्ठान एकात्म मानव दर्शन व अंत्योदयाचे प्रतिक : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २९ :



समाजातील गोर-गरीब, वंचित दुर्बल घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी आपले संपूर्ण जीवन वेचले. त्यांचा एकात्म मानव दर्शन व अंत्योदयाचा संदेश सर्वदूर पाहोचविण्यासाठी दीनदयाल सेवा प्रतिष्ठान हे प्रतिक ठरेल, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज काढले.

यवतमाळ येथील दीनदयाल सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती समारोहाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते. मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हसंराज अहीर, माजी आमदार मदन येरावार तसेच दीनदयाल सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष नरहर देव, पदाधिकारी ज्योती चव्हाण, डॉ. मनोज पांडे, विजय कद्रे, मनीष गंजीवाले, गजानन परसोडकर आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यवतमाळ येथील दीनदयाल सेवा प्रतिष्ठान ही जवळपास २५ वर्षांपूर्वी सुरू झालेली संस्था आज एका मोठ्या वटवृक्षाप्रमाणे विस्तारली असून, ती आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिला आणि अतिशय मागासलेल्या आदिवासी पारधी समाजाला मदतीचा हात देत आहे. या संस्थेने पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शन आणि अंत्योदय या विचारांवर आधारित समाज परिवर्तनाचं एक जीवंत उदाहरण तयार केले आहे, असे प्रतिष्ठानाच्या कार्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी यावेळी कौतूक केले.

पंडीत दीनदयाल यांनी अत्यंत खडतर जीवनातून मार्गक्रमण करीत कष्टमय जीवन जगून अभ्यासाचा ध्यास धरुन शिक्षण पूर्ण केले. सरकारी नोकरीची संधी असताना सुध्दा त्यांनी ती नाकारली. इंग्रजांची नोकरी करण्याऐवजी त्यांनी आपल्या समाजाची सेवा करण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आल्यानंतर ते पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून काम करू लागले. नंतर, जनसंघाची स्थापना झाल्यावर त्यांनी उत्तर प्रदेशचे प्रमुख, अखिल भारतीय महामंत्री आणि नंतर राष्ट्रीय अध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळली. एवढ्या मोठ्या पदांवर असतानाही त्यांच्या जीवनशैलीत कोणताही बदल न होता ते त्यागपूर्ण जीवन जगले, असे सांगत पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनप्रवासावर मुख्यमंत्र्यांनी यावेळी अनेक पैलू उलगडत प्रकाश टाकला.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या काळात जगामध्ये भांडवलशाही आणि साम्यवाद या दोन विचारसरणींचा बोलबाला होता. या दोन्ही विचारांपेक्षा वेगळा तिसरा विचार त्यांनी मांडला. भारतीय जीवन पद्धतीतच सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचं उत्तर आहे, असे पंडित दीनदयाल यांनी सांगितलं होतं. एकात्म मानव दर्शनाचं मूळ तत्त्व 'अंत्योदय' आहे, ज्याचा अर्थ समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या विकासातूनच राष्ट्राचा विकास करणे होय.

समाजातील शेवटचा दूर्बल घटक हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. राष्ट्राचा सर्वांगिण विकास करावयाचा असल्यास समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत सर्व सुविधा पोहोचल्या पाहीजे, हा विचार त्यांनी सर्वदूर पोहोचवला.

## बाहेरच्या चित्रपटांवर १०० टक्के कर

■ वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. २९ :



डोनाल्ड ट्रम्प यांची वक्रदृष्टी आता सिनेमांवर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता आणखी एक टॅरिफ बॉम्ब फोडला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलं आहे की हॉलिवूडच्या बाहेर निर्मिल्या जाणाऱ्या चित्रपटांवर १०० टक्के टॅरिफ लागणार आहे. हॉलिवूडचे चित्रपट अमेरिकेच्या बाहेर विविध देशांमध्ये शूट होत आहेत. अशातच आता ट्रम्प यांचा हा निर्णय फिल्ममेकर्सची डोकेदुखी वाढवणारा ठरला आहे. डोनाल्ड ट्रम्प त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हणाले आपल्या देशातला चित्रपट व्यवसाय दुसऱ्या देशातल्या चित्रपट व्यावसायिकांनी चोरला आहे. एखाद्या लहान मुलाच्या तोंडातून कँडी हिसकवतात तसंच हे घडलं आहे. कॅलिफोर्नियावर या सगळ्याचा गेल्या काही वर्षांपासून जास्त खोलवर परिणाम झाला आहे.

त्यामुळेच अमेरिकेच्या बाहेर तयार होणाऱ्या चित्रपटांवर मी आता १०० टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिका सोडून इतर देशांमध्ये तयार होणाऱ्या चित्रपटांवर आता १०० टक्के टॅरिफ लागणार आहे. अमेरिकेत चित्रपट व्यवसाय वेगाने संपतो आहे. त्यामुळे हा निर्णय घेतल्याशिवाय काही पर्याय उरलेला नाही. इतर देश आमच्या चित्रपट निर्मात्यांना आणि स्टुडिओजना अमेरिकेतून दूर नेण्यासाठी अनेक प्रकारची प्रोत्साहनं देत आहेत. हॉलिवूड आणि अमेरिकेतील इतर अनेक भाग उद्ध्वस्त होत आहेत. हा इतर राष्ट्रांचा एकत्रित प्रयत्न आहे.

## अहिल्यानगरात रांगोळीवरून तणाव

### सामाजिक आरोग्य बिघडवणाऱ्यांचा कारवाई : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २९ :



राज्याचे सामाजिक आरोग्य बिघडवणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगर येथील धार्मिक मुद्यावरून निर्माण झालेल्या तणावावर भाष्य करताना म्हटले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत अहिल्यानगर प्रकरणात कडक कारवाई होणार हे स्पष्ट झाले आहे.

अहिल्यानगर येथे सोमवारी आय लव्ह मोहम्मद असा उल्लेख असणारी रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीवरून दुर्गामाता दौडीचे आयोजन करण्यात आले होते. या मुद्यावरून शहरात मोठा तणाव निर्माण झाला होता. या प्रकरणी मुस्लिम समाजाने पुणे - छत्रपती संभाजीनगर महामार्ग रोखून धरला. त्यामुळे पोलिसांवर बळाचा वापर करण्याची वेळ आली. पत्रकारांनी याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना छेडले असता त्यांनी पोलिस या प्रकरणातील आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करणार असल्याचे स्पष्ट केले.

फडणवीस म्हणाले, मी एका कार्यक्रमात व प्रवासात असल्यामुळे या घटनेची संपूर्ण माहिती अजून माझ्याकडे आली नाही. सध्या माझ्याकडे केवळ प्राथमिक माहिती उपलब्ध आहे. संपूर्ण माहिती घेतल्यानंतरच मी यावर भाष्य करेन. पण अलीकडच्या काळात काहीतरी प्रयत्न होत आहे की, महाराष्ट्रात काही बोर्ड लावायचे किंवा काहीतरी करायचे. येथील सामाजिक आरोग्य बिघडवण्यामागे नेमके कोण आहे? हे आपल्याला शोधावे लागेल. ते नक्की आम्ही शोधू व त्यावर कारवाईही करू.

## राहुल गांधींना जीवे मारण्याची धमकी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २९ :

काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी २८ सप्टेंबर रोजी गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून एका टीव्ही चर्चेदरम्यान राहुल गांधींना दिलेल्या जीवे मारण्याची धमकी मिळाल्याचा उल्लेख केला होता. पत्रात म्हटले आहे की, भाजप प्रवक्त्यांविरुद्ध त्वरित कारवाई न करणे हे राहुल गांधींवरील हिंसाचारात सहभागी असल्याचे मानले जाईल.

वेणुगोपाल यांनी अमित शहा यांना लिहिले की, "ही धमकी एका छोट्या पदाधिकाऱ्याची निष्काळजीपणे दिलेली प्रतिक्रिया नाही. हे जाणूनबुजून निर्माण केलेल्या द्वेषाच्या विषारी वातावरणाचा परिणाम आहे. आता तुमचा पक्ष आणि सरकार कोणत्या विचारसरणीला पाठिंबा देते हे स्पष्ट करण्याची जबाबदारी तुमची आहे. माजी एबीव्हीपी नेते प्रिंटू महादेव म्हणाले की, राहुल गांधींच्या छातीत गोळी मारली जाईल.

## अतिवृष्टीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडून पडली : शरद पवार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २९ :



मराठवाड्यासह राज्याच्या अनेक भागांत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक पुरते हवालदिल झाले आहेत. उभ्या पिकांसह शेतातील सुपीक मातीही वाहून गेली आहे, तर अनेक ठिकाणी जनावरे दगावली आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी राज्य सरकारला राज्यातील पूरग्रस्तांना कशाप्रकारे मदत करावी, याबाबत आवाहन करत काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.

अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे, विशेषतः मराठवाड्यात सर्वाधिक फटका बसला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील रविवारी मराठवाड्यातील सात जिल्ह्यांसह सोलापूर जिल्ह्यातील पावसाच्या आणि मदतीच्या स्थितीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. तसेच अधिकारी वर्गाला महत्त्वाच्या सूचना केल्या. आता शरद पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सरकारला पाच प्रमुख सूचना केल्या आहेत.

राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टीमुळे शेतकरी व सामान्य नागरिकांचे अपरिमित नुकसान झाले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था अक्षरशः कोलमडून पडली आहे. शहरी भागांनाही याची झळ पोहोचली आहे.

## कुलदीप आशिया कपचा टॉप विकेट टेकर

■ वृत्तसंस्था, दुबई, दि. २९ :



रविवारी दुबई येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात गतविजेत्या संघाला हरवून भारताने नवव्यांदा आशिया कपचे विजेतेपद पटकावले. २० दिवसांच्या या स्पर्धेत अनेक मोठे विक्रम प्रस्थापित झाले. कुलदीप यादव आशिया कपच्या इतिहासात सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज ठरला आणि त्याने एकाच आवृत्तीत सर्वाधिक विकेट घेतल्या.

अभिषेक शर्मा टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी चेंडूत ५० षटकार मारणारा फलंदाज ठरला. स्पर्धेच्या ४१ वर्षात प्रथमच भारत आणि पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना झाला. टीम इंडिया स्पर्धेच्या इतिहासात सर्वाधिक विजय मिळवणारा संघही बनला.

भारताने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सलग आठव्यांदा पाकिस्तानला हरवले. संघाचा शेवटचा पराभव २०२२ च्या दुबईतील आशिया कपमध्ये झाला होता. तेव्हापासून, संघाने त्यांना दोनदा टी-२० विश्वचषकात आणि चार वेळा आशिया कपमध्ये पराभूत केले आहे. त्यांनी एकदिवसीय विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफी प्रत्येकी एकदा जिंकली आहे. भारताने आशिया कपमध्ये पाकिस्तानचा क्लीन स्वीप देखील पूर्ण केला. गट टप्प्यात संघाने ७ विकेट्सने, सुपर ४ मध्ये ६ विकेट्सने आणि अंतिम फेरीत ५ विकेट्सने विजय मिळवला. बहु-राष्ट्रीय स्पर्धेत पहिल्यांदाच एखाद्या चॅम्पियनने दुसऱ्या संघाला सलग तीन वेळा हरवले. १९८३ च्या विश्वचषकात चॅम्पियन भारताने वेस्ट इंडिजचा पराभव केला होता आणि २००४ च्या आशिया कपमध्ये चॅम्पियन श्रीलंकेने तीन सामन्यांमध्ये भारताचा दोनदा पराभव केला.

## विजयचे घर बॉम्बने उडवण्याची धमकी

■ वृत्तसंस्था,
तामिळनाडू, दि. २९ :

अभिनेता विजयच्या नीलंकराई येथील घरी बॉम्ब ठेवण्याची धमकी देण्यात आली आहे. रविवारी रात्री चेन्नई पोलिसांना घरात बॉम्ब ठेवल्याची माहिती देणारा फोन आला. पोलिसांनी तात्काळ अभिनेत्याच्या घराची सुरक्षा वाढवली आणि बॉम्ब शोध पथकाने झडती घेतली. तथापि, अद्याप कोणतेही स्फोटके सापडलेली नाहीत. दरम्यान, विजयच्या करूर रॅलीत झालेल्या चेंगराचेंगरीतील मृतांची संख्या ४० वर पोहोचली आहे. यामध्ये १६ महिला आणि १० मुलांचा समावेश आहे. ९५ जण जखमी झाले आहेत, त्यापैकी ५१ जण आयसीयूमध्ये आहेत.

## मोदींच्या हस्ते दिल्लीतील नवीन भाजप कार्यालयाचे उद्घाटन

■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, दि. २९ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी संध्याकाळी दिल्ली भाजपच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन केले. ते म्हणाले, "भाजपच्या स्थापनेला ४५ वर्षे पूर्ण झाली आहेत. ज्या बीजापासून आज भाजप एवढ्या मोठ्या वटवृक्षात वाढला आहे, ते ऑक्टोबर १९५१ मध्ये रोवले गेले होते. त्यावेळी डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली जनसंघाची स्थापना झाली." ते म्हणाले की, नवरात्रीच्या या शुभ दिवसांमध्ये दिल्ली भाजपला एक नवीन कार्यालय मिळाले आहे. अटलजी, अडवाणीजी, नानाजी देशमुख, मुरलीजी आणि राजमाता सिंधिया यांच्या आशीर्वादाने पक्षाची प्रगती झाली आहे.

पंतप्रधान म्हणाले की, दिल्ली जनसंघाचे नेतृत्व काळानुसार बदलत राहिले. १९८० मध्ये जेव्हा भाजपची स्थापना झाली, तेव्हा व्ही.के. मल्होत्रा दिल्ली भाजपचे पहिले अध्यक्ष झाले. आज भाजप ज्या मजबूत स्थितीत आहे, त्यामागे कार्यकर्त्यांचे बलिदान आहे. सध्याचे दिल्ली भाजप कार्यालय १४ पंत मार्ग येथे होते.

## हेरगिरीच्या आरोपाखाली तरुणाला अटक

■ वृत्तसंस्था, पलवल, दि. २९ :

हरियाणातील पलवल येथे एका तरुणाला पाकिस्तानसाठी हेरगिरी करण्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर दिल्लीतील पाकिस्तानी दूतावासातील एका कर्मचाऱ्याला भारतीय लष्करी कारवायांची माहिती पुरवल्याचा आरोप आहे.

पोलिसांचे म्हणणे आहे की, आरोपी तौफिक हा तीन वर्षांपूर्वी पाकिस्तानला गेला होता. तो ही माहिती व्हॉट्सॲपद्वारे पाकिस्तानला पाठवत असे. त्याच्या फोनवर अनेक पाकिस्तानी फोन नंबर देखील सापडले आहेत.

## मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २९ :



मुंबई, दि. २९ : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून प्रतिवर्षी ७५,००० प्रशिक्षणार्थींना ' मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमातून प्रशिक्षित करण्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने निश्चित केले आहे. ९ ऑक्टोबर २०२५ पासून राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) व १४१ शासकीय तांत्रिक विद्यालयामधून एकूण २,५०६ तुकड्या सुरू होणार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पहिल्या तुकडीचे ऑनलाईन उद्घाटन लवकरच करण्यात येणार आहे, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

मंत्री लोढा म्हणाले की, तरुणांना अल्प कालावधीत रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन उद्योगाच्या गरजेनुसार कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, युवांना कौशल्याधिष्ठित स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी महिला उमेदवार व ग्रामीण भागातील युवकांना मोठ्या प्रमाणावर कौशल्य प्रशिक्षणाची उपलब्धता करून देणे. आधुनिक तंत्रज्ञानातील नवीन व्यवसायांमध्ये महाराष्ट्राला आघाडीवर नेण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालय केंद्रांमध्ये पायाभूत सुविधांचा उपयोग करून संस्थेच्या वेळे व्यतिरिक्त वेळेत मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रम सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या अनुषंगाने प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली असून ऑनलाईन प्रवेश प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. अल्पमुदत अभ्यासक्रमांमध्ये २५ टक्के जागा संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या असून उर्वरित जागा बाह्य उमेदवारांना उपलब्ध असतील. प्रशिक्षण शुल्क रु. १००० ते ५,००० प्रति महिना इतके आकारण्यात येईल. शासनाच्या ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व १४१ शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

यामध्ये ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, एरोस्पेस स्ट्रक्चर फिटर, इंटरनेट ऑफ थिंग्ज, इलेक्ट्रिक व्हेईकल, सोलर एनर्जी, ड्रोन तंत्रज्ञान, सोशल मीडिया इन्फ्लुएंसर, सायबर सुरक्षा, आर्टिफिशियल इंटेलिजंस, ग्रीन हायड्रोजन, मोबाईल रिपेअर टेक्निशियन इत्यादी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

## बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टी आणि त्यामुळे मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगरसह इतर भागांमध्ये निर्माण झालेल्या पूर परिस्थितीमुळे बारावी बोर्डाच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी राज्य परीक्षा मंडळाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

बारावी परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर २०२५ होती. मात्र, पूरग्रस्त भागातील अनेक विद्यार्थी आणि पालकांनी अर्ज भरण्यास मुदतवाढ मिळावी यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे विनंती केली होती. या विनंतीची तातडीने दखल घेत एकनाथ शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनी करून या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत योग्य निर्णय घेण्याचे निर्देश दिले.



# 'आय लव्ह मोहम्मद'वरून अहिल्यानगरात तणाव

## रस्त्यावर रांगोळी काढल्याने मुस्लिम समाज संतप्त; दगडफेक, रास्ता रोको, लाठीचार्ज

■ **वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. २९:** अहिल्यानगर शहरात दुर्गामाता दौडच्या स्वागतासाठी रस्त्यावर काढलेल्या रांगोळीत 'आय लव्ह मोहम्मद' हे नाव लिहून त्यावरून दौड काढण्याचा प्रयत्न केल्याची घटना माळीवाडा परिसरातील बारा तोटी कारंजा येथे सोमवारी सकाळी घडली.

या घटनेमुळे मुस्लिम समाजाने आक्रमक होत कोतवाली पोलिस ठाणे गाठले. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, पोलिस ठाण्याबाहेर जमावाने निदर्शने करत धुडगूस घालण्याचा प्रयत्न केल्याने पोलिसांनी जमावावर सौम्य लाठीचार्च केला. त्यानंतर मुस्लिम समाजाच्या जमावाने कोठला परिसरात महामार्गावर रास्तारोको आंदोलन सुरू केले.

त्याला वेगळे वळण लागून काही वाहनांवर दगडफेक करण्यात आली. पोलिसांनी लाठीमार करत जमावाला पांगवले. योमुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

माहितीनुसार, सोमवारी सकाळी बारातोटी कारंजा परिसरात दुर्गा दौडच्या स्वागतासाठी फुलांची रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीत इंग्रजी अक्षरात प्रेषित पैगंबर यांचे नाव रेखाटण्यात आले होते. त्यानंतर या नावावरून दौड नेण्यासाठी व्यवस्था करून देत जाणीवपूर्वक अपमान केला, मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्याप्रकरणी आरती संग्राम रासकर व संग्राम आसाराम रासकर (रा. बारा तोटी कारंजा) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शेख अल्तमश सलीम जरीवाला यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी एकास ताब्यात घेण्यात आले आहे.

या घटनेनंतर व पोलिसांनी केलेल्या लाठीमारामुळे आक्रमक झालेला मुस्लिम समाज कोटला परिसरात महामार्गावर उतरला. जमावाने महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले. आंदोलनादरम्यान काही युवकांनी रस्त्यावरील वाहनांवर दगडफेक केल्याने आंदोलनाला वेगळे वळण लागले.

पोलिसांनी तत्काळ आंदोलकांवर लाठीमार करत जमावाला पांगवले. त्यामुळे पळापळ झाली. या घटनेमुळे कोठला परिसरात व संपूर्ण शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपअधीक्षक शिरीष वमने यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरून परिस्थिती नियंत्रणात आणली. कोठला परिसरात दगडफेक व तोडफोड प्रकरणी 22 युवकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

अहिल्यानगरचे पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या प्रकरणी एका समाजकंटकाला अटक करण्यात आल्याची माहिती दिली. मी सर्वच समाजाच्या लोकांना याद्वारे आवाहन करतो की, कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नये. अहिल्यानगर शहरात शांतता आहे. दगडफेक करणाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, असे पोलिस अधीक्षक म्हणाले.

एका मराठी वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार, कोटला गावातील दुगार्माता दौड ही संभाजी भिडे यांच्या नेतृत्वातील हिंदुस्थान शिवप्रतिष्ठानतर्फे आयोजित करण्यात आली होती. या संघटनेतर्फे नुकतीच सांगलीतही अशीच दौड आयोजित करण्यात आली होती. तिथे बोलताना भिडे यांनी नवरात्रीत दांडिया खेळणारे सर्वजण हांडगे असल्याची तिखट टीका केली होती.

### उत्तर प्रदेशच्या कानपुरातून सुरुवात

उल्लेखनीय बाब म्हणजे उत्तर प्रदेशाच्या कानपुरात सर्वप्रथम आय लव्ह मोहम्मदचे पोस्टर लावण्यात आले होते. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यानंतर त्याचे देशभरात संतप्त पडसाद उमटले. मुस्लिम समुदायाचे नागरीक या प्रकरणी ठिकठिकाणी मोर्चे काढून मशिदींवर हे पोस्टर लावत आहेत. काही ठिकाणी या प्रकरणी पोलिसांवर दगडफेक झाल्याच्याही घटना घडल्या आहेत. महाराष्ट्रातही नागपूरच्या मोमिपुरा व दिघोरी भागातील मशिदींवर आय लव्ह मोहम्मदचेच पोस्टर्स लावण्यात आले.

## वादाचे पुरात विसर्जन करून गुण्यागोविंदाने राहा...



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अहिल्यानगर येथील धार्मिक वादाचे पुरात विसर्जन करत नागरिकांना गुण्यागोविंदाने नांदण्याचे आवाहन केले आहे. एक व्यक्ती चुकला म्हणून सर्व समाज चुकला असे नाही, असेही ते या प्रकरणी म्हणालेत.

अहिल्यानगर येथे सोमवारी आय लव्ह मोहम्मद असा उल्लेख असणारी रांगोळी काढण्यात आली होती. यावरून तणाव निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी जनतेला शांततेचे आवाहन केले आहे. ते म्हणाले, कोविड असो किंवा अतिवृष्टीने आलेला पूर.. या दोन्ही प्रसंगांच्या वेळी सर्वांनी जात-धर्म विसरून मानवता धर्माला जागत एकमेकांना आधार दिला. हा एकप्रकारे निसर्गाने आपल्याला दिलेला एक मोलाचा संदेश म्हणावा लागेल. पण अशा परिस्थितीतही अहिल्यानगरमध्ये आज काही समाजकंटकांनी दोन समुदायात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला, हे अत्यंत दुर्दैवीआहे. एखादी व्यक्ती चुकली असेल तर सर्व समाजच चुकला असा त्याचा अर्थ होत नाही.

राजकीय पुनर्वसनासाठी किंवा स्वतःचा भविष्यातील मार्ग दुसऱ्या पक्षाच्या माध्यमातून सुरक्षित करण्यासाठी कुणी दोन समाजात द्वेष पसरवत असेल तर ते योग्य नाही, पण दुर्दैवाने अहिल्यानगरमध्ये हे जाणीवपूर्वक होताना दिसतंय. कुणी स्वार्थासाठी जाती-धर्मात किती वाद निर्माण केला तरी या वादाचं आपण मात्र पुरामध्ये विसर्जन करून सर्वजण गुण्यागोविंदाने एकत्र राहू.. एवढं केलं तरी आजच्या या पुराच्या वाईट प्रसंगातून चांगलं काहीतरी घडलं, असं म्हणता येईल. पोलिसांनीही कुणाच्याही दबावाखाली येऊन कुठलीही चुकीची कृती करु नये. कायद्याला अभिप्रेत असं निष्पक्ष राहून शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्याची भूमिका घ्यावी आणि नागरिकांनीही पोलिस प्रशासनाला सहकार्य करावं, ही विनंती, असे त्यांनी म्हटले आहे.

## सरकार आपल्याच मस्तीत



**मुंबई :** अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकरी मेटाकुटीस आला असताना हे सरकार त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आपल्या मस्तीत पुढे जात असल्याचा आरोप आमदार आदित्य ठाकरे यांनी सोमवारी केला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा आवाज या सरकारमध्ये कुणीही ऐकत नाही. सध्या त्यांना हेक्टरी 50 हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्यासह कर्जमुक्त करण्याची गरज आहे. पण हे सरकार त्यांचे न ऐकता आपल्याच मस्तीत पुढे जात आहे, असे ते म्हणालेत.

आदित्य ठाकरे आज दुपारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी बिहारमधील महिलांना भाजप सरकारकडून करण्यात येणाऱ्या 10 हजार रुपयांच्या मदतीसह राज्यातील शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप व राज्य सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, बिहारमध्ये लवकरच विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे मोदी सरकारने तेथील महिलांना प्रत्येकी 10 हजार रुपयाची आर्थिक मदत दिली आहे. हा पैसा दिला जात आहे त्याची पोटदुखी आम्हाला नाही. पण जे राज्य, जिथे निवडणुका नाहीत, जसे महाराष्ट्र इथे निवडणुका नाहीत, आम्ही तुम्हाला सर्वात जास्त जीएसटी देतो. महाराष्ट्रातून देशाला जाणारा जीडीपी किंवा महसूल सर्वाज जास्त आहे. पण आज मदत काही जाहीर झाली आहे का? आम्ही मागत असलेली मदत ही आमच्या हक्काची आहे. आमची हेक्टरी 50 हजारांची मागणी आहे. शेतकरी कर्जमुक्त करण्याची आमची मागणी आहे, असे ते म्हणाले.

आदित्य ठाकरे म्हणाले, आता सरकारकडून केवळ घोषणांचा पूर येत आहे. पण मदत प्रत्यक्ष वितरित व्हायला पाहिजे. ती मदत लोकांना मिळताना दिसत नाही. ब्रँडिंग काय, पक्ष किंवा सीएसआर काय किंवा इतर लोक मदत करतच राहतील. पण सरकारकडून जी ठोस मदत व्हायला पाहिजे, ती होताना दिसत नाही. सरकारने राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, कर्जमाफीची घोषणा करावी. हेक्टरी 50 हजार नुकसानभरपाईची घोषणा करा. पण हे होताना दिसत नाही. ही दुर्दैवी गोष्ट आहे. आज महाराष्ट्रात निवडणुका असत्या तर पैशांचा महापूर आला असता, पण दुर्दैवाने आज महाराष्ट्रात निवडणुका नाहीत. महाराष्ट्राच्या सरकारचा आवाज सरकारमध्ये कुणीही ऐकत नाही. सरकार आपल्या मस्तीत पुढे जात आहे.

दुसऱ्या राज्यात निवडणुका आल्यामुळे या पैशांची उधळपट्टी केली जात आहे. बिहारमध्ये गत अनेक वर्षांपासून भाजपची सत्ता आहे. पण त्यानंतरही त्यांना अशी मते विकत घ्यावी लागत आहेत, असे आदित्य ठाकरे म्हणाले. भाजपला जिथे जिंकता येत नाही किंवा जिथे त्यांचे राज्य नसते अथवा मागील 11 वर्षांत आपण काय शासन चालवले हे सांगता येत नसेल, तर अवघड आहे. सध्या या लोकांना हिंदू - मुस्लिम शिवाय दुसरे काहीही करता येत नाही. हे केवळ जातीपातीवर निवडणुका लढवतात. लोकांना 11 वर्षांत काय दिले हे तर दाखवा. अच्छे दिन आयेंगे कब? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.

# महाराष्ट्रात पुन्हा काही जिल्ह्यांना यलो अलर्ट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९:** महाराष्ट्राच्या विविध भागात शनिवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांतील काही भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान खात्याने आज राज्यात पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे.

मुसळधार पावसामुळे, जायकवाडी धरणाचे पाणी ओसंडून वाहू लागण्याची शक्यता असल्याने सोमवारी मराठवाडा भागातील काही जिल्ह्यांतील ११,५०० लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यात पुराच्या पाण्यात बुडाल्याने दोन जणांचा मृत्यू झाला.



हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, मंगळवार ३० सप्टेंबर रोजी फक्त नांदेड जिल्ह्याला यलो अलर्ट असून, बुधवार १ ऑक्टोबर रोजी रत्नागिरी, सातारा घाट, हिंगोली, नांदेड, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वाशिम जिल्ह्यात यलो अलर्ट देण्यात आला आहे. गुरुवार २ ऑक्टोबर रोजी रत्नागिरी, सातारा घाट, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा जिल्ह्यात यलो अलर्ट जारी झाला असून, शुक्रवार ३ ऑक्टोबर रोजी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाट, सातारा घाट, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यात यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**पूर्णा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा बैलगाडी मोर्चा**

परभणीत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची भरपाई देण्यासाठी परभणीतील शेतकरी आक्रमक झाला. पूर्णा तालुक्यातील शेतकऱ्यांचा बैलगाडी मोर्चा आज तहसील कार्यालयावर धडकला.

ताडकळस टी पॉइंट ते तहसील कार्यालय असा हा मोर्चा काढण्यात आला. ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये तत्काळ मदत द्यावी, अशी मागणी या मोर्चात करण्यात आली. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

### संभाजीनगरला यलो अलर्ट शाळा-महाविद्यालयांना सुट्टी

जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी 29 सप्टेंबर 2025 रोजी शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली होती. महानगरपालिका क्षेत्राबाहेरील सर्व शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्यांना ही सुट्टी लागू होती.

प्रादेशिक हवामान विभागाने जिल्ह्यात यलो अलर्ट जारी केला असून, अनेक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे. सध्या जिल्ह्यातील सर्व सिंचन प्रकल्प भरले असून नद्यांमध्ये पाण्याचा मोठा विसर्ग सुरू आहे. कोणत्याही प्रकारची दुर्घटना टाळण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

# चिकन मागितले म्हणून मुलाची हत्या

## आईने बेलण्याने मारले; डोक्यावर-छातीवर वार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९:** पालघर जिल्ह्यातील काशीपाडा येथे, एका महिलेने तिच्या ७ वर्षांच्या मुलाला चिकन मागितल्याच्या कारणावरून बेलण्याने मारहाण करून ठार मारले.



महिलेने मुलाच्या डोक्यावर, छातीवर, पाठीवर आणि चेहऱ्यावर अनेक वार केले. तिने तिच्या १० वर्षांच्या मुलीलाही मारहाण केली. दोघेही गंभीर जखमी झाले. मुलांची प्रकृती गंभीर असूनही, महिलेने त्यांना रुग्णालयात नेले नाही. मुलगा घरीच मरण पावला. आरडा-ओरड ऐकून शेजारी घरी आले आणि त्यांना मुलगा जमिनीवर चादरीने झाकलेला आढळला. चौकशी केल्यावर, आईने सांगितले की तिचा मुलगा कावीळमुळे मरण पावला आहे. एका शेजाऱ्याला संशय आला आणि त्याने चादर उचलली, ज्यामध्ये त्याच्या छातीवर, पाठीवर आणि चेहऱ्यावर अनेक जखमा आढळल्या. त्यानंतर त्यांनी पोलिसांना कळवले.

त्यानंतर स्थानिक पोलिस, गुन्हे शाखा आणि इतर अधिकारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी आरोपी महिलेला अटक केली आणि हल्ल्यात वापरलेले बेलणे जप्त केले. पल्लवी घुमडे (४०) असे या महिलेचे नाव आहे.

प्राथमिक तपासात असे दिसून आले की, ही महिला तिच्या पतीपासून वेगळी राहत होती. ती तिच्या दोन मुलांसह आणि दोन बहिणींसह काशीपाडा परिसरातील एका फ्लॅटमध्ये राहत होती. तिने पोलिसांकडे असा दावाही केला आहे की तिचा मुलगा आजाराने मरण पावला.

तथापि, तिच्या जखमी १० वर्षांच्या मुलीने चौकशीदरम्यान सांगितले की तिच्या भावाने तिच्या आईला चिकन शिजवण्यास सांगितले होते. त्यामुळे संतापलेल्या तिच्या आईने त्याला मारहाण केली आणि नंतर तिलाही बेलण्याने मारले. जखमी मुलीला उपचारासाठी स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. नंतर, तिला संरक्षण आणि काळजीसाठी अनाथाश्रमात पाठवण्यात आले.

# मुख्यमंत्री असताना तुम्ही किती मदत केली?

## प्रफुल्ल पटेलांचा ठाकरेंना सवाल : संजय राऊतांनी दिले प्रत्युत्तर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २९:** राज्यातील पूरस्थितीवरून राजकारण तापले असून, आता सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मदतीवरून जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधत, मुख्यमंत्री असताना त्यांनी नैसर्गिक आपत्तीत किती मदत केली? असा सवाल केला आहे. यावर ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनीही त्यांच्या शैलीत प्रफुल्लल पटेल यांना प्रत्युत्तर दिले आहे.



मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी किती मदत केली? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी केला. उद्धव ठाकरे आज विरोधात आहेत. त्यामुळे ते काहीही बोलू शकतात.

ठाकरे जेव्हा मुख्यमंत्री होते, तेव्हाही अनेक नैसर्गिक आपत्ती आल्या. त्यावेळी त्यांनी मदतीचे किती हात समोर केले, हे आपल्या सगळ्यांना माहीत आहे, असे ते म्हणाले. तसेच आमचे सरकार शंभर टक्के दिलासा दिल्याशिवाय राहणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

**संजय राऊत काय म्हणाले?**

प्रफुल्ल पटेल यांच्या टीकेला संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांना किती मदत केली, हे प्रफुल्ल पटेल यांना चांगले माहित असायला हवे.

तेव्हा त्यांचा पक्ष सत्तेत सहभागी होता. त्यावेळी पहिल्याच कॅबिनेट बैठकीत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी केली होती. हे पटेल यांना माहिती नसले तर त्यांनी विड्या वळत बसावे. त्यांचा तो खानदानी मोठा व्यवसाय आहे.

आपण त्यांचा अपमान करत नाही, पण हे त्यांना माहिती असायला हवे. उद्धव ठाकरे यांनी केलेल्या कर्जमाफीची आजही शेतकरी आठवण काढत आहेत, आम्हाला तशीच कर्जमाफी द्या, अशी त्यांची मागणी आहे.

हे पटेल यांना माहिती नसेल तर ते कोणत्या जगात वावरत आहेत, गेल्या पाच वर्षांतील राज्यातील राजकारणाची त्यांना माहिती आहे काय? असा सवालही त्यांनी केला.

# राजा ढाले यांचे धम्म चळवळीतले योगदान



भारताच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात अनेक क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वांनी आपला ठसा उमटवला आहे. त्यात राजा ढाले हे नाव विशेषत्वाने घेण्यात येते. कारण त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांची मशाल हातात घेतली आणि धम्म चळवळीत नवा आत्मविश्वास निर्माण केला.

समाजव्यवस्थेत शतकानुशतकं पसरलेल्या जात-अन्याय, विषमता आणि अमानवीय परंपरांविरुद्ध उभं राहण्याचं साहस दाखवणाऱ्या काही थोर व्यक्तींमध्ये राजा ढाले हे नाव सदैव अग्रक्रमाने घेतलं जाईल. ते केवळ एक विचारवंत, लेखक, कवी किंवा पत्रकार नव्हते; तर ते समाजमनाला हादरे देणारे, आत्मसन्मानाची जाज्वल्य जाणीव करून देणारे आणि बाबासाहेबांच्या धम्म चळवळीचे प्रखर वाहक होते.

जातिव्यवस्था ही भारतीय समाजाच्या विकासाला लागलेली गंज आहे. या व्यवस्थेविरुद्ध बोलण्याचं धाडस प्रत्येकाला होत नाही. पण राजा ढाले यांनी आपल्या लेखणीतून आणि संघर्षातून हा आवाज बुलंद केला. राजा ढाले यांनी १९७२ मध्ये स्थापन झालेल्या दलित पँथर संघटनेच्या माध्यमातून वंचित समाजाला हक्क आणि स्वाभिमानाची नवी भाषा दिली व चळवळ उभारून त्यांनी शोषित समाजात आत्मसन्मानाची ठिणगी पेटवली. तेव्हा ते तरुण होते; पण त्यांच्यातील प्रखर अस्मिता, जाज्वल्य आत्मसन्मान आणि अढळ धैर्याने संपूर्ण समाजात जागृती निर्माण केली. बाबासाहेबांनी दिलेला संदेश की शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.. हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवला.



**प्रविण बागडे**
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

राजा ढाले यांना नेहमीच बाबासाहेब आंबेडकर हे प्रेरणास्थान होते. आंबेडकरांनी दाखवलेला समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा मार्ग त्यांनी आयुष्यभर आपल्या कार्यातून जपला. ढाले यांच्यासाठी बुद्धांचे धम्म म्हणजे केवळ धार्मिक आचार नव्हता, तर तो सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांचा लढा होता.

राजा ढाले यांचे लेखन व भाषणांतून नेहमीच धम्म मार्गाचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यांनी बुद्धांच्या करुणा, समता आणि मैत्रीच्या तत्त्वज्ञानाला सामाजिक क्रांतीचे अधिष्ठान मानले. त्यांचा ठाम विश्वास होता की खऱ्या अर्थाने मनुष्याची मुक्ती फक्त धम्माच्या मार्गानेच शक्य आहे. म्हणूनच त्यांनी आयुष्यभर जातिभेद, अंधश्रद्धा, असमानता याविरुद्ध आवाज उठवला आणि समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा झेंडा उंचावला.

पत्रकार, लेखक, विचारवंत म्हणून ढाले यांचे योगदान विलक्षण होते. त्यांनी सत्य मांडताना कधीही घाबरले नाही. त्यांच्या शब्दांत धार होती, त्यांच्या भूमिकेत ठामपणा होता.

अन्यायाविरुद्ध उभं राहणं, अंधश्रद्धा फोडणं, आणि दुर्बलांच्या हक्कांसाठी झगडणं हेच त्यांचं जीवनकार्य ठरलं. राजा ढाले यांचे आयुष्य म्हणजे संघर्षाचा प्रवास होता. ते संघर्ष फक्त वैयक्तिक नव्हता, तर लाखो-करोडो दलित, शोषित, पीडितांसाठी होता. त्यांच्या अस्तित्वामुळे अनेकांना स्वतःच्या माणुसकीची किंमत कळली. अन्याय, अपमान, भेदभाव यांना न घाबरता लढणं म्हणजे काय, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिलं.

ढाले यांनी धम्म चळवळीला केवळ परंपरा म्हणून न जपत, तर एक जीवंत क्रांती म्हणून पुढे नेलं. त्यांनी दाखवलं की बुद्धांचा धम्म हा फक्त पूजाघरातला विषय नाही, तर तो समाज परिवर्तनाचं अधिष्ठान आहे. धम्म चळवळ ही केवळ बौद्ध धर्माची परंपरा नाही, तर ती सामाजिक परिवर्तनाची लढाई आहे. या लढाईला दिशा देणारे राजा ढाले होते. बाबासाहेबांच्या विचारांना त्यांनी नवी धार दिली, त्यात क्रांतिकारकता आणली. त्यांच्या कार्यामुळे धम्म चळवळीत नवा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांच्या विचारांनी असंख्य तरुणांना प्रेरणा दिली आणि धम्माच्या मार्गाकडे वळवलं.

आज राजा ढाले आपल्यात नाहीत, पण त्यांचे विचार, त्यांचा संघर्ष आणि त्यांची ओजस्वी परंपरा आपल्याला सतत मार्गदर्शक ठरेल. धम्म चळवळीतला त्यांचा ठसा कायमचा अविस्मरणीय आहे.

त्यांनी दाखवलेला आत्मसन्मानाचा मार्ग आणि बाबासाहेबांच्या तत्त्वांचा वारसा पुढे नेणं हीच खरी त्यांना दिलेली श्रद्धांजली ठरेल. समता, न्याय आणि धम्माचा संदेश जगभर पोहोचवणाऱ्या थोर विचारवंत राजा ढाले यांना जयंतीनिमित्त मानाचा मुजरा!

■ ■ ■

# एसटीच्या ३४ आगार प्रमुखांवर होणार कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २९:** राज्यात परतीच्या पावसामुळे अतिवृष्टीचे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा गंभीर परिस्थितीमध्ये आपल्या मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असताना देखील एस टी महामंडळाच्या 251 पैकी 34 आगारातील आगरप्रमुख हे आपल्या कर्तव्यावर हजर नसल्याचे एका गोपनीय अहवालामध्ये निष्पन्न झाले आहे.

ही अत्यंत गंभीर बाब असून, बेजबाबदार वर्तन करुन आपल्या कर्तव्यात हलगर्जीपणा दाखवणाऱ्या आगारप्रमुखांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, असे निर्देश राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सोमवारी एसटी प्रशासनाला दिले. अशा प्रकारचे बेजबाबदार वर्तन भविष्यात खपवून घेतले जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.



प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यात गेल्या काही दिवसापासून परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. विशेषतः मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक रस्ते बंद आहेत. पुलावर पाणी आले आहे. अशा परिस्थितीमध्ये एसटीची वाहतूक अनेक ठिकाणी ठप्प झाली आहे. अनेक प्रवासी बसस्थानकावर अडकून पडले आहेत. अशा गंभीर परिस्थितीमध्ये आपल्या मुख्यालयात हजर राहून आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडण्याऐवजी काही आगार प्रमुख कर्तव्यावर गैरहजर असल्याचे दिसून आले आहे.

या आगारप्रमुखांनी बेजबाबदार वर्तन केले आहे. आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या आगारप्रमुखांना संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कारणे दाखवा नोटीस तातडीने बजावली पाहिजे. त्यामध्ये त्यांचा खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्यावर प्रमादीय कारवाई करण्यात येईल.

# पुरुषांच्या कार्यक्षेत्रातही महिलांनी आज आपले वर्चस्व केले आहे सिद्ध

**एसपी अर्चित चांडक यांचे प्रतिपादन ✦ आरडीजी महाविद्यालयात उद्घाटन**



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २९ :

आज प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत. परिश्रमपूर्वक अभ्यासू वृत्ती ठेवत प्रयत्नांची पराकाष्ठा करत असतानाचे चित्र महिलांमध्ये पहावयास मिळत आहे. आजवर म्हणवल्या जाणाऱ्या पुरुषांच्या कार्यक्षेत्रात देखील महिलांनी आपले वर्चस्व सिद्ध केले आहे, असे प्रतिपादन पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले. श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयात शुक्रवारी शारदोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून चांडक बोलत होते. भारतीय सेवा सदनचे अध्यक्ष दिलीपराज गोयनका अध्यक्षस्थानी होते. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. चारुशीला रूमाले, उपप्राचार्य डॉ. अंबादास पांडे, उपप्राचार्य प्रा. परिमल मुजुमदार, प्रा. शीतल चांडक उपस्थित होते. प्रा. मितुश्री देशमुख यांनी चांडक यांचा परिचय करून दिला. पोलिस अधीक्षक चांडक यांनी अनुभव कथन करताना सांगितले की, 'सहजासहजी यश कधीच मिळत नाही, त्यासाठी काही प्रमाणात अपयशाला सामोरे जावेच लागते. अशावेळी ध्येयनिश्चिती व मनाशी केलेला निर्धार पूर्णत्वास नेण्यासाठी व यशश्री खेचून आणण्यासाठी कठीण परिश्रम व अभ्यास केल्यास यश हमखास मिळते. वर्तमान स्थितीत असे काही महिला कार्यक्षेत्र आहेत की जेथे पुरुष वर्ग पोहोचू शकला नाही, परंतु तेथे स्त्रिया पोहोचल्या आहेत आणि पुरुषांच्या कार्यक्षेत्रातदेखील आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. दिलीपराज गोयनका विद्यार्थिनींना संबोधित करताना म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थिनीने अभ्यास करून आत्मनिर्भरतेची कास धरावी, विविध कौशल्ये आत्मसात करावी, जेणेकरून आर्थिक स्थैर्य निर्माण होईल. यासाठी आपल्या महाविद्यालयात विविध कौशल्याधारित कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत, ज्याचा लाभ त्यांनी आवर्जून घ्यावा. कठोर परिश्रम केल्याशिवाय काही साध्य होणे अशक्य आहे, जे काही मिळवायचे आहे त्यासाठी इच्छाशक्तीचा जागर करावाच लागेल. प्राचार्य डॉ. चारुशीला रुमाले यांनी स्वागतपर भाषण केले. सोबतच त्या म्हणाल्या, शारदीय नवरात्रौत्सव हे चैतन्य निर्माण करणारे आनंदी पर्व आहे. प्रत्येक दिवस हा देवीच्या अवताराशी संबंधित आहे.

हा उत्सव शक्ती प्रदान करणारा असून, यशोशिखर गाठण्यास मार्गदर्शक ठरतो. शारदीय नवरात्र स्त्रीशक्तीचा सन्मान करणारा तसेच सकारात्मक भावना निर्माण करणारा उत्सव मानला जातो. जिद्द, चिकाटी, परिश्रम आदी बाबींविषयी त्यांनी विद्यार्थिनींना उद्बोधन केले. सूत्रसंचालन डॉ. निभा उपाध्याय यांनी केले. प्रा. गणेश टाके यांनी आभार मानले. कार्यक्रमाला बहुसंख्येने महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

आरडीजी महिला महाविद्यालयात शारदोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

विविध स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्र वाटप यांप्रसंगी विविध स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. त्यात पाकला स्पर्धेत अनुक्रमे निकिता वाहुरवाघ, अनुष्का घुटे, मेहर अंजुम, रांगोळी स्पर्धेत मोहिनी विश्वकर्मा, नम्रता वरठी, पूजा थाळी सजावट स्पर्धेत आचल मुरूमकार, गौरी ढगवाल यांचा समावेश होता. प्रा. अर्चना अंभोरे, संस्कृती गवई व विद्यार्थिनींनी गीत गायन केले. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत एनसीसीच्या विद्यार्थिनींनी गरब्याचे सादरीकरण केले.

# सैनिकांचा त्याग समाजासाठी आदर्शवत जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

**शौर्य दिन उत्साहात साजरा**




■ महासागर प्रतिनिधी वाशिम, दि. २९ :

देशाच्या सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या सैनिकांमुळे देश सुरक्षित व सक्षमपणे वाटचाल करत आहे. जिल्हा प्रशासन माजी सैनिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी कटीबद्ध आहे आणि त्यांची सेवा, त्याग सदैव स्मरणात ठेवली जाईल. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विश्वनाथ घुगे, कल्याण संघटक संजय यलमर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या शौर्य दिनाच्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्री . कुंभेजकर बोलत होते. जिल्हा सैनिक कार्यालयाच्या वतीने, दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी शौर्य दिनाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय सैन्य दलाने दि. २९ सप्टेंबर २०१६ रोजी पाकिस्तान हद्दीत शिरून सर्जिकल स्ट्राईकद्वारे अतिरेक्यांचा खात्मा केला होता.भारतीय सैन्याची अभिमानास्पद कामगिरी जनतेपर्यंत व्यापक प्रमाणात पोहचविण्यासाठी दरवर्षी शौर्यदिन साजरा करण्यात येतो.

यानिमित्ताने माजी सैनिक, शहिद जवानांच्या विरपत्नी, विरमाता, वीरपिता आणि शौर्य पदकधारकांचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कोमल नवघरे यांना सदनिका खरेदी करीता दीड लक्ष रुपयांचा धनादेश जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

.कुंभेजकर यांनी शहिदांच्या स्मृतीचिन्हास पुष्पहार अर्पण केला व शहिदांना सामुहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी भारत पाकिस्तान युध्दात १२ सप्टेंबर १९६५ रोजी शहिद झालेले शिपाई यशवंत सरकटे यांच्या विरपत्नी शांताबाई सरकटे व जम्मु कश्मिरमध्ये आतंकवादयाविरुद्धच्या ऑपरेशन मोहिमेत ११ डिसेंबर १९९४ रोजी आर्टिलरी रेजीमेंटचे शहिद झालेले शिपाई दगडु लहाने यांच्या विरपत्नी श्रीमती पार्वतीबाई लहाने ,श्रीमती वैशाली अमोल गोरे,वीरपत्नी मिराबाई भोगराज नागुलकर यांचा शाल व श्रीफळ देवून मान्यवरांच्या हस्ते सत्कार सन्मान करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील वरिष्ठ लिपीक शिवशंकर झाडोकार, कल्याण संघटक संजय यलमर, लिपिक माणिक इंगळे व विष्णू घुगे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारीवृंद, माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, माजी सैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# बोल घेवड्या सरकारचे वेळकाढू धोरण ५० हजारांची तत्काळ मदत द्या : ठाकरे

**अतिवृष्टीने झालेल्या पीक नुकसानीची कॉंग्रेस समितीकडून मूर्तिजापूर येथे केली पाहणी**



■ महासागर प्रतिनिधी मूर्तिजापूर, दि. २९ :

अतिवृष्टीने महाराष्ट्रात थैमान घातले असून विदर्भात देखील याचा फटका बसलेला आहे. शेतकऱ्यांना शासनाने ५० हजार हेक्टरी मदत द्यावी. नदीकाठी खरडून गेलेल्या शेतजमिनीकरिता हेक्?टरी एक लाख मदत द्यावी, या मागणी संदर्भात, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याकरिता शासनाचे लक्ष वेधण्याकरिता कॉंग्रेसच्या वतीने वेगवेगळ्या समित्या स्थापन करून अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांची पाहणी दौरा आयोजित करून केली जात आहे.

तालुक्यातील पिकांचे झालेले नुकसान पाहण्याकरिता प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या वतीने स्थापन केलेल्या समितीचे समिती प्रमुख माजी मंत्री माणिकराव ठाकरे व त्यांच्यासोबत समितीचे सदस्यगण यांनी लाखपुरी जिल्हा परिषद सर्कल मधील दातवी, लाखपुरी,शेलू बोंडे,मंगरुळ कांबे, भेटोरी या गावातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसान पाहणी करून शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या. त्यानंतर रविवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास येथील शासकीय विश्रामगृहावर घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्येह माजी मंत्री माणिकराव ठाकरे यांनी या नुकसानीबाबत आणि कॉंग्रेसच्या धोरणाबाबत माहिती दिली. शासनाने शेतकऱ्यांना ५० हजार हेक्टरी मदत द्यावी, नदीकाठच्या खरडून गेलेल्या जमिनींकरिता एक लाख नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली. शासन हे खोटे बोलणारे असून, बोल घेवडे सरकार वेळ काढून धोरण अवलंब करत असल्याचा आरोप त्यांनी केला. सरकार हे उद्योगपतींना मदत करणारे सरकार असून, विमा कंपन्या या त्यांच्या मित्रांच्याच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. मदत मिळणार नाही अशी परिस्थिती असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील अहवाल प्रदेश कॉंग्रेस कमिटीकडे देण्यात येईल आणि त्यानंतर राज्यपालांकडे समिती जाणार असून, शेतकऱ्यांना वाढीव मदत देण्याबाबत राज्यपाल यांच्याशी चर्चा करणार आहे. शासनाने शेतकऱ्यांना मदत दिली नाही तर कॉंग्रेस रस्त्यावर उतरणार असेही त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी माजी आमदार वीरेंद्र जगताप,यवतमाळचे अशोक बोबडे अकोल्याचे अविनाश देशमुख,अतुल अमानकर, मूर्तिजापूर येथील राजू जोगदंड,सोहेल शेख, अशोक दुबे,विनायक कावरे, बंडूभाऊ डाखोरे,गनिभाई अजमिरी,अनंता पांडे,सगीरभाई, इरफान डालेवाले आदींची उपस्थिती होती.

# बोटांवर संगणक भाषा शिकताहेत चिमुकले

**बायनरी कोड शिकवणारी जिल्ह्यातील कदमापूरची पहिली शाळा**



■ महासागर प्रतिनिधी , खामगाव, दि. २९

तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, कदमापूर येथील चौथीतील विद्यार्थी संगणकाच्या बायनरी भाषेचा गूढ कोड आपल्या बोटांवर मोजत शिकत असून, त्याचा वापर करून कोणताही कोड तयार करणे आता त्यांच्यासाठी अगदी सहजसोपे होत आहे. २१ व्या शतकात जगण्यासाठी आवश्यक जीवनकौशल्ये, गणितीय मॉडेलिंग आणि संगणकीय विचार पद्धती विद्यार्थ्यांमध्ये रुजाव्यात, त्यांचा तार्किक विकास व्हावा, या उद्देशाने शाळेचे शिक्षक राजेश कोगदे हा अनोखा उपक्रम राबवत आहेत. बायनरी कोड(द्विमान पद्धती )ही संगणकाची मूलभूत भाषा असल्याचे विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांनी ती गणिताशी जोडली. त्यातून बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार या क्रिया विद्यार्थ्यांना सहज व आनंददायी पद्धतीने करत आहेत. या उपक्रमामुळे मुलांच्या मनातील गणिताविषयीची भीती दूर झाली. अवघड वाटणाऱ्या संकल्पना खेळता-खेळता आत्मसात होऊ लागल्या.

बायनरी पद्धतीतून अंकांची मांडणी करताना विद्यार्थ्यांची केवळ गणितीयच नव्हे तर तार्किक व विश्लेषणात्मक विचारसरणी विकसित होत आहे.

ग्रामीण भागातील मुले तंत्रज्ञानात मागे नाहीत भकदमापूरसारख्या ग्रामीण भागातील मुलांना संगणकीय विचार व कोडिंगच्या जगाशी ओळख करून देणारी ही पद्धत प्रेरणादायी ठरत आहे.

शिक्षकाच्या सर्जनशीलतेमुळे विद्यार्थ्यांनी डिजिटल जगाची? काळात नवनवीन कौशल्ये आत्मसात करण्याची गरज अधोरेखित होत असताना, कदमापूरच्या शाळेने दाखवून दिले की, योग्य मार्गदर्शन, कल्पकता आणि सकारात्मक दृष्टीकोन असेल तर ग्रामीण भागातील मुलंही तंत्रज्ञानाच्या शर्यतीत मागे नाहीत. -रवीद्रखेके, केंद्रप्रमुख, पळशी बु. बोटावर कोडींग शिकणारे कदमापूर जिल्हा परिषद शाळेतील चिमुकले .

# पेनटाकळी प्रकल्प ९६ टक्के भरला दरवाजे २० सेंटिमीटरने उघडले



■ महासागर प्रतिनिधी पेनटाकळी, दि. २९ :

संततधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक वाढल्यामुळे पेनटाकळी प्रकल्प ९६ टक्के भरला आहे. त्यामुळे प्रकल्पाचे पाच वक्रद्वार दरवाजे २० सेंटिमीटरने उघडण्यात आले आहेत.यापुढेही दमदार पाऊस सुरूच राहिला तर हे धरण तुडूंब भरेल.

पेनटाकळी धरणावरून चिखली शहराला पाणीपुरवठा होत असतो. या धरणाचा जलसाठा यापूर्वीच भरला असून गेल्या दोन दिवसाच्या पावसामुळे या धरणाचा मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.

या धरणावरून बुलडाणा शहरालाही दोन वेगवेगळ्या योजनेंतर्गत बुलडाणा शहरालही पाणीटंचाई भासली होती. त्यावेळी या धरणातूनच पाणीपुरवठा करण्यात आला होता. पेनटाकळी प्रकल्पातील पाण्यामुळे होणाऱ्या नुकसानीबाबत निधी उपलब्ध करून देण्यात आला होता.

# मोफत एंटी रेबीज लसीकरण शिबिर

■ महासागर प्रतिनिधी वर्धा, दि. २९ :

जागतिक रेबीज दिन तसेच सेवा पंधरवाड्याच्या निमित्ताने सोमवार २९ सप्टेंबर रोजी जिल्हा पशु वैद्यकीय सर्व चिकित्सालय शिवाजी चौक येथे सकाळी ९ ते १२ च्या दरम्यान मोफत रेबीज लसीकरण शिबराचे आयोजन स्थानिक पीपल फॉर एनिमल्स वर्धा व पशुसंवर्धन विभाग वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. यावेळी पशु पक्षी औषधालय शिवाजी चौक वर्धा यांचे मार्फत शिबिरात सहभागी होणाऱ्या सर्व श्वान व मांजरी करिता मोफत खाद्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रेबीज बाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

श्वान व पाळीव प्राणी यांच्या नोंदणीकरिता आवश्यक मार्गदर्शन करण्यात येईल असे पीपल फॉर एनिमल्स चे प्रमुख आशिष गोस्वामी यांनी कळिवले आहे.

# सुकळीच्या शाळेने पथनाट्यातून दिला प्लास्टिक मुक्तीचा संदेश




■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २९ :

स्वच्छता पंधरवड्यांतर्गत सुकळी येथील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी रॅली काढली. या वेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या स्वच्छता संदेशाच्या घोषणांनी सारा आसमंत दुमदुमला. दरम्यान, गावातील प्रमुख चौकात विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे उत्कृष्ट सादरीकरण करून प्लास्टिक मुक्तीसाठी जनजागृती केली. या वेळी नागरिकांना स्वच्छता व प्लास्टिक मुक्तीची शपथ देण्यात आली. १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन केले असून, शाळेत विविध उपक्रम राबवले जात आहेत. शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत राज्यातील शाळांत १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान स्वच्छता पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. त्यानुसार सुकळी येथील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने शनिवारी (ता. २७ ) गावातून स्वच्छताविषयी जनजागृतीसाठी रॅली काढण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांच्या स्वच्छता संदेशाच्या घोषणांनी परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधले. रॅलीतील विद्यार्थ्यांच्या हातातील स्वच्छता व प्लास्टिक मुक्तीच्या घोषणांचे फलक लक्षवेधक ठरले. चिमुकल्यांची महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी गाडगेबाबा यांची वेशभूषा करून नागरिकांना या महान विभुतींनी दिलेल्या स्वच्छतेच्या संदेशाची पुन्हा एकदा आठवण करून दिली. दरम्यान, गावातील प्रमुख चौकात विद्यार्थ्यांनी विविध पथनाट्याचे उत्कृष्ट सादरीकरण करून प्लास्टिक मुक्तीचा संदेश दिला. या वेळी पथनाट्य पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांच्या कलेची प्रशंसा करत नागरिकांना देखील या वेळी स्वच्छता व प्लास्टिक मुक्तीची शपथ घेतली.

या वेळी स्वच्छता रॅलीत सरपंच राजू गजभिये, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुणवंत बोरकर यांच्यासह नागरिक, विद्यार्थी व शिक्षक यांनी उपस्थिती दर्शवून सहभाग नोंदवला. स्वच्छता पंधरवडा यशस्वी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांच्या आदेशानुसार उच्च श्रेणी मुख्याध्यापक निखिल सवाई यांच्या मार्गदर्शनात शिक्षक गणेश ठाकरे, शकिला पटेल, सविता शिरभाते, सारिका शिरपुरे, रूपाली सोनखासकर, ज्योत्स्ना गुल्हाने, रश्मी खाडे, संजय थोरात, विनायक लकडे, सारिका काळे यांच्यासह शालेय पोषण आहार कर्मचारी शीला बाहेकर, जया राऊत व आशा बोरकर हे परिश्रम घेत आहेत. १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन केले असून, शाळेत स्वच्छता पंधरवड्याच्या दिनदर्शिकेनुसार प्रत्येक दिवशी विविध उपक्रम राबवण्यात येत आहे. त्यानुसार पहिला दिवस विद्यार्थी व शिक्षक यांना स्वच्छतेची शपथ दिवस म्हणून पाळला. त्यानंतर स्वच्छता जनजागृती दिवस, ग्रीन स्कूल दिन, समुदाय परिसरातील भेट दिवस, हात धुणे दिवस, स्वच्छता सहभाग दिन, वैयक्तिक स्वच्छता दिन, स्वच्छता शाळा प्रदर्शन दिन, स्वच्छता कृती आराखडा दिवस आदी उपक्रम घेण्यात आले. मंगळवारी (दि. ३०) पारितोषिक वितरण दिनाने या पंधरवड्याची सांगता होणार आहे. ३० सप्टेंबरपर्यंत प्रत्येक दिवशी स्वच्छतेचे वेगवेगळे उपक्रम.


**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 082 / 2025–26**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website **https://eprocurement.mahagenco.in.**

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0599 CHP1 | 3000061948 | WORK OF DESIGN, SUPPLY, ERECTION, COMMISSIONING AND UPGRADATION OF COMPLETE ELECTRICAL SYSTEM FOR DRIVE UNITS OF BELT CONVEYOR 3A & 3B AND BELT CONVEYOR 4A, 4B, 4C & 4D AT CHP-1 (4 X 210MW), KHAPERKHEDATPS. | 193.81 |
| TN0602 BM1 Refloated | 3000062014 | WORK OF RADIOGRAPHY OF HP WELD JOINTS AND NDT DURINGAOH & SHUT DOWN IN 4 X 210 MW UNIT. | 25.11 |
| TN0603 WTP1 Refloated | 3000062046 | WORK FOR LUBRICANT AND HYDRAULIC OIL ANALYSIS FOR VARIOUSAUXILIARIESAT KHAPERKHEDATPS. | 31.16 |
| TN0604 AHP1 Refloated | 3000061896 | PROCUREMENT OF RCW HEADERS AND SCALLOPED BARS FOR UNIT 1 AOH OF BAH. | 6.09 |
| TN0605 CM1 | 3000062041 | WORK OF FENCING, CONCRETE PLATFORM AND ROAD CONSTRUCTION AT SULPHURIC ACID TANK FOR U # 1 & 2 AND FOR U # 3 & 4 AT 4 X 210 MW, TPS, KHAPERKHEDA. | 30.15 |
| TN606 C&I1 | 3000062053 | WORK OF SERVICING & MAINTENANCE OF COAL MILL REJECT GATE POWER CYLINDER FOR UNIT 1 TO 4 OF 210 MW KHAPERKHEDATPS ON AS & WHEN REQUIRED BASIS. | 11.36 |

**Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.**

**Sd /-**
**Chief Engineer (O&M)**
**MSPGCL, TPS Khaperkheda**



**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

Offers in Two Bid system are invited from reputed Agencies / Suppliers / Manufacturers for Supply of Kit-Kats (Top & Base) under Nagpur Rural Circle, Nagpur. The Tender documents for **e-Tender No. SE/NRC/Tech/2025-26/T-06** amounting **Rs. 50.00 lakhs** is available on **website https://etender.mahadiscom.in/eatApp/..** The Cost of tender is **Rs.5900/-** including GST to be paid online. Submit the tender duly filled in on or before **07th Oct 2025 before 15.00 Hrs.** The Tender documents can be downloaded from aforesaid website from **30th Sept 2025.** If any change in the tender documents/schedule the same will be displayed on MSEDCL website only.

**NZPR NO 117/2025**

**SUPERINTENDING ENGINEER, NAGPUR RURAL CIRCLE**



प्रोसेस फी रु.

जाहीर नोटीस

ठाणे येथील (श्रीमती जे. एस. जगदाळे सो) दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) यांच्या न्यायालयात

नियमित दिवाणी दावा क्र. ६२४/२०१५

निशाणी क. 52

पु. ने. ता. ३१/१०/२०२५

सौ. शकुंतला भावसिंग निकम .......वादी

विरुद्ध

श्री. अशोक पंडित जोहरे आणि इतर .......प्रतिवादी

प्रति,
सौ. अर्चना प्रमोद गायकवाड, प्रतिवादी क्र. १ब
राहणार वसाहत क्र. १२, रवीनगर कॉलनी,
नागपूर सिव्हिल लाईन प्रकार १, एन.एस. के.
संस्थेच्याजवळ,नागपूर, महाराष्ट्र - ४४०००१.

प्रस्तुत मा. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणात प्रतिवादी क. १ यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसदारांची नोंद दिवाणी दाव्यामध्ये घेण्यात आलेली असून त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्तीदेखील करण्यात आलेली आहे. दावा दुरूस्तीनंतर सुधारीत दाव्याची प्रत नव्याने समाविष्ट केलेल्या प्रतिवादींना पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे.

या जाहीर सूचनेच्या माध्यमातून आपल्याला दिनांक ३१/१०/२०२५ रोजी दुपारी २.४५ वाजता ठाणे जिल्हा न्यायालयाच्या इमारतीत स्थित असलेल्या वरील नमूद मा. न्यायालयात प्रत्यक्ष अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत हजर राहावे लागेल. सदर प्रकरणात उपस्थिती नोंद करताना आपल्यावतीने दिवाणी दाव्यास लेखी जबाब दाखल करावा. आपण गैरहजर राहील्यास आपणांस न्यायालयीन कामकाजात सहभागी होण्याची इच्छा नाही असे गृहित धरून मा. न्यायालय यथायोग्य कार्यवाही करेल याची आपण नोंद घ्यावी.

प्रस्तुतची सूचना माझ्या सहीने आणि न्यायालयाच्या शिक्क्याने दिलेली आहे.

दिनांक 25 सप्टेंबर २०२५.

(सील)

सही/-
लिपीक

आदेशानुसार
सही/-
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय (क. स्तर/व. स्तर). ठाणे



## कार्यालय गट ग्रामपंचायत आजनी (शे)

### पंचायत समिती, सावनेर, तह, जि. नागपूर

**कार्यालयीन नागरिक पोर्टल वेब पेज अप्लिकेशन्स इत्यादी बनविनेसाठी कोटेशन मागणी करिता**

दि.३०/०९/२०२५

ग्रामपंचायत आजनी (शे) येथे सन २०२५-२०२६ मध्ये सामान्य फंड अंतर्गत ऑफ लाईन पद्धतीने नागरिक पोर्टल वेब पेज अप्लिकेशन्स इत्यादी कोटेशन मागवण्यात येत आहे. तरी इच्छुक पुरवठादारानी gpaajnisachiv@gmail.com या इमेल आयडी वर व ग्राम पंचायत कार्यालय येथे स्वत: कोटेशन पाठविण्यात यावे.

कार्यालयीन नागरिक पोर्टल वेब पेज अप्लिकेशन्स इत्यादी कोटेशन मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | कोटेशन जाहिरातीचा दि. | कोटेशन स्वीकृती दि. |
|---|---|---|---|
| १ | सन २०२५-२६मध्ये ग्रामपंचायत आजनी येथे नागरिक पोर्टल वेब पेज अप्लिकेशन्स वेब अप्लिकेशन आणि मोबाईल अप्लिकेशन, कस्टम यु, आय, डिझाईन, अड्मीन पॅनल आणि वेबसाईड, स्कॅनरपेमेंट इनटीग्रेशन अप्लिकेशन डेव्हलपमेंट कोटेशन मागवण्यात येत आहे. | दि.३०/०९/२०२५ | दि.३०/०९/२०२५ ते ०३/१०/२०२५, ०२:०० वा. पर्यत |

सदर कोटेशन मागविणे बाबत अटी व शर्ती ग्राम पंचायत कार्यालय या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोटेशन हे कार्यालयात समितीने दिलेल्या दिनांकावर सभेचा दिवशी उघडण्यात येईल.

अधिक माहितीसाठी संपर्क:- ८८०६५६६५९५

सरपंच
ग्रामपंचायत आजनी (शे)

तामिळनाडूमध्ये एका अभिनेत्याला पाहण्यासाठी झालेल्या चेंगराचेंगरीत जवळपास चाळीसहून अधिक जण मरण पावले. शेकडो लोक जखमी झाले. केवळ एका अभिनेत्याला जवळून पाहण्याची संधी मिळावी, म्हणून ही गर्दी झाल्याचे प्रथमदर्शनी कळते. एका बाजूला महागाईने जनता होरपळून निघाली आहे. शेतकरी रस्त्यावर आला आहे. एकमेकांच्या समस्यांसाठी लोक जर रस्त्यावर एकत्र आले, तर त्यांची समस्या केव्हाच मिटून जाईल. स्वतःसाठी लोक कधीही एकत्र यायला तयार नाही. इंग्रजांच्या काळात देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून लोक रस्त्यावर आले, तर देशाला स्वातंत्र्य मिळाले होतेच ना! परंतु केवळ एका अभिनेत्याला पाहण्यासाठी जर एवढी गर्दी होत असेल तर हा देश कोणत्या दिशेने निघाला? ज्याला पाहण्यासाठी लोकांनी एवढी गर्दी केली होती, त्याचे एका चित्रपटाचं मानधन ऐकलं तर लोकांना चक्कर येऊन जाईल. सद्यस्थितीत सर्वात जास्त मानधन मानधन घेणारा चित्रपट अभिनेता म्हणून तमिळ अभिनेता आणि तमिळगा वेट्री कझगम (टीव्हीके) चे प्रमुख थलपती विजय या अभिनेत्याचे नाव घेतलं जातं. त्याच्याच रॅलीत झालेल्या चेंगराचेंगरीत चाळीसपेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे. तामिळनाडूच्या करूर येथे घडलेल्या या घटनेत कीतीतरी लोक जखमी झाले आहेत. उपचारासाठी रुग्णालयात रांगा लागल्या आहेत. त्यात पुरुष, महिला व लहान बालकांचा देखील समावेश आहे. त्यामुळे लोकांना प्रश्न पडला आहे की थलपती विजय आहे तरी कोण? त्याने या रॅलीचे आयोजन का केले होते? त्याने पक्ष कधी स्थापन केला होता? अचानक तो रस्त्यावर का आला? आपल्याला पाहण्यासाठी लोक गर्दी करतील, ती आवरण्यासाठी सक्षम यंत्रणा आहे की नाही याचा विचार या अभिनेत्याने केला होता की नाही? दक्षिणेतील लोकांची ही कोणती मानसिकता? एखादा राजकीय नेता किंवा अभिनेता मृत्यू पावला तर आत्महत्या करेपर्यंत लोकांची मानसिकता जातेच कशी? आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री वाय. एस. आर. रेड्डी यांचे हेलिकॉप्टर अपघातात निधन झाल्यानंतर शेकडो लोकांनी आत्महत्या केल्याचे उदाहरण आपल्या डोळ्यासमोर आहेच. एवढेच नव्हे तर अण्णा डीएमके या पक्षाच्या सर्वेसर्वा व तेव्हाच्या मुख्यमंत्री जयललिता यांच्या मृत्यूनंतरही असाच प्रकार घडल्याचे अनेकांच्या स्मरणात असेलच. आपापल्या नेत्यावर पराकोटीचे प्रेम करणाऱ्या या लोकांची ही मानसिकता बनलीच कशी? हा संशोधनाचा विषय आहे. आपले स्वतःचे कुटुंब वाऱ्यावर सोडून मृत्यूला कवटाळणारी ही पिढी पाहून डोक्याला हात लावायची वेळ आली आहे.

# कोण आहे हा विजय थलपती?





चित्रपट कलाकारांना मतदान करणे मूर्खपणा आहे असे आपण म्हणू शकत नाही. ज्या राज्यांनी बिगर अभिनेत्यांना मतदान केले आहे ते अजूनही शिक्षण आणि आरोग्यसेवा यासारख्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करत आहेत. त्यामुळे बिगर-अभिनेत्यांना मतदान करणे ही एक बुद्धिमान चाल आहे याची कोणतीही हमी नाही.

असं समजू या की, अभिनेते लोकांना मूर्ख बनवतात. तसेच इतर सर्व राजकारणी तेच तर करतात. ज्या नेत्याला व अभिनेत्याला पाहण्यासाठी दक्षिणेतील लोकांनी अफाट गर्दी केली होती तो थलपती विजय हा दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार आहे. तो एक अभिनेता असण्यासोबतच आता तो एक राजकारणी बनला आहे.

त्याने १९९२ मध्ये आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरुवात केली. तेव्हापासून त्याने अनेक हिट चित्रपट दिले असून प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. कालांतराने त्याने राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला. टीव्हीके या पक्षाची स्थापना २ फेब्रुवारी २०२४ रोजी त्याने केली होती.

याच पक्षातून त्याने राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. या पक्षाचे मुख्यालय चेन्नईमध्ये आहे. विजयने तामिळनाडूतील सत्ताधारी द्रमुक, मुख्यमंत्री स्टॅलिन आणि भाजपाविरुद्ध आक्रमक भूमिका घेत पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने आतापासूनच प्रचाराला सुरुवात केली अन् पहिल्यात रॅलीत अपघात झाला. असे म्हटले जाते की, तामिळनाडू हे राजकारण्यांपासून बनलेल्या लोकांचे राज्य बनत चालले आहे.

१९६७ पासून जेव्हा द्रमुक सत्तेत आले, तेव्हा तामिळनाडू चित्रपट क्षेत्रातील व्यक्तींच्या हाती पडले. अण्णा दुराई, करुणानिधी हे त्याच क्षेत्रातील लोक होते.

अभिनेत्यांनी राजकारणात आल्यावर मतदारांना खुश करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. त्यांना मोफत वस्तू, रोख रक्कम, मोफत जमीन, मोफत टीव्ही, पंखा, मिक्सर असे वाटप सुरू झाले आणि लोक अभिनेत्यांच्या प्रेमात पडू लागले. तामिळनाडूतील प्रत्येक चित्रपट कलाकार राजकारणात येण्याचा किंवा राजकीयदृष्ट्या कल असलेले चित्रपट बनवण्याचा प्रयत्न करतात.

तमिळ राजकीय क्षेत्रातही काही विचित्र पद्धती आहेत. शक्तिशाली व्यक्तिमत्त्व असलेल्या नेत्यांना मतदान करण्याचा तमिळ लोकांचा दीर्घ इतिहास आहे. देवदेवता आणि वक्त्यांना नेहमीच शांत लोकांपेक्षा जास्त पसंती देणारे लोक मिळाले आहेत. करुणानिधी यांनी एमजीआरच्या करिष्म्याचा वापर करून काँग्रेस पक्षाला तामिळनाडूमधून बाहेर काढले.

चित्रपट उद्योग हे लोकांशी संपर्क साधण्याचे एक शक्तिशाली माध्यम आहे. तमिळ चित्रपटांमध्ये, अगदी मसाला चित्रपटांमध्येही, ज्वलंत विधाने आणि 'पंच डायलॉग' वापरले जातात. हळूहळू, कलाकार एक प्रतिमा तयार करतात आणि काळजीपूर्वक विकसित केलेल्या प्रतिमेचा वापर राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी करतात.

फॅन क्लब मतदानाचे समूह बनतात. हिट गाणी निवडणुकीच्या वेळी कानातले किडे बनतात. ज्वलंत दृश्ये आणि संवाद सादरीकरण करून लोकांच्या हृदयात स्थान निर्माण करतात. एमजीआर, करुणानिधी, जयललिता, विजयकांत, रजनीकांत, कमल हासन ते विजय यांनी चित्रपटांचा उत्तम वापर केला आहे.

राजकीय महत्त्वाकांक्षा असलेले लोक प्रथम याच क्षेत्रात प्रवेश करतात यात आश्चर्य नाही. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे मोठे स्टार झाल्यापासून त्यांच्याकडे पैसा आहे आणि लोकांचा पाठिंबाही आहे, त्यांचा चेहरा गर्दीला आकर्षित करू शकतो. म्हणूनच, ज्या स्टार्सना चाहत्यांची संख्या कमी होते ते भविष्यात अधिक चाहते मिळवण्यासाठी राजकारणात प्रवेश करतात.

जर ते यशस्वी झाले नाहीत, तर एकतर मीडिया चित्रपटांमध्ये त्यांच्या प्रत्येक गाण्यातील संवाद दाखवून त्यांना लोक नेत्यासारखे स्वीकारेल किंवा लोक त्यांना अशा नेत्यासारखे दाखवतील जे नंतर त्यांच्या मनाला गुदगुल्या करून त्यात सामील होतील.

१९७० च्या दशकापासून प्रादेशिक पक्ष तामिळनाडूच्या राजकारणात वर्चस्व गाजवत आहेत. त्यांनी त्यांच्या राजकीय विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी कला आणि संस्कृतीचा वापर केला आणि त्यासाठी त्यांना "गर्दी खेचणारे" हवे होते. सोशल मीडियाच्या अनुपस्थितीत, चित्रपट हा सर्वाधिक मनोरंजन घटक होता आणि कलाकार हे प्रमुख "गर्दी खेचणारे" होते.

राजकारणी चित्रपट निर्माते, वितरक आणि थिएटर मालक बनले ज्यामुळे हे संबंध मजबूत झाले. म्हणून, प्रादेशिक पक्षांनी त्यांच्या चित्रपटांद्वारे द्रविड सामाजिक-राजकीय विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी प्रमुख कलाकारांचा वापर केला.

एक संपूर्ण पिढी त्यांच्या आवडत्या अभिनेत्याला पडद्यावर एका विशिष्ट राजकीय विचारसरणीचा प्रचार करताना पाहण्यासाठी तयार केली जाते. म्हणून २० वर्षांच्या अखेरीस, जेव्हा अभिनेता म्हातारा होतो, तेव्हा ते राजकारणात प्रवेश करतात आणि गेल्या २० वर्षांपासून पडद्यावर ज्या विचारसरणीचा प्रचार करत होते त्या राजकीय मोहिमांमध्ये त्याच विचारसरणीचा प्रचार करतात. विजय हा त्याच प्रकारातील नेता बनू पाहतोय!






जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६११४२०

## विजय सर्वाधिक मानधन घेणारा कलाकार

ज्याच्या दर्शनासाठी अनेकांनी मृत्यूला कवटाळले तो थलपती विजय हा दक्षिण भारतात खुप लोकप्रिय आहे. चेन्नईमधील विजयचा नीलंकराई बंगला ही एक बहुचर्चित मालमत्ता आहे. समुद्रकिनारी असलेला हा बंगला हॉलिवूड स्टार टॉम क्रूझच्या समुद्रकिनाऱ्यावरील घरापासून प्रेरणा घेऊन बनवलेला आहे. तसेच त्याच्याकडे इतरही संपत्ती आहे. विजयकडे अनेक लक्झरी कार आहेत. यात रॉल्स-रॉइस घोस्ट, बीएमडब्ल्यू एक्स5 आणि एक्स 6, ऑडी ए8 एल, रेंज रोव्हर इव्होक, फोर्ड मस्टँग, व्होल्वो एक्ससी90 आणि मर्सिडीज-बेंझ यांचा समावेश आहे.

भारतातील सर्वाधिक मानधन घेणारा तो अभिनेता आहे. थलपती 69 या आगामी चित्रपटासाठी त्याने 275 कोटी रुपये घेतले आहे. त्याचे लागोपाठ अनेक चित्रपट ब्लॉकबस्टर हीट झाले आहेत. थलपती 69 या चित्रपटाची प्रतिक्षा त्याचे चाहते अनेक दिवसांपासून पाहात होते. याआधी शाहरुख खान याला अलिकडील त्याच्या चित्रपटातून सर्वाधिक अडीचशे कोटी रुपयांचे मानधन मिळाले होते. त्यामुळे आता भारतातील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्यात शाहरुखचा नंबर विजय थलपती याने हिसकावला आहे.

## तामिळनाडूमध्ये राजकारणी बनलेले अभिनेते

एम जी रामचंद्रन १९७७ ते १९८८ पर्यंत यशस्वी मुख्यमंत्री होते. त्यानंतर जयललिता १९९१-१९९६, २००२-२००६, २०११-२०१६ आणि २०१६-२०१६ पर्यंत मुख्यमंत्री होत्या. यादरम्यान शरत कुमार यांनी राजकारणात प्रवेश केला. द्रमुक पक्ष, नंतर अण्णाद्रमुक, पुन्हा द्रमुक, पुन्हा अण्णाद्रमुक, नादिगर संगमचे प्रमुख असा त्यांनी राजकीय प्रवास केला. करुणास या माजी विनोदी कलाकाराने राजकारणात प्रवेश करून नशीब आजमावण्याचा प्रयत्न केला. आता ते अण्णाद्रमुक पक्षाचे आमदार आहेत. कार्तिक हा माजी अभिनेता आहे. स्वतःचा पक्ष सुरू करणारा आणि नंतर विसर्जित करणारा अयशस्वी राजकारणी म्हणून त्यास ओळखले जाते. त्यानंतर विजयकांत यांनी २०११ च्या निवडणुकीत २९ जागा जिंकून विरोधी पक्ष स्थापन करणारे यशस्वी राजकारणी म्हणून राजकारणात प्रवेश केला. परंतु २०१६ मध्ये त्यांचा भयंकर पराभव झाला आणि तेव्हापासून ते अपयशी ठरले आहेत. याचाच अर्थ राजकारणात यशस्वी झालेले आणि अपयशी झालेले सर्वजण चित्रपट व्यवसायातूनच पुढे आलेले आहे. त्यामुळे विजय थलपती हा त्यास अपवाद कसा ठरेल?

# गाण्यातून उमगणारी लता..



लता मंगेशकर यांच्या गाण्यांमधून प्रकटणारे भाव खूपच गहिरे आणि विविधरंगी आहेत. त्यांच्या गळ्यातील माधुयार्मुळे प्रत्येक गाणं हे एक जीवनानुभव बनतं. लता दीदींच्या आवाजात असलेली नाजूक गोडी प्रेमगीतांना वेगळीच उंची देते.

लग जा गले... प्यार किया तो डरना क्या... यामध्ये प्रेमातील कोमलता स्पष्ट जाणवते. त्यांच्या गाण्यातील विरहाची जाणीव अतिशय हृदयस्पर्शी आहे.

आज फिर जीने की तमन्ना है...मध्ये वेगळ्या प्रकारचं आत्मविश्वासपूर्ण विरहदर्शन तर

जाने क्या सोचकर.... मध्ये वेदना आहे.

भक्तिगीतांत लता मंगेशकरांचा आवाज एक दिव्य अनुभूती देतो. पांडुरंग, जय जय राम कृष्ण हरी...

उत्सवी गाणी, झपाटून टाकणारी नृत्यगाणी सुद्धा त्यांनी तितक्याच उर्जेने गायली.

उदा. आजा रे परदेसी, दिल तो पागल है...

ए मेरे वतन के लोगो.... या गाण्यातील कंठातून उमटलेला देशप्रेमाचा स्वर अजूनही मन हेलावून टाकतो.

लता मंगेशकर यांच्या गाण्यांचा आत्मा म्हणजे भावनांची नाजूक छटा–प्रेम, विरह, भक्ती, आनंद किंवा देशप्रेम. प्रत्येक भावना त्यांच्या सुरेल आवाजातून श्रोत्यांच्या मनाला भिडते. लता मंगेशकर यांचं गाणं हे फक्त सुरावटींचं नव्हे तर भावविश्व उलगडणारं एक अविस्मरणीय अनुभवविश्व आहे.

त्यांच्या स्वरातून उमटणारी लता म्हणजे भावनांचा दरवळ प्रत्येक गाण्यातील शब्दांना त्यांनी इतकं प्राणप्रतिष्ठा दिलं की प्रेम, वेदना, आनंद, विरह या सगळ्या भावनांना त्यांचा आवाज स्पर्शून गेला. लग जा गले.... मधील कोमलता असो वा ए मेरे वतन के लोगो... मधील देशभक्तीची ऊमी... दोन्ही ठिकाणी त्या समान ताकदीने भिडतात.

शुद्धता आणि साधेपणा त्यांचा गळा म्हणजे एक पारदर्शक झरा. तंत्राचा दिखावा न करता गाण्यातील भावना अगदी सहजतेने पोहोचवणे, ही त्यांची खरी ताकद.

**अनेक पिढ्यांची प्रेरणा :**

हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, पंजाबीङ्ग कित्येक भाषांमध्ये गायन करत त्यांनी संगीताला सीमोल्लंघन घडवून आणलं. आवाजातला कालातीतपणा. पाच दशकांहून अधिक काळ त्या गात राहिल्या, तरी त्यांचा स्वर नेहमीच ताजा, तरल राहिला.

गाण्यातून उमगणारी लता म्हणजे फक्त एक गायिका नाही तर भारतीय संगीतसंस्कृतीचा एक जीवंत श्वास ज्यांच्या स्वराशिवाय आपलं सांगीतिक आकाश अपूर्णच राहील.

जीवनाच्या अनेक संचिता पैकी लताचं असणं हे एक संचित आहे. आपल्या अवती भोवती अनेक समृद्ध व्यक्तिमत्वे असतात, स्वर असतात, त्यांच्यामुळे आपलं जीवन समृद्ध होत असतं. मोठ्या माणसांचा असणं डोक्यावर छत्र असतं. लतांची गाणी अनेकांच्या दृष्टीने मुदत ठेव आहे, जिच्यामुळे त्यांचं आयुष्य सुखद आहे.

सौंदर्य आणि स्वर आपल्या आवाक्यात जरी नसले तरी पाहण्यात व ऐकण्यात ते आपलेच असतात. लताच्या गाण्यामुळे अनेक गाण्यांना परिसस्पर्श लाभला. लता गाण्याला सोनं करणार परीस आहे. प्रेमाला उपमा नाही तशी लताच्या गाण्याला उपमा नाही.

लताचे स्वर ऐकल्यावर असं वाटतं, जीवनात ही घडी अशीच राहू दे. माणसें येतात आणि जातात पण स्वर मनात घर करतात. मनात घर करणाऱ्या गोष्टीच मनात तग धरतात. लता कुठे काय करते लता फक्त आधार देते. लता केवळ आधारच देत नाही तर वेळू गगनावर नेते. काही सौंदर्या साठी व काही स्वरा साठी सगळी विशेषणे थिटी पडतात, तिथे शब्दांच्या पलीकडे गेल्यानंतरच सौंदर्य आणि स्वर कळतात.

काही गोष्टींची अनुभूती घ्यायची असतें, काही गोष्टी फक्त जगायच्या असतात. लताचे स्वर या प्रकारात मोडतात. मोडक्या तोडक्या आणि भग्न आयुष्याला अर्थ प्राप्त करून दिला तो लतांच्या मधुर स्वर आणि गाण्यांनी. लतांच्या गाण्यांनी अनेकांना जगण्याची उमेद दिली आहे. माणसे रडल्याशिवाय मोकळी होत नाहीत.

our sweetest songs are those that tells us the saddest thoughts.

मैफल मध्ये भाव खाते ती असतें गझल. लताच्या गाण्याचं ही असच आहे.

माणसें जाताना केवळ आठवण मागे ठेवून जात नाहीत, तर स्वर मागे ठेवून जातात, अस्तित्व मागे ठेवून जातात. माणसाला मरण असतं, स्वरांना मरण नसतं. आकाशातल्या तारका जशा मोजता येत नाही तसं लताच्या गाण्यांचं अस्तित्व मोजता येत नाही. आकाशातल्या नक्षत्रांचे देणं नुसतं अनुभवत राहावं तशाप्रकारे लतांच्या गाण्यांचा अनुभव नुसता घेत राहावा आणि यातच जीवनाची खरीखुरी इतिकर्तव्यता आहे.

डॉ.अनिल कुलकर्णी
९४०३८०५१५३
anilkulkarni666@gmail.com

गाण्यात अर्थ असतो पण गाण्याला सुगंध असतो हे लताची गाणे ऐकल्यावर जाणवतं. अश्रूंची फुले करण्याची किमया लतांच्या गाण्यात आहे. आपलं संचित आपल्यालाच माहित नसतं. आपलं संचित माहिती होण्यासाठी किंचित वेळ द्यावाच लागतो.लतचा काळजाला भिडणारा, हेलावून सोडणारा, अंतर्मुख करणारा, डोळ्यातून अश्रू वाहायला लावणारा आवाज, हीच लताची शक्ती आहे.

लता व्याख्येत न मावणारी स्वरसम्राज्ञी आहे. लता काहीजणांचे दैवत, अनेकांच्या भिंतीवरील फोटो प्रेम आहेत. मनाच्या चौकटीतील एक सुंदर चित्र आहेत. एकच गीत अनेक जण गातात, पण हसवायचे, रडवण्याचे सामर्थ्य काही जणांमध्ये असतं, त्यापैकी एक लता.लता असे चुंबक आहे, जिथे सर्व विशेषणे आपोआप चिकटतात.

गाणं अजरामर करणं लताडून शिकायला हवं. ये मेरे वतन के लोगो ऐकल्यावर डोळ्यात पाणी येते. पंडित नेहरूंच्या डोळ्यात व आमच्या डोळ्यात पाणी आणलं ते लतानीच.

सुखामध्ये जीवनात ही घडी अशीच राहु दे असंवाटतं. हे क्षण असेच पकडून ठेवावेत, त्याला दृष्ट लागू नये असं आपल्याला वाटतं.ऊत्तुंग प्रतिभेच्या आविष्काराला साथ देणारा आवाज हवा. गीत आणि सूर हातात हात घालूनच जायला हवेत, तरंच मिले सुर मेरा तुम्हारा, तो सुर बने हमारा हे शक्य आहे.

लतांनी प्रेमिकांच्या आयुष्यात बहार आणली आहे . लहान मुलांना नाचायला शिकवले. नाच रे मोरा आंब्याच्या बनात, आई मी पावसात जाऊ कां? जन पळभर म्हणतील हाय हाय म्हणून, वृद्धांना संध्याछायेची आठवण करून दिली आहे. एक-दोन-तीन-चार या जावेदच्या मासिक बाराखडीच्या गाण्याला लतांनी रंगत आणली.

काही गाणी लतांमुळे लक्षात राहतात. मोगरा फुलला, चाफा बोलेना, ही गाणी जणू तुमच्यासाठीच होती. आपली नक्कल करू नये, म्हणत लतानी सृजनाचा मार्ग मोकळा ठेवला आहे. अनेक लता आहेत,अनेक आशा आहेत, हवाय फक्त आधार. भीक मागणाऱ्या सुरांना जेव्हा आधार मिळतो, तेव्हा त्याला राजमान्यता मिळते, त्याच सोनं होतं. अशा अनेक रानुमंडल आहेत.

--------------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

## डेन्मार्कमध्ये पोट फुगणे आणि ढेकर येणे यावर कर लागू



हवामान बदलाचा सामना करण्यासाठी, डॅनिश सरकारने फ्लॅट्युलन्स टॅक्स किंवा पोट फुगण्यावरील कर नावाचा एक विचित्र कायदा लागू केला आहे.

हटके खबर

हा कायदा 18 नोव्हेंबर 2024 रोजी लागू झाला. या अंतर्गत 2030 पासून डॅनिश शेतकऱ्यांना त्यांच्या पाळीव प्राण्यांच्या ढेकर आणि गॅसचा खर्च देखील करावा लागेल.



२०१९ मध्ये, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनातील प्रत्येक टन मिथेनसाठी ३०० डॅनिश क्रोनर (अंदाजे ₹४,१००) द्यावे लागतील. २०३५ पर्यंत ही रक्कम ७५० क्रोनर (अंदाजे ₹१०,०००) पर्यंत वाढेल. तथापि, शेतकऱ्यांवरील भार कमी करण्यासाठी, त्यांना ६०% कर सवलत मिळेल.

गायी आणि डुकरांमधून होणाऱ्या मिथेन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा कर लावण्यात आला आहे. मिथेन हा एक हरितगृह वायू आहे जो जागतिक तापमानवाढीला कारणीभूत ठरतो. तज्ञांच्या मते, एक गाय दररोज 500 लिटर पर्यंत मिथेन सोडू शकते.



या विक्रमी करामुळे पहिल्या वर्षात हरितगृह वायू उत्सर्जन 1.8 दशलक्ष टनापर्यंत कमी होण्याची अपेक्षा आहे. यापूर्वी न्युझीलंडनेही असा कर लावण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही.



संयुक्त राष्ट्रांच्या मते, जगभरातील अब्जावधी प्राण्यांपासून होणारे हे उत्सर्जन जगातील एकूण हरितगृह वायू उत्सर्जनाच्या सुमारे १२% आहे.

# भारत सध्या विकसित राष्ट्र बनू शकत नाही!

जीएसटी सुधारणा निःसंशयपणे एक चांगला निर्णय आहे, परंतु केवळ अशा सवलतींद्वारे भारत २०४७ पर्यंत "विकसित राष्ट्र" बनू शकत नाही. त्यासाठी किमान ८-१० टक्के आर्थिक विकास दर आवश्यक आहे.

सध्या, आंतरराष्ट्रीय संस्था ६.५ ते ६.९ टक्के असा अंदाज लावत आहेत. आपण अजूनही खूप दूर आहोत. जीएसटी पलीकडे, कायदा, कामगार, जमीन आणि न्याय यासह अनेक क्षेत्रांमध्ये सुधारणा आवश्यक आणि आवश्यक आहेत. जमिनीची उपलब्धता आणि समानता सुधारणे देखील महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांना फक्त ट्रॅक्टर, थ्रेशर आणि सिंचन यंत्रेच नव्हे तर आर्थिक समानतेची देखील आवश्यकता आहे. त्यांना त्यांच्या पिकांसाठी वाजवी किंमत मिळाली पाहिजे, किमान कर्जाच्या काळ्या वास्तवातून बाहेर पडण्यासाठी पुरेशी.

'किसान सन्मान राशी' हा समुद्रातील एक थेंब आहे. ती आदर नाही, तर दान आहे. सरकारने शेतकऱ्यांचे पीक चांगल्या किमतीत विकले जावे याची खात्री करावी. तथापि, 'विकसित भारत' ही केवळ घोषणा, स्वप्नच राहील. सामान्य माणसानेही या दृष्टिकोनातून आपल्या परिस्थितीचे मूल्यांकन करावे. आजही ८१ कोटींहून अधिक भारतीय मोफत अन्नधान्यावर अवलंबून आहेत हे एक कठोर वास्तव आहे.

आजही, जर आपण सरकारी आकडेवारीवर विश्वास ठेवला तर, १५ ते २० कोटी भारतीय दारिद्र्य रेषेखाली जगत आहेत. आजही, सुमारे ८५% शेतकरी सरासरी पातळीवर आहेत. त्यांच्याकडे एकतर २-४ हेक्टर जमीन आहे किंवा त्यांना इतरांच्या जमिनीवर शेती करण्यास भाग पाडले जात आहे. देशाच्या जीडीपीमध्ये शेतीचा वाटा वाढला पाहिजे. लक्षात ठेवा की कोविड-१९ महामारीच्या काळातही कृषी विकास दर ३% पेक्षा जास्त होता. वस्तू २, ४ किंवा १० रुपयांनी स्वस्त करून देश स्वावलंबी होऊ शकत नाही. अतिरिक्त संसाधने असतानाच नागरिक गाडी किंवा घर खरेदी करण्याचा विचार करू शकतो.

सध्या, सामान्य माणूस उदरनिर्वाहासाठी संघर्ष करत आहे. देशातील फक्त ४% लोकसंख्येचे दरमहा सरासरी उत्पन्न ५०,००० आहे. आम्ही देशातील १% श्रीमंत लोकांकडे लक्ष देण्यास पात्र आहोत अशी चर्चा करत नाही किंवा त्यांचा विचार करत नाही.

तथापि, जीएसटी सुधारणा सामान्य माणसासाठी एक मोठा दिलासा आहेत. पंतप्रधान मोदींनी "स्वदेशी" सोबतच स्वावलंबनाचे आवाहन केले आहे. "स्वदेशी" हा आरएसएसचा एक प्रमुख मुद्दा आहे. "स्वदेशी जागरण मंच" ही त्याची संलग्न संघटना आहे.

केंद्रातील अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळातही "स्वदेशी" च्या घोषणा जोरदार होत्या, परंतु तरीही, माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव आणि त्यांचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणा स्वीकाराव्या लागल्या आणि टिकवाव्या लागल्या. भारताने जागतिकीकरण आणि उदारीकरण स्वीकारले, जगासाठी आपले दरवाजे उघडले, परिणामी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात आपला प्रवेश वाढवायला सुरुवात केली. त्या काळानंतरच भारताची अर्थव्यवस्था विस्तारली आणि आज आपण चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहोत.

"स्वदेशी" केवळ १.४६ अब्जाहून अधिक लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करू शकत नाही. भारत हा उत्पादन आणि पुरवठा केंद्र नाही. आपण भारतात अस्त्रस्त्र'ी आणि रें२४ल्लें सारखे परदेशी मोबाईल फोन असेंबल करतो, तरीही आपण जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा उत्पादक आणि उत्पादक असल्याचा दावा करतो. जागतिक बाजारपेठेत कोणता भारतीय ब्रँडचा मोबाईल फोन चांगला विकला जात आहे?


वास्तव असे आहे की आपल्या देशात कच्च्या मालावर १८% जीएसटी आहे आणि आता आपल्याला तयार वस्तूंवर ५% जीएसटी भरावा लागेल. किती विचित्र विरोधाभास आहे! भारतात, चिप्स आणि चांगल्या शर्टपासून ते कच्च्या मालापर्यंत, कार आणि विमानांपर्यंत सर्व काही "विदेशी" आहे. राष्ट्रपती आणि पंतप्रधानांचे विमान देखील "विदेशी" आहेत. फ्रान्सचे राफेल आणि एलोन मस्कचे टेस्ला यांना "स्वदेशी" मानले जाऊ शकते का?


भारतात स्वदेशीचे स्वप्न साकार करण्यासाठी, आपल्या शीर्ष कंपन्या आणि लघु, सूक्ष्म आणि कुटीर उद्योगांना संशोधन आणि विकासासाठी बजेट वाटप करावे लागेल.



ॲड .आकाश सपेलकर
सर्वोच्च न्यायालय, भारत.

# ब्रेन स्ट्रोक येण्याच्या एक दिवस आधी शरीर देते हे संकेत





मेंदूच्या नसांमध्ये रक्तप्रवाह करणाऱ्या नसांना दुखापत झाली किंवा त्या फुटल्या तर आपल्याला पक्षाघात किंवा ब्रेन स्ट्रोक येत असतो. त्यामुळे शरीराचे अवयव लुळे होऊ शकतात. किंवा दृष्टी, बोलणे वा चालणे अथवा ऐकणे अशा क्रियांवर परिणाम होऊन त्या बंद देखील पडू शकतात. किंवा मेंदूत अधिक रक्तस्त्राव झाला तर मृत्यू येऊ शकतो.

जेव्हा मेंदूची एखादी नस ब्लॉक होते तेव्हा ब्रेन स्ट्रोक येतो. या जीवघेण्या स्थिती वेळीच उपचार न केल्यास मृत्यू देखील येऊ शकतो.परंतू तुम्हाला मिनी ब्रेन स्ट्रोक बद्दल माहिती आहे का? जो एखाद्या मोठ्या अटॅक येण्याआधीच येऊ शकतो.याची लक्षणं हलकी असतात. त्यांना वेळीच ओळखले तर मोठा अटॅक येण्यापासून वाचता येते. याला मिनी ब्रेन स्ट्रोक वा ट्रान्सिएंट इस्केमिक अटॅक देखील म्हणतात.

या आजाराचे संकेत शरीर काही तास आधी देत असते. एक दिवस आधी आपल्या संकेत मिळतात. त्यामुळे ब्रेन स्ट्रोकचा मोठा झटका येण्याआधी उपचार सुरु केल्यास रुग्णाला वाचवता येते.

ब्रेन स्ट्रोक सारखा छोटा ब्रेन अटॅक देखील मेंदूची एखादी नस ब्लॉक झाल्याने येऊ शकतो. याचे कारण मेंदूला ऑक्सीजन मिळणे बंद होते. परंतू हे नुकसान स्थायी नसते. आणि २४ तासात आपोआप बरे देखील होत असते. परंतू याच्या लक्षणांना गंभीरतेने घ्यायला हवे आणि डॉक्टरांचा सल्ला तातडीने घेणे गरजेचे असते.

शरीराच्या एका बाजूला चेहरा किंवा हात वा पायात सुन्नपणा येणे किंवा अशक्तपणा येणे, अचानक भ्रम होणे, अचानक बोलण्यात अडचणी येणे, दिसायला त्रास किंवा अडचण येणे, अचानक तोल जाणे

चालताना अडचण येणे, चक्कर येणे.

ब्रेन स्ट्रोक पासून वाचण्यासाठी कमी चरबी असलेले, कमी मीठ आणि अधिक फायबर असलेला आहार घ्यावा, ज्यासाठी तुमच्या आहारात खालील पदार्थांचा समावेश करु शकता. जसे की, पेअर, स्ट्रॉबेरी, एव्हाकॅडो, सफरचंद, केळे, गाजर, बीट.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### प्रलंयकारी पाऊस..!

नदीनाल्यांनी युती केली
वाहून नेली पिके
बळीपुढे प्रश्न पडला
आता भविष्यात कसे?

शेती निसर्गाचा जुगार
आपत्ती वारंवार येती
पराधिन बळीचे जीवन
म्हणून आत्महत्या करती ..

अशा प्रसंगी बळीला
शासनाकडून आस
सर्वतोपरी तातडीने
मदत करील हमखास..

# सॅमसंगच्या 'सुपर बिग सेलिब्रेशन्स'ने व्हिजन एआयद्वारे समर्थित मोठ्या स्क्रिन आकाराच्या टेलिव्हिजन्सवर मेगा फेस्टिव्ह ऑफर्स आणल्या

**मुंबई, २९ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज सर्वात मोठी उत्सवी मोहिम 'सुपर बिग सेलिब्रेशन्स'ची घोषणा केली, ज्यामध्ये व्हिजन एआयद्वारे समर्थित मोठ्या स्क्रिन आकाराच्या प्रीमियम टेलिव्हिजन्सवर अद्वितीय डिल्स व रिवॉर्ड्स मिळतील. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत वैध असलेली ही मोहिम ग्राहकांना यंदा सणासुदीच्या काळात त्यांचा मनोरंजन अनुभव अपग्रेड करण्याची संधी देते. सॅमसंगने या मोहिमेचा भाग म्हणून आपल्या एआय टीव्ही श्रेणीवर विशेष ऑफर्स, कॅशबॅक आणि रिवॉर्ड्स सादर केले आहेत. ग्राहकांना जीएसटी दरामध्ये कपातीमुळे कमी झालेल्या किमतीचा फायदा देखील मिळेल. उत्साहामध्ये अधिक भर करत निवडक मोठ्या स्क्रिन आकाराच्या सॅमसंग टीव्ही मॉडिल्सच्या ग्राहकांना जवळपास ९२,९९० रूपयांचा सॅमसंग साऊंडबार किंवा जवळपास १,४०,४९० रूपये किमतीचा एआय टीव्ही मोफत मिळेल, ज्यामुळे घरामध्ये परिपूर्ण सिनेमॅटिक अनुभव मिळेल. दीर्घकाळापर्यंत समाधानाच्या खात्रीसाठी सॅमसंग निवडक मोठ्या स्क्रिन आकाराच्या टेलिव्हिजन्सवर ३ वर्षांची वॉरंटी देत आहे. ५५ इंच, ६५ इंच, ७५ इंच, ८५ इंच, ९८ इंच, १०० इंच आणि ११५ इंच व्हिजन एआय-समर्थित टेलिव्हिजन्सवर ऑफर्ससह यंदा सणासुदीचा काळ सॅमसंगचे सर्वात प्रगत मोठ्या स्क्रिन आकाराचे इनोव्हेशन्स घरी आणण्यासाठी परिपूर्ण वेळ आहे.

'सुपर बिग सेलिब्रेशन्स'सह आम्ही भारतीय घरांमध्ये सॅमसंगचे सर्वात प्रगत व्हिजन एआय-समर्थित मोठ्या स्क्रिन आकाराचे इनोव्हेशन्स घेऊन येत आहोत. आम्ही वैयक्तिकृत, सर्वोत्तम अनुभव निर्माण करत आहोत, जे ग्राहकांच्या एकत्र मनोरंजनाचा आनंद घेण्याच्या, कनेक्ट होण्याच्या आणि सण साजरा करण्याच्या पद्धतींना नव्या उंचीवर घेऊन जातील. आमच्यासाठी फक्त स्क्रिनचा आकार मोठा करणे नाही तर मनोरंजन स्मार्ट, अधिक कनेक्टेड करणे आणि भारतातील ग्राहकांच्या सर्वसमावेशक महत्त्वाकांक्षांची पूर्तता करणे महत्त्वाचे आहे. यंदा सणासुदीच्या काळात आम्ही सर्वांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याच्या सॅमसंगच्या दृष्टिकोनावर तुम्ही दाखवलेल्या विश्वासाला साजरे करत आहोत, जे प्रत्येक घराला सक्षम करत आहेत,'' असे सॅमसंग इंडियाच्या व्हिज्युअल डिस्प्ले बिझनेसचे वरिष्ठ संचालक विप्लेश डांग म्हणाले.

सॅमसंग व्हिजन एआयसह वापरकर्ते आता युनिव्हर्सल गेस्चर कंट्रोल, एआय-समर्थित पिक्चर सुधारणा, जनरेटिव्ह आर्ट वॉलपेपर्स आणि रिअल-टाइम होम इनसाइट्सचा आनंद घेऊ शकतात, ज्यामधून स्मार्टर आणि अधिक वैयक्तिकृत व्युइंग अनुभव मिळतो.

ग्राहक ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत Samsung.com, आघाडीचे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्स आणि संपूर्ण भारतातील रिटेल स्टोअर्समध्ये या ऑफर्सचा आनंद घेऊ शकतात. यंदा दिवाळीला सॅमसंग कुटुंबांना व्हिजन एआय-समर्थित टेलिव्हिजन्ससह अधिक जल्लोषात व उत्साहात सण साजरा करण्याचे आवाहन करते, जे सर्वांना एकत्र आणण्यासाठी, संस्मरणीय क्षण निर्माण करण्यासाठी आणि प्रत्येक सेलिब्रेशनला अधिक उत्साहपूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरने जागतिक पर्यावरण आरोग्य दिनानिमित्त शाश्वततेप्रती आपली कटिबद्धता दृढ केली

**बेंगळुरू, २९ सप्टेंबर :** जागतिक पर्यावरण आरोग्य दिनाचे औचित्य साधून टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने आज भारतात पर्यावरणीय स्थिरता आणि सामाजिक स्वास्थ्याला चालना देण्याप्रती आपली दीर्घकालीन कटिबद्धता अधिक दृढ केली. २०१५ मध्ये घोषणा करण्यात आलेल्या जागतिक टोयोटा एन्व्हायरोन्मेंट चॅलेंज २०५० (टीईसी २०५०) मध्ये सहा आव्हानांचा समावेश आहे. टीईसी २०५० मधून मार्गदर्शन घेत टीकेएम आपले कार्बन उत्सर्जन कमी करत आहे, ज्यामुळे परिवर्तनाला गती मिळत आहे, ज्यासाठी ते उत्पादनांच्या पलीकडे जात आहेत, उत्पादन कार्यसंचालनांमध्ये आणि त्यांच्या संपूर्ण मूल्य साखळीमध्ये शाश्वत पद्धतींचा अवलंब करत आहेत. तसेच, अशा पर्यावरणासंबंधित प्रयत्नांमध्ये नैसर्गिक संसाधनांचे जतन आणि प्रभावी प्रकल्पांच्या माध्यमातून समुदायाची प्रगती यांचा समावेश आहे.



जागतिक पर्यावरण आरोग्य दिन पर्यावरणाचा दर्जा आणि सार्वजनिक आरोग्यामधील अपरिहार्य संबंधाची आठवण करून देतो. शुद्ध हवा व पाणी, प्रभावी कचरा व्यवस्थापन व प्रदूषण नियंत्रणाला चालना देत हा दिवस निदर्शनास आणतो की पर्यावरणाचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि या बाबीशी संलग्न राहत टीकेएमचे शाश्वतता उपक्रम उत्सर्जन कमी करण्यावर व संसाधनांचे जतन करण्यावर लक्ष केंद्रित करण्यासोबत आरोग्यदायी समुदायांप्रती देखील योगदान देतात.

'रिस्पेक्ट फॉर प्लॅनेट' (पर्यावरणाचा आदर) या तत्त्वाशी बांधील राहत टीकेएमने आपला उत्पादन पोर्टफोलिओ, उत्पादन प्रक्रिया आणि समुदाय पोहोच उपक्रमांमध्ये नाविन्यता व विकासात्मक ध्येयांचा समावेश केला आहे, ज्यामधून सर्वोत्तम व मोठ्या प्रमाणात निष्पत्तींची खात्री मिळते.

## या नवरात्रीमध्ये कहानी हर घर की चार व्हीलचेअरवर असलेल्या योद्ध्यांचा सन्मान करत आहे ज्यांनी आपल्या संघर्षाला शक्तीत रूपांतरित केले आहे!

**मुंबई, २९ सप्टेंबर :** झी टीव्हीवरील कहानी हर घर की चे सूत्रसंचालन जुही परमार करत असून हा शो खऱ्या घरांमध्ये जाऊन त्या कथा उलगडत आहे ज्या अनेकदा शांततेच्या आड दडलेल्या असतात. संवेदनशीलतेने आणि आपुलकीने, जुही धैर्य, जिद्द आणि एकतेच्या या कहाण्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवते. त्या आपल्याला आठवण करून देतात की अडचणींनी शरीरावर परिणाम होऊ शकतो, पण त्यामुळे मानवी आत्म्याची ताकद कधीच मोडू शकत नाही.

आजच्या भागात जुही परमार चार विलक्षण महिलांची प्रेरणादायी कहाणी सांगत आहे मुंबईची प्रिया, सुरतची पूजा चौधरी, बरेलीची निशा गुप्ता आणि भारती. त्यांचे जीवन संघर्ष, ताकद आणि जिद्दीने एकमेकांशी जोडलेले आहे. नियतीने त्यांना व्हीलचेअरवर बसवले असले तरी प्रत्येक महिलेने शारीरिक आणि सामाजिक अडथळ्यांवर मात करत आपला स्वतंत्र मार्ग निर्माण केला आहे.

प्रियाने १७व्या वर्षी अपघातात दोन्ही पाय आणि एक हात गमावला, ती फक्त १९ वर्षांची असूनही अफाट जिद्दीने सिव्हिल सर्व्हिसेसची तयारी करत आहे. पूजा आणि भारती या दोघीही फूड डिलिव्हरीचे काम मनापासून करतात आणि आपल्या व्यवसायातील वेगवान मागण्या खंबीरपणे पूर्ण करतात. निशा स्वतः एक कुशल खेळाडू आहे, ती त्या दोघींना मार्गदर्शन आणि आधार देते, आपल्या अनुभवातून त्यांना ताकद पुरवते. एकत्रितपणे त्या आत्मनिर्भरता, सबलीकरण आणि परस्पर सहकार्याची खरी ताकद दाखवतात.

जुही परमार म्हणाल्या, एक स्त्री आणि एक आई म्हणून नवरात्री हा सण माझ्या हृदयाच्या अगदी जवळचा आहे कारण हा सण देवीच्या नऊ रूपांचा सन्मान करणारा आहे. यंदा कहानी हर घर की मधील या सामर्थ्यशाली कहाण्या ऐकताना मला पुन्हा जाणवलं की प्रत्येक स्त्रीच्या आत माँ दुर्गा असते. आयुष्याने कल्पनेपलीकडच्या परीक्षा घेतल्या तरी त्या पुन्हा उभ्या राहतात भीतीला हरवणाऱ्या धैर्याने, जखमा भरून काढणाऱ्या सौंदर्याने आणि जिद्दीने विजय मिळवतात. स्त्रिया फक्त जगण्यासाठी लढणाऱ्या नाहीत; त्या खऱ्या योद्ध्या आहेत, शक्तीचे सजीव रूप आहेत, ज्या आपल्याला स्वतःच्या संघर्षांवर मात करण्याची प्रेरणा देतात. या नवरात्रीत मी प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याला वंदन करते आणि त्यांचे अस्तित्व साजरा करते त्या आपल्या खऱ्या देवी आहेत.

संवेदनशीलता आणि समजूतदारपणाने जुही परमार या हृदयाला भिडणाऱ्या भागाचे सूत्रसंचालन करतात आणि प्रेक्षकांना आठवण करून देतात की अपंगत्व म्हणजे असमर्थता नव्हे, खरी ताकद म्हणजे समावेशकता आणि एकमेकांना आधार देणे. आजच्या भागात कहानी हर घर की हा प्रश्न विचारतो या महिलांच्या विलक्षण प्रवासाने समाजाला त्यांच्या धैर्याची जाणीव होईल का तसेच सगळ्यांसाठी अधिक सुलभ अशी दुनिया निर्माण होईल का?



# ॲक्सिस बँकेने भारतातील पहिला गोल्ड-बॅक्ड क्रेडिट यूपीआयवर लाँच केला, जो फ्रीचार्जद्वारे चालवला जाईल

**नागपूर, २९ सप्टेंबर :** भारतातील एक मोठी खासगी बँक असलेल्या ॲक्सिस बँकेने, फ्रीचार्जसोबतच्या सहकार्याने यूपीआयवर गोल्ड लोनसह क्रेडिट लाँच केले आहे. भारतामधील ही पहिली गोल्ड-बॅक्ड क्रेडिट लाईन आहे, जी युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) द्वारे उपलब्ध आहे. हे नवे उत्पादन विशेषतः सोनेमूल्य आधारित संपत्तीची आर्थिक क्षमता उघड करण्यासाठी डिझाइन केले असून, मायक्रो, स्मॉल आणि मीडियम एंटरप्राइझेस (एमएसएमई), स्वयंपूर्ण उद्योजक आणि व्यापारी यांच्यासाठी ग्रामीण तसेच शहरी भारतात उपलब्ध करण्यात आले आहे.

यूपीआयवर गोल्ड लोनसह क्रेडिट ग्राहकांना त्यांच्या सोन्याच्या हाती असलेल्या संपत्तीच्या आधारावर त्वरित क्रेडिट मिळवण्याची सुविधा देते. हे उत्पादन सध्याच्या ॲक्सिस बँकेच्या ग्राहकांसाठी सर्व गोल्ड लोन प्रक्रिया करणाऱ्या शाखांमध्ये उपलब्ध आहे आणि वापर व परतफेडीसाठी पूर्णपणे डिजिटल प्रवास प्रदान करते, ज्यामुळे ऑनबोर्डिंगनंतर शाखेला प्रत्यक्ष भेट देण्याची गरज नाहीशी होते.

लॉन्च कार्यक्रमात बोलताना, मुनीश शारदा, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, ॲक्सिस बँक यांनी सांगितले की, यूपीआयवर गोल्ड लोन क्रेडिटसह,



ॲक्सिस बँक डिजिटल युगात सुरक्षित क्रेडिटसाठी एक नवीन मानक स्थापित करत आहे. सोन्याच्या विश्वसनीयतेला आणि यूपीआयच्या सोयीस एकत्र आणून, आम्ही ग्राहकांसाठी त्वरित आणि लवचिक क्रेडिट साकार करत आहोत. हे लॉन्च आमच्या नवोपक्रम आणि वित्तीय समावेशनावरील लक्ष केंद्रित करण्याचा पुरावा आहे. आम्हाला विश्वास आहे की या उत्पादनाच्या अद्वितीय डिजिटल वैशिष्ट्यांमुळे जलद स्वीकारार्हता वाढेल आणि ग्राहकांना त्यांच्या वित्तीय व्यवहारांवर अधिक नियंत्रण मिळेल, ज्यामुळे यूपीआय-लिंक्ड क्रेडिट सोल्यूशन्समधील आमचे नेतृत्व दृढ होईल.

हे लॉन्च एनपीसीआयच्या अलीकडील मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत आहे, जे यूपीआयवर क्रेडिट लाइन सक्षम करतात, आणि भारताच्या डिजिटल पेमेंट्स पर्यावरणात मोठा टप्पा ठरते. हे सुरक्षित क्रेडिटसाठी प्रवेश सुलभ करते, मॅन्युअल प्रक्रियांवरील अवलंबित्व कमी करते आणि मोठ्या प्रमाणावर वित्तीय समावेशनास समर्थन देते.

सोहिनी राजोला, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर ग्रोथ, एनपीसीआय यांनी सांगितले की, यूपीआयवर क्रेडिट वित्तीय संस्थांना क्रेडिटचा प्रवेश वाढवण्यासाठी आणि सुलभ करण्यासाठी मजबूत संरचना प्रदान करते. ॲक्सिस बँकेची गोल्ड-बॅक्ड क्रेडिट लाइन दाखवते की ही पायाभूत सुविधा भारताच्या डिजिटल पेमेंट्स पर्यावरणात क्रेडिटसाठी प्रवेश अधिक सुलभ, सुरक्षित आणि व्यापकपणे उपलब्ध कशी करू शकते.

ॲक्सिस बँक क्रेडिट आणि ग्राहकांपर्यंत पोहोच यातील आपल्या नेतृत्वासह सहभागी होत आहे, तर फ्रीचार्ज ऑनबोर्डिंग, नोंदणी, पेमेंट्स आणि परतफेड यासाठी एक सुलभ आणि पूर्णपणे डिजिटल वापरकर्ता अनुभव सक्षम करत आहे. एकत्रितपणे, त्यांनी एक सोपे, विश्वासार्ह आणि व्यापकपणे उपलब्ध गोल्ड-बॅक्ड क्रेडिट उत्पादन सादर केले आहे, जे भारतातील डिजिटल कर्ज देण्याच्या पातळीस नवे मानक स्थापित करते. या लाँचमधून या संस्थांच्या संयुक्त ताकदीवर प्रकाशझोत टाकला गेला आहे.

# संकट वाढणार!



**मुंबई, २९ सप्टेंबर :** या आठवड्यात एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पूकी उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर हैं'मध्ये पात्र विलक्षण स्थितींमध्ये अडकणार आहेत, ज्यामुळे अधिक मोठे संकट ओढावणार आहे. विनोदी ट्विस्ट्ससह हसून-हसून लोटपोट होण्यास सज्ज राहा. एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''खोदीची (शरद व्यास) स्कूटर हरवल्यानंतर दरोगा हप्पू आणखी एका दुविधेत सापडतो. हप्पूच्या घरातून स्कूटर हरवल्याने रागावलेला खोदी हप्पूचा खूप अपमान करतो आणि संपूर्ण दोष त्याच्यावर टाकतो. दुःखात अधिक भर म्हणजे खोदीने राजेशला (गीतांजली मिश्रा) मधुर गाणे गाण्याची विनंती केली होती, बदल्यात तिला कुंदन नेकलेस देण्याचे आश्वासन दिले होते. हे गुपित कटोरी अम्माला (हिमानी शिवपुरी) देखील माहित नसते. योगायोगाने, ज्या दिवशी राजेश तिच्या गाण्याची विनंती पूर्ण करते त्याच दिवशी स्कूटर गायब होते. खोदीशी संवाद साधण्याचा एकमेव मार्ग स्कूटर असल्याने राजेश हप्पूवर स्कूटर शोधण्यासाठी दबाव आणू लागते, तर रणबीर (सोम्या आझाद) आणखी तणाव वाढवतो, तो विंटेज (जुन्या) स्कूटर आणि बाइक आवडणाऱ्या मुलीला प्रभावित करण्यासाठी धडपडत असतो. लवकरच सत्य उघडकीस येते की हप्पूमुळे स्कूटर हरवली आहे. दारूच्या नशेत तो आणि बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) एका रात्री स्कूटर बेवारस सोडून जातात आणि स्कूटर कुठे पार्क केली होती हे पूर्णपणे विसरून जातात. दरम्यान, कमिशनर रेशम पाल (किशोर भानुशाली) पत्नीला सोडून त्याच्या प्रेयसीसोबत पळून जात असतो, तेव्हा तो सोडून दिलेल्या स्कूटरवर अडखळतो आणि त्याच स्कूटरवरून पळून जातो. पळून जात असताना ते चुकून सोनूला (संजय चौधरी) धडकतात, जो कमिशनरला पाहतो आणि दुसऱ्या दिवशी पोलिस स्टेशनला घटनेची तक्रार करतो. घाबरून, कमिशनर आपली ओळख लपवण्याचा प्रयत्न करतो. कॉन्स्टेबल मनोहर (नितीन जाधव) त्याला कळवतो की सोनू मलायकाचा (सोनल पनवार) मित्र आहे. हताश होऊन कमिशनर मलायकाला आमिष देतो की सोनूला तक्रार मागे घेण्यास पटवून दिल्यास तिला तिची पोस्ट परत मिळेल. पण, कर्तव्यदक्ष मलायका सोनूला तक्रार मागे न घेण्यास सांगते आणि कमिशनरचे सत्य उघडकीस आणते. हप्पू आणि बेनी हरवलेल्या स्कूटरचा शोध सुरू ठेवतात. हप्पू अखेर स्कूटर घरी परत आणून कटोरी अम्मा, राजेश आणि खोदीच्या रागापासून स्वतःला वाचवू शकेल का?''

# सॅमसंगने भारतात एआय होम: फ्यूचर लिव्हिंग, नाऊ आणले

**मुंबई, २९ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज जिओ वर्ल्ड, प्लाझा, बीकेसी, मुंबई येथील त्यांच्या प्रमुख स्टोअरमध्ये एआय होम: फ्यूचर लिव्हिंग, नाऊ'साठी दृष्टिकोनाचे अनावरण केले. सॅमसंग एआय होम नेक्स्ट-जनरेशन कनेक्टेड लिव्हिंग परिसंस्था आहे, जी अप्लायन्सेस, डिवाईसेस आणि सर्विसेसना एकत्र करत अद्वितीय सोयीसुविधा, ऊर्जा कार्यक्षमता व वैयक्तिकृत अनुभव देते, जेथे सुरक्षितता व गोपनीयतेला प्राधान्य दिले जाते.



या लाँचची खासियत म्हणजे सॅमसंगचा फ्यूचर लिव्हिंग दृष्टिकोन: सर्वोत्तमता फक्त एकाच डिवाईसपर्यंत मर्यादित न राहता प्रत्येक स्क्रिन, अप्लायन्स आणि सर्विसमध्ये विनासायासपणे शेअर केली जाईल असे विश्व घडवणे. एआय होममध्ये तीन मूलभूत क्षमतांच्या माध्यमातून या दृष्टिकोनाचा समावेश आहे आणि त्या तीन क्षमता आहेत: सॅमसंगचे एआयमधील नेतृत्व, त्यांच्या डिवाईस पोर्टफोलिओची अद्वितीय सखोलता आणि विश्वसनीय, सुरक्षित परिसंस्था.

कल्पना करा की घर तुम्हाला ओळखते. तुम्ही घरामध्ये येताच लाइट सुरू होतात, झोपेदरम्यान तापमानानुसार एअर कंडिशनर समायोजित होते, वॉशिंग मशिन योग्य वॉश चक्राची शिफारस करते आणि टीव्ही तुमच्या आवडत्या मालिका एकामागोमाग सुरू करतो, हे सर्व आपोआपपणे होते. सॅमसंग एआय होम फक्त काहीजणांसाठी नाही तर सर्वांसाठी या दैनंदिन वास्तविकतेला शक्य करते.

ॲम्बियण्ट इंटेलिजण्ससह सिस्टम सतत वापरकर्त्यांच्या वर्तणूकीला आणि आसपासच्या वातावरणाला जाणून घेते, ज्यानंतर आपोआपपणे आरामदायीपणा, केअर, ऊर्जा बचत व सुरक्षितता देते. तुम्ही आराम करत असताना उत्साही वातावरण देणाऱ्या एसीपासून तुमच्या आहारसंबंधित ध्येयांनुसार आहाराचा सल्ला देणारा फ्रिज, पार्श्वभूमीमध्ये विनासायासपणे संलग्न होणाऱ्या स्मार्टथिंग्ज-सक्षम डिवाईसेसपर्यंत प्रत्येक परस्परसंवाद संदर्भीय, मानव-केंद्रित सर्वोत्तम असतो.

# आरकेसीपीएल लिमिटेडने सेबीकडे १,२५० कोटींच्या आयपीओसाठी डीआरएचपी दाखल केले

**मुंबई, २९ सप्टेंबर :** आरकेसीपीएल लिमिटेड (कंपनी) ही एक सिव्हिल कन्स्ट्रक्शन आणि इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी असून तिला भारतभरात विशेष प्रकारच्या स्ट्रक्चरल प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याचा अनुभव आहे. यामध्ये उंच रस्ते, फ्लायओव्हर, पूल, रोड ओव्हर ब्रिज, महामार्ग, द्रुतगती मार्ग, ड्रेनेज सिस्टिम्स आणि कालवा प्रणालींचा समावेश होतो. कंपनीने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस बाजार नियामक भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ कडे दाखल केला आहे.


१,२५० कोटी इतकी भांडवली रक्कम प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव द्वारे इक्विटी शेअर्सच्या इश्यूमधून उभारण्याचा कंपनीचा उद्देश आहे. एकूण इश्यू साइजमध्ये नवीन इक्विटी शेअर्सचा इश्यू ७०० कोटी आणि सेलिंग शेअरहोल्डर्सचा ऑफर फॉर सेल ५५० कोटी यांचा समावेश आहे. म्हणजेच, आयपीओमधून उभारली जाणारी रक्कम नवीन शेअर्स आणि विद्यमान शेअरधारकांकडून विक्रीसाठी आणलेल्या शेअर्स या दोन्हींच्या संयोगातून असेल.

कंपनीने निव्वळ उत्पन्नाचा वापर खालील उद्दिष्टांसाठी करण्याचे प्रस्तावित केले आहे (i) बांधकाम उपकरणे खरेदीसाठी लागणाऱ्या भांडवली खर्चाची तरतूद (ii) वर्किंग कॅपिटलच्या गरजांसाठी निधी उपलब्ध करणे; (ii) काही प्रलंबित कर्जाचे संपूर्ण किंवा अंशतः आगाऊ परतफेड आणि/किंवा परतफेड (iv) उपकंपन्या म्हणजेच बठिंडा लुधियाना हायवे प्रायव्हेट लिमिटेड, पोंटा साहेब हायवे प्रायव्हेट लिमिटेड आणि अंबाला रिंग रोड हायवे प्रायव्हेट लिमिटेड यामध्ये गुंतवणूक करून त्या उपकंपन्यांनी घेतलेल्या काही कर्जाची पूर्ण किंवा अंशतः परतफेड; (v) सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टे यांचा समावेश आहे.

आरकेसीपीएल ही सिव्हिल कन्स्ट्रक्शन आणि इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट क्षेत्रातील कंपनी आहे. भारतभरात विशेष प्रकारच्या स्ट्रक्चरल कामांची अंमलबजावणी करण्याचा तिला अनुभव आहे. कंपनीचे कौशल्य उंच रस्ते, फ्लायओव्हर, पूल, रोड ओव्हर ब्रिज, महामार्ग, द्रुतगती मार्ग, ड्रेनेज प्रणाली आणि कालवा प्रणाली यांच्या बांधकामामध्ये आहे.

या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स म्हणून इक्विरस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड आणि आनंद राठी ॲडव्हायजर्स लिमिटेड कार्यरत आहेत.

# शब्दकोडे क्रमांक २२२८



**उभे शब्द :-**

१) चामट, वातड
२) स्तुती, प्रशंसा
३) एक गोड फळ
४) चटकन रागविणारा, संतापी
५) ईर्षा, बळ, शक्ती
६) वणवा
७) क्रिकेटमधील धाव
८) नाहक
९) कोलकाताचे विमानतळ
१०) अजिबात, कधीही (नाही),
१४) समुद्र
१५) अवधान, चित्त
१६) केसाळ, ओंगळ प्राणी, रीस
१८) वस्ती
२०) मोठे घर, राजवाडा
२१) त्वचेचा पापुद्रा
२२) पाढ्यातील सहा
२४) नवरा
२५) कापडी बैठक, सतरंजी
२७) चाकरी करणारा
२९) बारीकसारीक
३१) खोकल्याची उबळ
३४) देशाचे नाणे
३५) लापशी
३६) वाचा, किराणा व्यापारी
३७) कातडी
३८) हार, सर
४०) भ्रमर
४१) हेम
४२) गुणांची पारख
४४) अपापाचा माल ***
४५) श्रीरामाची चरित्रगाथा
४७) छोट्याशा कारणावरून रडणारी
४९) संताप
५१) कपोल
५२) लाडीगोडी लावणे, गोंजारणे
५३) बिनावासाचे पांढरे फूल
५६) हाताने गोळा न होणारा पातळ पदार्थ
५९) एक पालेभाजी
६०) जनावर (हिं.)
६१) नहर
६३) संरक्षक, भिंत
६४) युवती
६६) संगीतातील एक राग
६९) मोठा नगारा
७०) नम्र, वाकलेला
७१) पातक
७२) रक्षाबंधनाचा धागा, एक रंग
७३) नाचणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

**आडवे शब्द :-**

१) चिमणीला कावळ्याची विनंती
११) मान्यता, अनुमाती
१३) फळाचे साल
१६) शर्त
१७) ढीग
१९) माफी असावी,
२१) गरीब साधा, प्रामाणिक
२३) ** ** दंड भेद
२५) मेंढा
२६) चलनवलन
२८) भांडण
३०) पावसाची झड
३१) तलवारीबरोबरचे शस्त्र
३२) लबाडी कट
३३) जादू
३६) गंध
३७) क्षाराची चव
३८) प्रतिष्ठेचा एक अवयव
३९) मन रमविणारी युवती
४१) कुराणातील वचने
४२) शिखराचे टोक
४३) अस्सल माल, पर्वत
४५) अरण्य
४६) ढग
४८) बांबुची मोठी टोपली
५०) घोडे बांधण्याची जागा
५२) चुका करत करत
५४) भीती
५५) पोलिस
५७) खंदक
५८) अंकशास्त्र
६०) माहितगार
६२) नखरेल चालणे
६५) दात
६६) धनदेवता
६७) वड, प्रतिष्ठा
६८) समुद्रातील अग्नी
७१) गवताचे पान
७२) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
७४) लाज
७५) भूतकाळ
७६) मैत्रीण

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# घर घर स्वदेशी हा संदेश देणाऱ्या महाकाय आकाश फुग्याचे अनावरण

**अमरावती, २९ सप्टेंबर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान देशभर सुरू होत आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती (२५ सप्टेंबर) ते भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जयंती (२५ डिसेंबर) या काळात हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा उद्देश प्रत्येक भारतीयाला स्वदेशी संकल्पाशी जोडणे, लोकसहभागातून राष्ट्रनिर्मितीला गती देणे आणि वोकल फॉर लोकल चा संदेश घराघरात पोहोचवणे असल्याचे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष आणि डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी डोंबिवलीत केले. नमो रमो या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या गरबा कार्यक्रमस्थळी घर घर स्वदेशी हा संदेश देणाऱ्या महाकाय आकाश फुग्याचे अनावरण या वेळी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान अंतर्गत राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि मंडल पातळीवर कार्यशाळा, महिला व युवा संमेलन, व्यापारी व उद्योग परिषद, स्वदेशी मेळावे तसेच आत्मनिर्भर भारत संकल्प रथ यांसारखे विविध कार्यक्रम देशभर होणार आहेत. शेतकरी, महिला, युवक, कारागीर, छोटे दुकानदार, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक क्षेत्र तसेच व्यापारी व उद्योग क्षेत्र यामध्ये सक्रिय सहभाग होणार असून घर घर स्वदेशी या भावनेतून स्वदेशी उत्पादनांचा प्रसार, लघुउद्योगांना प्रोत्साहन आणि स्थानिक उद्योजकांना आधार देणे हा अभियानाचा मुख्य उद्देश राहणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.




## आज का अंदाज

मंगळवार ३० सप्टेंबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

**कल्याण बाजार**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 4 | 5 | 8 |
| 137 | 149 | 140 | 170 |
| 380 | 257 | 258 | 369 |
| 290 | 347 | 348 | 567 |
| 10 | 49 | 50 | 83 |
| 12 | 42 | 59 | 80 |
| 16 | 46 | 53 | 89 |

**मुंबई बाजार**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 7 | 8 | 9 |
| 680 | 359 | 260 | 117 |
| 789 | 469 | 459 | 450 |
| 590 | 278 | 369 | 270 |
| 43 | 73 | 80 | 90 |
| 45 | 75 | 86 | 96 |
| 41 | 71 | 82 | 92 |

३० सप्टेंबर २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | 62 | 91 | 01 |
| 35 | 65 | 97 | 04 |
| 38 | 68 | 94 | 07 |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक
ओपन टू क्लोज
2 1 7 9 0

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## राशीभविष्य

**मेष :** उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. ज्यामुळे धनसंपत्ती वाढण्याचे योग आहेत. वडिलांचा आशीर्वाद मिळेल. अनेक महत्त्वाची कामे पूर्ण होतील. संवाद साधताना संयम बाळगणे आवश्यक आहे.

**वृषभ :** आज घेतलेले निर्णय अचूक ठरतील. त्यामुळे व्यवसायात चांगली प्रगती होईल. जुन्या अनुभवातून आणि केलेल्या कामातून धनप्राप्ती होण्याची शक्यता आहे. अर्धवट राहिलेली कामे आज पूर्ण होतील.

**मिथुन :** टीमवर्क आणि सामाजिक संबंध आज नवीन संधी आणतील. आर्थिक बाबतीत वास्तववादी अपेक्षा ठेवा. नातेसंबंधांमध्ये संवेदनशीलता आवश्यक आहे, कारण प्रियजन तुमचे लक्ष वेधतात.

**कर्क :** आज काहीशी चिडचिड होईल. काहीशी अस्वस्थता जाणवू शकते. मानसिक स्वास्थ्य राखण्यासाठी कुटुंबातील सदस्यांसोबत वेळ घालवा. धार्मिक श्रद्धा वाढेल. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

**सिंह :** आज प्रॉपर्टी संबंधित कामात चांगले यश मिळेल. कौटुंबिक सौख्याची प्राप्ती होईल. तुमचा मान सन्मान वाढेल. दिवसाच्या सुरुवातीला आळस जाणवेल, पण उत्साहाने काम पूर्ण करा.

**कन्या :** अनावश्यक खर्च टाळा. तुमच्या विचारांमध्ये स्पष्टता असेल. आर्थिक परिस्थिती हळूहळू सुधारेल. घरगुती खर्च वाढू शकतात. दैनंदिन वेळापत्रकात बदल होईल. मनोरंजनाकडे कल राहील.

**तूळ :** आज प्रत्येक कामात नशिबाची चांगली साथ मिळेल. करिअर संदर्भात शुभ बातमी मिळेल. तसेच तुम्हाला कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी आहे. कुटुंबातील सदस्यांसोबत आनंदात वेळ घालवाल.

**वृश्चिक :** आरोग्याकडे लक्ष द्या. वाहन चालवताना सावधगिरी बाळगा. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. भागीदारीच्या व्यवसायात आज लाभ होईल. तुमचा आत्मविश्वास वाढेल.

**धनु :** आजचा दिवस चांगला आहे. नोकरी-व्यवसायातील सकारात्मक बदल तुमच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरतील. इतरांना मदत केल्याने आज तुम्हाला मानसिक समाधान मिळेल.

**मकर :** आरोग्यावर अचानक खर्च वाढू शकतो, नातेसंबंधांमध्ये खरी काळजी घ्या आणि अंतर निर्माण करणे टाळा. घरात पाहुणे येतील. कामाचा अति-ताण तुमच्या उत्साहावर परिणाम करेल.

**कुंभ :** आज कामावर लक्ष केंद्रित करणे आणि नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या प्रकल्पांमध्ये बारकाईने लक्ष द्या आणि नातेसंबंधांमध्ये प्रामाणिकपणा ठेवा. जास्त टीका करणे टाळा.

**मीन :** तुमचे कौतुक होईल. धाडस आणि आत्मविश्वासाने घेतलेल्या निर्णयांमध्ये सहज यश मिळेल. आर्थिक स्थिती ठीक असली तरी खर्च होण्याची शक्यता आहे.

# पुनर्वसनासाठी रोहणा ग्रामस्थांचे बेमुदत उपोषण सुरू

## उमा नदीच्या पात्रात ठिय्या : भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईची मागणी ; पूर आल्यास अघटीत घडण्याचा धोका

■ महासागर प्रतिनिधी
मूर्तिजापूर, दि. २९ :

'तालुक्यातील रोहणा येथील नागरिकांच्या पुनर्वसनासाठी व उमा बॅरेज प्रकल्पाच्या काही अधिकाऱ्यांनी केलेल्या कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार उघड करुन त्यांच्यावर कारवाई करा,' या प्रमुख मागणीसाठी रोहणा येथील गावकरी, महिला, मुलाबाळांसह २८ सप्टेंबरला उमा नदीच्या पात्रामध्ये मागण्या पूर्ण होईपर्यंत बेमुदत उपोषणास बसले आहे. विशेष म्हणजे परतीचा जोरदार पाऊस पडत असून, नदीला पूर आला तर अघटीत घडण्याचा धोका निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.



या संदर्भात उपोषण करणाऱ्या ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार खारपाणपट्ट्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनींना गोड पाणी मिळावे तसेच गावागावातील लोकांना पिण्याकरता गोड पाणी प्राप्त व्हावे, या उदात्त हेतूने माजी आमदार बी.टी. देशमुख यांच्या प्रयत्नातून विदर्भात बॅरेज प्रकल्पांना मंजुरी मिळाली होती. मूर्तिजापूर तालुक्यात २००९ मध्ये तीन नदींवर बॅरेज मंजूर केले होते. तालुक्यातील मंगरूळ कांबे प्रकल्पाचे काम कसे तरी रडत पडत पूर्ण केले. रोहणा प्रकल्प एक तप उलटून गेले तरी वनवास सहन करत आहेत. १३ वर्षांपासून उमा बॅरेज प्रकल्पाचे काम पूर्ण झाले नाही.उमा बॅरेज प्रकल्पाचे भूमिपूजन ऑगस्टमध्ये २००९ मध्ये झाले होते. मात्र, हे काम पूर्ण झाले नाही. प्रशासनाने रोहणावासीयांना भूलथापा देऊन त्यांच्याकडून अत्यल्प दराने जमिनी खरेदी करुन फसवणूक केल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

गावकरी बेमुदत उपोषण करणार असल्याबाबत यापूर्वीच निवेदन दिले होते. परंतु त्याबाबत दखल न घेतल्यामुळे रविवार २८ सप्टेंबरपासून बेमुदत उपोषणाला गावकऱ्यांनी सुरुवात केली आहे. उमा बॅरेज प्रकल्प उभा झाला नसून, यामुळे गावकऱ्यांचे हाल होत आहेत. त्यासाठी रोहणा येथील कैलास वर्गट, मीना वर्गट, रामभाऊ वरघट, महानंदा बनसोड, प्रमोद मुळे, चंद्रकला कुऱ्हाडे यांच्यासह गावकरी मुला बाळांसह उमा नदीच्या काठावर बेमुदत उपोषणास बसले आहे.

मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर उमा नदीच्या वाहत्या प्रवाहात उड्या मारुन जीव देणार, असा इशारा उपोषणकर्त्या ग्रामस्थांनी दिला आहे. याची जबाबदारी पाटबंधारे विभाग अमरावती व संबंधित प्रशासन यांच्यावर राहणार असल्याचे रहिवाशांनी म्हटले आहे. बॅरेज प्रकल्पातील मौजे रोहणा गावाचे पुनर्वसन करावे, कलम ११ लागू करण्याची तारीख जाहीर करावी, संयुक्त मोजणी अहवाल, गावाच्या पुनर्वसन साठी जमीन कधी संपादन, गावठाणाचा नकाशा तयार करणे,नागरी सुविधांच्या कामाचा अंदाज पत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता कधी मिळणार, घरांचे मूल्यांकन करून मोबदला कधी मिळणार, नागरी सुविधांच्या कामाची निविदा कधी प्रसिद्ध होणार आधी प्रश्न उपस्थित केले असून, मागण्या मंजूर करून त्या संबंधात लेखी द्यावे, अशी मागणी गावकऱ्यांच्या वतीने केली आहे.

# आदिवासी समाजाच्या वतीने तिवसा तहसील कार्यालयावर धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
तिवसा, दि. २९ :

धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश व्हावा, यासाठी नगर जिल्हातील चौंडीसह राज्यभर धनगर समाज उपोषण-आंदोलन करत रस्त्यावर उतरला आहे. एकीकडे धनगर समाज तीव्र आंदोलन करत अनुसूचित जमातीमध्ये समावेशाची मागणी करत असताना आता आदिवासी समाजाने अनुसूचित जमातीच्या आरक्षणाला धक्का लावू नये, असे सरकारला सुनावले आहे.



तिवसा तालुक्यातील क्रांती सूर्य बिरसा मुंडा आदिवासी विकास बहुउद्देशीय संस्था तिवसा यांच्या नेतृत्वाखाली तिवसा तहसील वर एक दिवसीय धडक धरणे आंदोलन करण्यात आले आहे. आदिवासी समाजाच्या नेत्यांनी धनगर आरक्षणावरून जागरूक होत आम्ही बाघाचे बछडे आहोत, आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही व शासन निर्णय २५ फेब्रुवारी २०२२ मध्ये अनुसूचित जामातीच्या बिंदू २ वरून ८ वर आल्याने आदिवासींवर अन्याय झाला असल्याने बिंदू नियमावलीमध्ये दुरुस्ती करून परत बिंदू क्रमांक २ आणण्यात यावे,असा निर्णय सरकारने घ्यावा. आंदोलनाची तीव्रता वाढवून आमच्या न्याय हक्क प्राप्त करू, आमच्या हिताचे निर्णय झाले पाहिजे, आम्ही बाघाचे बछडे आहोत, असा इशारा क्रांती सूर्य बिरसा मुंडा आदिवासी विकास बहुउद्देशीय संस्था तिवसा यांनी दिला. या वेळी तिवसा तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.राज्यातील धनगर व बंजारा समाजाला आदिवासी सवलती आरक्षण मिळावे म्हणून जोरदार आंदोलन व दबाव आणला जात आहे. मात्र, खरा आदिवासी समाज आज वंचित असून, आमच्या ताटातील अगोदर आम्हाला वाढा. मात्र, आमच्या ताटातील काढून दुसऱ्यांना देत असाल, तर मुळीच सहन करणार नाही. अन्यथा राज्य नव्हे देशभर आंदोलन होईल, याची सरकारने नोंद घ्यावी, असा इशारा दिला आहे. या वेळी क्रांती सूर्य बिरसा मुंडा आदिवासी विकास बहुउद्देशीय संस्था तिवसा बिरसा ब्रिगेडचे पदाधिकारी सुरेश उईके, अर्जुन युवनाते, यंचिन्द्र उईके, मनीष धुर्वे, अरुण मडावी, सुरेश भलावी, सदाशिव उईके, महादेव धुर्वे, दिलीप सयाम, श्रीराम पंधरे, नरेश मडावी, मंगेश भोंदळे, लक्ष्मण भलावी,यशवंत उईके, सुभाष धुर्वे, गजानन सिरसाम, कृष्णा कोकाटे, रामदास उईके यासह आदिवासी बांधव उपस्थित होते.

# दुरुस्तीअभावी १२ रुग्णवाहिका पडून

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २९ :

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचा डोलारा हा जेवढा डॉक्टर्स आणि औषधीच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे, तेवढाच तो या विभागाच्या दिमतीला असणाऱ्या रुग्णवाहिका आणि डॉक्टरांसाठीच्या वाहनांबरही अवलंबून आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील रुग्णालयात सध्या २०० हून अधिक रुग्णवाहिका आहेत. परंतु यापैकी १२ वाहने दुरुस्तीअभावी बंद स्थितीत आहेत.



नादुरुस्त झालेल्या बहुतेक रुग्णवाहिका मेळघाटातील आहेत. त्यामुळे तेथील रुग्णांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. शासनादेशात बदल करून या रुग्णवाहिका रस्त्यांवर धावण्यायोग्य स्थितीत आणाव्या, अशी मागणी होत आहे.

सेमाडोह येथील आरोग्य केंद्राची रुग्णवाहिका टायर खराब झाल्यामुळे महिनाभरापासून बंद आहे.

ग्रामस्थांसह मेळघाटातील स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यासंदर्भात वारंवार तक्रारी केल्या. परंतु त्याचा काही फायदा झाला नाही. अशीच स्थिती इतरही अनेक गावांची आहे. त्यामुळे ऐनवेळी रुग्णवाहिका उपलब्ध होत नाही, असे संबंधितांचे निरीक्षण आहे. शासनाने नव्या डझनभर रुग्णवाहिका घेण्यासाठी जिल्हा परिषदेला डीपीसीतून ३ कोटी रुपयांची तरतूद केली. परंतु एकूण तरतुदीपैकी २० टक्के रक्कम दुरुस्तीवर खर्च करण्याची मुभा जिल्हा शल्य चिकित्सकांना दिली, तशीच मुभा जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना (डीएचओ) न दिल्याने वाहनांची दुरुस्ती रखडली आहे. त्यामुळे या शासन निर्णयात सुधारणेसाठी जि. प. प्रशासनाने राज्य शासनाला साकडे घातले आहे. जि. प.च्या सीईओंनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमोरही हा मुद्दा मांडला. त्यांनी लवकरच तसा बदल शासनादेशात केला जाईल, असे संकेत दिले आहेत. योजनेतून रुग्णवाहिका जि. प.तर्फे ३४१ आरोग्य उपकेंद्र, ६५ आयुर्वेदिक दवाखाने, ५९ प्राथ. आरोग्य केंद्र, आठ ग्रामीण रुग्णालये आणि सहा उपजिल्हा रुग्णालये संचालित केली जातात. त्यासाठी वेगवेगळ्या योजनेतून रुग्णवाहिका उपलब्ध केल्यात.

# ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याची गरज -पालकमंत्री डॉ. भोयर

## पालकमंत्र्यांच्या हस्ते तालुका क्रीडा संकुलाचे लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २९ :

जिल्ह्यातील युवा खेळाडूंना चांगल्या व दर्जेदार सुविधा मिळाल्या पाहिजे, यासाठी आपण सतत प्रयत्नशिल आहोत. ग्रामीण भागातील युवा खेळाडूंमध्ये जिल्ह्याचे आणि देशाचे नावलौकिक करण्याची क्षमता आहे, त्यांना चांगल्या सुविधा पुरवून प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले. वर्धा तालुका क्रीडा संकुलचे लोकार्पण पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. पोलिस अधीक्षक अनुराग जैन, क्रिकेटपटू केदार जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम, उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे, तहसीलदार संदीप पुंडेकर, तालुका क्रीडा अधिकारी संदीप खोब्रागडे, तालुका क्रीडा विकास समिती अध्यक्ष राजू मडावी, सचिव निलेश किटे आदी यावेळी उपस्थित होते.




पालकमंत्री डॉ.भोयर पुढे म्हणाले, जिल्ह्यात अनेक सामाजिक संघटना नि:स्वार्थपणे पुढे येऊन चांगले उपक्रम राबवित आहे. वृक्षलागवड, मुक्तांगण, ऑक्सिजन पार्क असे अनेक कामे सामाजिक संस्था करित आहे. टाटा कन्सलटन्सीच्या माध्यमातून कौशल्य विकास केंद्र याभागात सुरू होणार असून युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण त्यामाध्यमातून मिळणार असल्याचे ते म्हणाले.टेकडी परिसरात असलेल्या नैसर्गिक वातावरणात नागरिक वॉकिंग, योगा करण्यासाठी येत होते. आता चांगल्या दर्जाचे तालुका क्रीडा संकुल उभारण्यात आल्यामुळे इतरही क्रीडा प्रकाराचा लाभ त्यांना घेता येणार आहे. महिला देखील मोठ्या प्रमाणात येत असून सुरक्षेसाठी पोलिसांनी गस्त वाढविण्याच्या सूचना त्यांनी यावेळी पोलिस विभागाला दिल्या.सेलू सारख्या ग्रामीण भागातल्या असलेल्या सुनैना डोंगरे यांनी पोलिसांच्या बॉडीबिल्डींग स्पर्धेत गोल्ड मेडल जिंकून देशाचे नावलौकिक केले आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. जिल्हा क्रीडा संकुल बीओटी तत्वावर देऊन जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाल्या पाहिजे, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. चांगल्या दर्जाचे जलतरण तलाव व नवीन बॅटमिंटन हॉल तयार करण्यासाठी जागा शोधण्याच्या सूचना उपविभागीय अधिकाऱ्यांना पालकमंत्री डॉ. भोयर यांनी केल्या.

क्रिकेटपटू केदार जाधव म्हणाले, वर्धा येथे आल्यावर एक वेगळा विकासाचा दृष्टीकोन पहावयास मिळाला. निसर्गरम्य वातावरणात तालुका क्रीडा संकुल उभारण्यात आले असून युवकांनी आपल्या ऊर्जेचा वापर चांगल्या कामासाठी करावा, असे ते म्हणाले. जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम यांनी प्रास्ताविकात सांगितले की, शहरात जिल्हा क्रीडा संकुल एकच असल्याने तिथे नेहमी खेळाडूंची वर्दळ असायची. शहर परिसरात तालुका क्रीडा संकुल व्हावे, यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शासनस्तरावर प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळे आयटीआय टेकडी परिसरात तालुका क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध झाली व निधी सुध्दा उपलब्ध झाला त्यातून क्रीडांगणाचे समपातळीकरण, दोनशे मीटर धापनपथ, मल्टीपरपज प्ले ग्राऊंड, व्हॉलीबॉल क्रीडांगण, कबड्डी व खो खो क्रीडांगण, रिटर्निंग व्हॉल, प्रसाधनगृह व अन्य व्यवस्था करण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नमो मॅरेथॉन स्पर्धेत पुरुष गटातून प्रथम क्रमांक सनी फुसाटे, द्वितीय शिवम बड्डे, तृतीय क्रमांक प्रयास कोल्हे आणि महिला गटातून प्रथम क्रमांक मधुरा पहाडे, व्दितीय यशस्वी राठोड, तृतीय क्रमांक सेजल चौधरी यांना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर व क्रिकेटपटू केदार जाधव यांच्याहस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक अनुराग जैन, राजू मडावी यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन ज्योती भगत यांनी केले तर आभार संदीप खोब्रागडे यांनी मानले.

# सुभाष क्रीडा मंडळाने साकारले अयोध्याचे राम मंदिर

## मंडळाचे यंदा ५५ वे वर्ष ; देवीच्या दर्शनासाठी भाविकांची होतेय गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २२ :

कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अयोध्या येथील मंदिरात श्री रामाच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठा सोहळा मागील वर्षी पार पडला. यंदा अयोध्या येथील श्री रामाचे मंदिर काय आहे याची ओळख व्हावी, यासाठी शहरातील मोठे वडगाव परिसरातील सुभाष क्रीडा मंडळाने पुढाकार घेत दीड महिन्याभराच्या अथक परिश्रमातून अयोध्या येथील श्रीराम मंदिराची प्रतिकृती हुबेहुब साकारली आहे.



सुभाष क्रीडा मंडळाचे यंदा ५५ वे वर्ष आहे. ५४ वर्षापूर्वी मंडळाची स्थापना हरिभाऊ लंगोटे, धर्माजी लंगोटे यांनी केली आहे. अयोध्या येथील राम मंदिराचा भव्य देखावा साकारला आहे.

विशेष म्हणजे संपुर्ण देखावा बांबू, प्लॅस्टर, कापड आणि गवतापासून बनवलेला आहे. कलकत्त्याहून आलेल्या ३० कारागिरांनी तब्बल दीड महिना दिवसरात्र काम करून तयार केला आहे. यात अध्यक्ष संजय लंगोटे, प्रकाश लंगोटे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

विविध धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी नऊ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी येथे आयोजित केली जाते. यामध्ये अन्नदान, रक्तदान, गरीबांना मदत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यांसारख्या समाजोपयोगी उपक्रमांसह भजन, दांडिया अशा कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे.

याच कार्यामुळे मंडळाला पुरस्कार देखील मिळाले आहेत. देखाव्यातून भारतीय संस्कृतीचे जतन करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. वारकरी भजन मंडळ आणि आदिवासी गोंडी नृत्यातून सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला जात आहे.

### महसूल व वनविभाग कोर्ट वियमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

क.स.म.ज./वह.नाम/(शहर)/कावि-१४४१/२०२५ दिनांक : २६/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-स अ.वि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. सैय्यद साहीया परवेज अली सैय्यद मुजफ्फर अली, रा. प्लॉट नं. १०३, अयप्पा नगर, नागपूर यांचा अर्ज दिनांक १९/०८/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार सैय्यद साहीया परवेज अली सैय्यद मुजफ्फर अली, रा. प्लॉट नं. १०३, अयप्पा नगर, नागपूर यांनी त्यांच्या बहिणीच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू नुरुल सहर सैय्यद मुजफ्फर अली यांचा जन्म दिनांक ०६/०६/१९६० रोजी मोमीनपुरा, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### महसूल व वनविभाग कोर्ट वियमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

क.स.म.ज./वह.नाम/(शहर)/कावि-१४४३/२०२५ दिनांक : २६/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-स अ.वि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. [illegible]

-: जाहीरनामा :-

[illegible]

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### महसूल व वनविभाग कोर्ट वियमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

[illegible]

-: जाहीरनामा :-

[illegible] सदरहू सैय्यद सरोश अली सैय्यद मुजफ्फर अली यांचा जन्म दिनांक ११/०२/१९६६ रोजी मोमीनपुरा, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### महसूल व वनविभाग कोर्ट विधमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

[illegible]

-: जाहीरनामा :-

[illegible] हॉस्पीटल, नागपूर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### महसूल व वनविभाग कोर्ट वियमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

[illegible]

-: जाहीरनामा :-

[illegible] त्यांच्या राहते घरी भीम नगर, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### जाहिर सूचना

कोर्ट व्हिमान २ रे सह दिवाणी व्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक

एम. जे. सी. : ३०/२०२५ निश्चित दिनांक ३०/१०/२०२५
प्रक्रिया क्र. २१९५

अर्जदार: १. श्रीमती माया विजय राठोड, वय ५४ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. कु. अश्विनी विजय राठोड, वय २८ वर्षे, व्यवसाय खाजगी
३. आदित्य विजय राठोड, वय २६ वर्षे, व्यवसाय - खाजगी
सर्व रा. शितलवाडी, रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर.
प्रतिवादी : नाही

मृत व्यक्तीचे नाव : दिवंगत विजय बळीराम राठोड, यांचे निधन दिनांक २६/०९/२०२१ रोजी कु. नल हॉस्पिटल, नागपूर येथे झाले. ते त्यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र, भंडारबोडी, ता. रामटेक, जि. नागपूर येथे हेल्थ असिस्टंट पदावर कार्यरत होते.

वरील अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन क्र. VIII of 1827, नियम २, प्रकरण १ अंतर्गत या माननीय न्यायालयाकडे लीगल हीयर प्रमाणपत्र देण्याबाबत अर्ज केला आहे.

हि जाहिर सूचना सर्वांना कळविण्यात येते की, जर कोणास या अर्जदारांच्या हक्काबाबत हरकत असेल, तर त्यांनी दिनांक ३०/१०/२०२५ रोजी, सकाळी वेळ ११ वा., कोर्ट विद्यमान २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रामटेक येथे हजर राहून आपली हरकत दाखल करावी.

जर ठरलेल्या तारखेपर्यंत कोणतीही समाधानकारक हरकत दाखल झाली नाही, तर अर्जदारांच्या दाव्याची चौकशी करुन योग्य वाटल्यास व कायद्यानुसार पात्र असल्यास अर्जदारांना उत्तराधिकार प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईल.

माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह, दिनांक २६/०९/२०२५.

सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर रामटेक

### दुचाकीची दुचाकीला धडक, भीषण अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी

आष्टी(श): आष्टी ते मोर्शी मार्गावर असलेल्या खुले कारागुह प्रवेशद्वारासमोर मोर्शी येथील दोघे आष्टी येथे दुचाकीवर जात असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकी एमएच २९ सीजी४०४२ क्रमांकाच्या दुचाकीने जबर धडक दिली त्यात राजू उर्फ हेमंत निंभोरकर वय (५१)रा. लिंगापूर याला डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्याचा जागीच झाला. ही घटना दि.२७रोजी दुपारी २वाजता घडली. सविस्तर असे की, आष्टी तालुक्यातील लिंगापूर येथील राजू उर्फ हेमंत जगन्नाथ निंभोरकर व उमेश उकंद गोडबोले हे दोघे दुचाकी एमएच ३२,ए झेड ४४३० या दुचकीवर मोर्शी येथे काही कामानिमित्त गेले होते.कामे झाल्यावर मोर्शी येथून आष्टी येथील लिंगापूर येथे जाण्यासाठी निघाले.

### Change Of Name

MY OLD NAME WAS **BHUSHAN KUMAR**. NOW MY NEW NAME IS **BHUSHAN SHIVCHANDRA PAL.**
**ADD :** P.NO. 47,F.NO.301, GURUDEEP PLAZA,BHOSLEWADI,LASHKARIBAGH,NAGPUR - 440017.

MY OLD NAME WAS **LUCKY MANJUR SHOTA**. NOW MY NEW NAME IS **LUCKY MANJUR SAHOTA.**
**ADD :** PLOT NO.81, ABHIRAJ COLONY, NEAR RAJENDRA HARDWARE,JARIPATKA POLICE STATION ROAD, NARA, NAGPUR - 440014.

MY OLD NAME WAS **MALEKA ANJUM**. NOW MY NEW NAME IS **MALEKA KHAN WAJID KHAN.**
**ADD :** 212, MIRZA GALLI, SIDHI CHAWL KHADAN , NAGPUR - 440002.

MY OLD PASSPORT NO. **F8696582**. MY OLD NAME WAS **MOHAMMED NIHAL KHAN**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD NIHAL KHAN.**
**ADD :** PLOT NO 895 KATOL ROAD NEAR DURGA MATA MANDIR CHHAONI NAGPUR 440013.

MY OLD NAME WAS **NAZMA BEGUM**. NOW MY NEW NAME IS **SHEIKH NAZMA SHEIKH HABIB.**
**ADD :** HOUSE NO.126 WAGDHARA HINGNA NAGPUR 441110.

MY OLD NAME WAS **FARUKH AKBANI / MHFARUKH AKBANI**. NOW MY NEW NAME IS **FARUK AKBANI.**
**ADD :** FLAT NO. 208, RATAN TOWER NO.2 SHANTI NAGAR NAGPUR - 440002.

MY OLD NAME WAS **AMREEN BEGUM MOHAMMED RAFEEQ**. NOW MY NEW NAME IS **MUSKAN AMREEN SHAIKH KAYUM.**
**ADD :** NEAR JAMA MASJID AT VIDUL UMERKHED DISTT YAVATMAL 445206.

I **AAISHA HUMERA** HAVING PASSPORT NO. **L5120905**, FILE NO. **NG106941892613** WAS EXPRIY ON DT. 18/09/2023, BEFORE MARRIAGE MY NAME WAS **AAISHA HUMERA D/O. HABIBUR REHMAN**,
NOW I AM MARRIED MY NEW NAME WAS **AAISHA HUMERA SAMAN HASSAN.**
**ADD:-** 8- 1- 523/78, PL. NO. 78, BRINDAVAN COLONY, TOLICHOWKI, GOLCONDA, HYDERABAD, TELANGANA - 500008



# गरमागरम पेस्तो पास्ता

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, पास्ता खाण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये जाण्याची गरज नाही. तुम्ही घरच्या घरीच पेस्तो पास्ता बनवू शकता. या निमित्ताने मित्रमंडळींसोबत मस्त पास्ता पार्टीही करता येईल.

सामग्री: तीन कप पास्ता, चमचाभर ऑलिव्ह ऑईल, एक चमचा लसूण पेस्ट, एक सिमला मिरची, अर्धा कप फ्रेश क्रीम, पाव कप दूध, चमचाभर चिली फ्लेक्स, किसलेलं चीझ, मीठ.

पेस्तो सॉससाठी– पाव कप अक्रोड, वाटीभर बासिल, तीन चमचे ऑलिव्ह ऑईल, दोन लसूण पाकळ्या

कृती: पेस्तो सॉस बनवण्यासाठी सर्व घटक मिक्सरच्या भांड्यात घालून वाटून घ्या. पास्ता उकडून घ्या. आता एका कढईत ऑलिव्ह ऑईल घाला. थोडं गरम झाल्यावर त्यात लसूण पेस्ट घालून थोडं परतून घ्या. मग चिरलेली सिमला मिरची घालून परता. आता त्यात पेस्तो सॉस, फ्रेश क्रीम, दूध, चिली फ्लेक्स आणि मीठ घाला. दोन मिनिटं ढवळत रहा. यानंतर त्यात उकडलेला पास्ता घालून हलवून घ्या. दोन मिनिटं शिजू द्या. वरून किसलेलं चीझ घाला. गरमागरम खा.

# जोश

## शेर की जुबानी

मंजिल का नाराज
होना भी जायज था।
हम भी तो अजनबी
राहों से दिल लगा
बैठे थे।

तुम नजर नहीं आते तो
आजकल शाम नहीं ढलती।
बस उदास सा है सबकुछ,
दिल से दिल की बात नहीं
निकलती।

मन का कोई
कोना अंधेरे में
ना रहे,
एक चिराग भीतर
भी जलाओ यारों।

# मोठी नोकरी सोडून नफ्याची शेती

**अचिव्हर**



शेती हा आतबट्ट्याचा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. शेतात धाडसी प्रयोग करायला अनेकजण धजत नाहीत. पण विनित पटेल हा तरुण त्याला अपवाद ठरला. त्याने आठ लाख वार्षिक पगार असलेली नोकरी सोडली आणि शेतीत विविध प्रयोग केले. सुरुवातीला अपयश आले; पण त्याने तो खचला नाही. बाजाराचा नीट अभ्यास केल्यानंतर त्याने शेतात काही पिकांचे उत्पादन घ्यायला सुरुवात केली. आज तो वार्षिक २४ लाखांची कमाई करत आहे. त्याने गावातील २५ जणांना रोजगारही दिला आहे.

मध्य प्रदेशमधील बालाघाट जिल्हातील परसवाडा तहसीलअंतर्गत अरंडिया हे गाव आहे. येथे राहणारा विनीत पटेल अभियंता म्हणून नोकरी करत होता. त्याला वार्षिक आठ लाख रुपये पगार होता; पण त्याचे या नोकरीत मन लागेना. मग त्याने नोकरीला रामराम ठोकला आणि गावाकडे आला. त्याचे वडील संपत पटेल हे पारंपारिक शेती करत होते. शेतात धान, गव्हू आणि हरभऱ्याची शेती होत होती; पण विनीतने नवीन प्रयोग केला. त्याने चारही हंगामात येणाऱ्या वेलवर्गीय पिकांची लागवड केली. काकडी, भोपळा, कारले, दुधी भोपळा आणि इतर हंगामी पालेभाज्यांचीही शेती त्याने सुरू केली.

विनीत सहा एकर शेती करतो. तो सध्या प्रति एकर चार लाखांहून अधिकची कमाई करत आहे. स्थानिक आणि इतर राज्यातील बाजारपेठेतील रोजच्या भावांचे तो सकाळीच अपडेट घेतो. कोणत्या बाजारपेठेत काय दर आहे, याचा अंदाज घेण्यासाठी त्याने अनेक ठिकाणी व्यापारी आणि भाजी विक्रेत्यांशी संपर्क ठेवला आहे. त्या माध्यमातून त्याला चांगली किंमत मिळते. वर्षभरात त्याची कमाई १८ ते २४ लाखांच्या घरात पोहचली आहे.

विनीतने अगोदर शेतीचे तंत्र समजून घेतले. त्यानंतर बाजारपेठांचा अभ्यास केला. त्यासोबतच शेतीतज्ज्ञ, शेतकी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक यांच्याशी संपर्क वाढवला. परिसरातील प्रयोगशील आणि अनुभवी शेतकऱ्यांकडून बरीच माहिती घेतली. त्यानंतर संकरीत आणि देशी वाण, त्यांची गुणवत्ता, त्यांना लागणारा खर्च, आंतरमशागत, आंतरपीक पद्धत आणि पाणी व्यवस्थापन याचा अभ्यास आणि अंमलबजावणी केली. त्यातून यश हाती आले. तो आता पशूपालन करण्याचा विचार करत आहे.

**टेक्नो टॉक**

## भारतात चालकविरहीत बससेवा



भारतीय तंत्रज्ञान संस्थे (आयआयटी, हैदराबाद) ने आपल्या कॅम्पसमध्ये देशातील पहिली पूर्णपणे कृत्रिम प्रज्ञेवर चालणारी ड्रायव्हरलेस बस सेवा सुरू केली आहे. टेक्नोलॉजी इनोव्हेशन हब ऑन ऑटोनॉमस नेव्हिगेशन या केंद्रात तयार करण्यात आलेल्या या बस स्मार्ट मोबिलिटीचा नवा अध्याय आहेत. या अत्याधुनिक बसमुळे केवळ कॅम्पसमधील प्रवास सोपा होणार नाही, तर भारतातल्या ऑटोनॉमस व्हेईकल क्षेत्रातही नवे युग सुरू झाले आहे.

'तिहान'च्या प्रो. पी. राजलक्ष्मी यांच्या नेतृत्वाखालील टीमने या चालक विरहित बसचे यशस्वी डिझाइन करण्यात आले आहे. हा प्रोजेक्ट सर्वसामान्यांसाठी खुला करण्यात आल्यानंतर अवघ्या काही महिन्यांमध्ये दहा हजारांहून अधिक प्रवाशांनी या बसमधून प्रवासाचा अनुभव घेतला. त्यापैकी नव्वद टक्क्यांहून अधिकजणांनी त्याबाबत समाधान व्यक्त केले. सहा सीटर आणि १४–सीटर अशा दोन प्रकारांमध्ये या ड्रायव्हरलेस बस उपलब्ध आहेत. यामध्य अडथळा ओळखणारी यंत्रणा असल्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित बनतो. बस आपल्या मार्गावर अचानक समोर येणाऱ्या व्यक्ती, वाहन किंवा अडथळ्याची जाणीव करून आपली गती आपोआप कमी–जास्त करू शकते. या तंत्रज्ञानाला सुरक्षिततेचे प्रमाणपत्र मिळाले आहे. म्हणजेच या बसची चाचणी भारतीय रस्त्यांवर यशस्वीरीत्या पार पडली आहे. हा प्रकल्प फक्त आयआयटी कॅम्पसपुरता मर्यादित नसून आता देशात अन्यत्रही विकसित होत आहे. या सुविधेमुळे देशातील कंपन्या आणि संशोधन संस्थांना आवश्यक डेटा आणि इन्फ्रास्ट्रक्चर मिळणार आहे. याचबरोबर 'तिहान'द्वारे 'एआय' आणि 'मशिन लर्निंग' क्षेत्रात नवे इनोव्हेटर्स तयार करण्यावर भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण मोड्यूल तयार केले जात असून, भविष्यात भारताला या क्षेत्रामध्ये सक्षम बनवणे हे यामागील प्रमुख उद्दिष्ट आहे.

# आईसोबत खटके उडतात!

**मॅच मेकीग**



गेल्या दोन वर्षांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. आम्ही दोघं सध्या पीएचडी करत असून वर्षभरापासून लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये आहोत. माझ्या आईला आमचं असं 'लिव्ह इन' मध्ये रहाणं पसंत नाही. माझे तिच्यासोबत खटके उडतात. मी तीन वर्षांचा असताना माझ्या पालकांचा घटस्फोट झाला. त्यानंतर तिनेच मला वाढवलं. सध्या मी शिकतोय. त्यामुळे माझ्या शिक्षणाचा खर्च तीच उचलते आहे. पण मी लिव्ह इनमध्ये रहायला सुरूवात केल्यापासून ती सारखी माझ्यावर चिडते. दुसरीकडे माझी मैत्रीणही विचित्रच आहे. आम्ही काही काळ आमच्या कुटुंबासोबत राहून आलो की आमच्यात मतभेद होतात. त्यातच माझी मैत्रीण खूप रागीट आहे. ती नेहमीच माझ्यावर हक्क गाजवण्याचा प्रयत्न करते. आई आणि मैत्रीण यांच्यामध्ये मी अडकून पडलोय. मला नैराश्य आलंय आणि काय करावं ते कळत नाही. मला मार्गदर्शन करा.

उत्तर : 'लिव्ह इन रिलेशनशीप' ही पूर्णपणे आधुनिक संकल्पना आहे. 'लिव्ह इन' म्हटलं की भल्याभल्यांचे डोळे विस्फारतात. आधीच्या पिढीला तर ही बाब फारशी मान्य होणार नाही. तसंच ही संकल्पना आपल्या भारतीय संस्कृतीत बसत नाही. त्यामुळे तुझ्या आईला लिव्ह इन रिलेशनशीप ही संकल्पना मान्य नसणं अगदी स्वाभाविक आहे. या नात्याबद्दल तू तिला सांग. तुझ्या भविष्यातल्या योजनांची माहिती दे. आई आणि पत्नी/मैत्रीण यांना जोडणारा धागा तूच आहेस. दोघींच्या कलाने घेऊन त्यांना समजावून सांग. शेवटी प्रत्येकाला आपल्या पद्धतीने जगण्याचा अधिकार आहे. पण इतरांची मतंही ऐकून घे.

# विकसित भारत रोजगार योजनेचा तरुणांना आधार

**नोकरी हवीये?**



पंतप्रधान विकसित भारत रोजगार ही एक लाख कोटी रुपयांची योजना सरकारने लागू केली आहे. या योजनेअंतर्गत, खासगी कंपन्यांमध्ये पहिली नोकरी मिळवणाऱ्या तरुणांना सरकारकडून १५ हजार रुपयांची प्रोत्साहन रक्कम दिली जाईल.

या योजनेअंतर्गत, दोन वर्षांच्या कालावधीत देशात साडेतीन कोटींहून अधिक रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. यापैकी एक कोटी ९२ लाख लाभार्थी हे प्रथमच कामगार क्षेत्रात प्रवेश करतील. 'ईपीएफओ'मध्ये पहिल्यांदा नोंदणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १५ हजार रुपये प्रोत्साहन रक्कम दिली जाईल. एक लाख रुपयांपर्यंत पगार असलेले कर्मचारी यासाठी पात्र असतील.

या योजनेअंतर्गत पहिला हप्ता सहा महिन्यांच्या सेवेनंतर आणि दुसरा हप्ता हा बारा महिन्यांच्या सेवेनंतर म्हणजेच एक वर्षानंतर आणि कर्मचाऱ्याने आर्थिक साक्षरता कार्यक्रम पूर्ण केल्यानंतर देण्यात येईल. बचत करण्याच्या सवयीला प्रोत्साहन देण्यासाठी या प्रोत्साहन राशीचा एक भाग हा बचत (सेव्हिंग अकाऊंट) खाते किंवा ठेव खात्यात निश्चित कालावधीसाठी ठेवला जाईल. नंतरच्या काळात कर्मचारी ते पैसे काढू शकतील.

**मोबाईल मॅनिया**

## सर्वत्र मिनी थ्रीडी कलेक्टेबल इमेजेस



इंस्टाग्राम स्टोरी असो किंवा व्हॉट्सअॅप स्टेटस, अलिकडे सर्वत्र मिनी थ्रीडी कलेक्टेबल इमेजेस (नॅनो बनाना ३डी फिगरिन) पहायला मिळत आहेत. सेलिब्रिटींपासून सामान्य लोकांपर्यंत सर्वजण या ट्रेंडमध्ये सहभागी होत आहेत. त्याबाबतची खास गोष्ट म्हणजे ती कोणत्याही तांत्रिक कौशल्याशिवाय बनवता येते आणि त्यासाठी पैसे खर्च करावे लागत नाहीत, म्हणूनच लोक त्यांच्या थ्रीडी इमेजेस तयार करून शेअर करत आहेत.

गुगलच्या जेमिनी २.५ फ्लॅश इमेज टूलला 'नॅनो बनाना' असे नाव देण्यात आले आहे. हे टूल खऱ्या इमेजसारखी दिसणारी ३डी इमेज तयार करू शकते. तुम्हाला नॅनो बनाना ३डी फिगरिन बनवायची असेल, तर जेमिनी ॲप किंवा वेबसाइटची मदत घ्यावी लागेल. इमेज तयार करण्यासाठी गुगल जेमिनीच्या ॲप किंवा वेबसाइटवर जा आणि तुमची इमेज अपलोड करा. यानंतर, ३डी फिगरिन बनवण्यासाठी प्रॉम्प्ट एंटर करावा लागेल. यासाठी गुगलने एक्सवर एक नमुना प्रॉम्प्ट शेअर केला आहे. प्रॉम्प्ट दिल्यानंतर काही वेळातच तुमच्यासाठी एक थ्रीडी फिगरिन तयार होईल.

थ्री डी फिगरिन व्हिडीओमध्ये रूपांतरित करण्याचा एक सोपा आणि विनामूल्य मार्ग आहे. ग्रॉक एआय यासाठी मदत करू शकते. यासाठी ग्रॉक एआयचे ॲप उघडा. त्यात 'थ्री डी फिगरिन' अपलोड करा आणि प्रॉम्प्टमध्ये मेक व्हिडीओ असे लिहा. काही सेकंदात, तुमचा व्हिडीओ साउंड क्लिपसह तयार होईल. तुम्ही तो रिफाइन करू शकता किंवा तुम्हाला आवडत असल्यास फोनमध्ये सेव्ह करू शकता. दुसरा मार्ग म्हणजे क्लिंग एआयच्या वेबसाइट किंवा ॲपवर जा आणि साइन इन करा. आता डाव्या कोपऱ्यात दिसणाऱ्या व्हिडीओ पर्यायावर टॅप करा. आता तुम्हाला इमेज अपलोड करण्यास सांगितले जाईल. बॉक्समध्ये इमेज अपलोड करा आणि व्हिडीओ जनरेट करण्यासाठी प्रॉम्प्ट लिहा. काही सेकंदात व्हिडीओ तुमच्यासमोर येईल.

# डेनिम शर्टचा स्टायलिश अंदाज

**फॅशन पॅशन**



दोस्तांनो, एक डेनिम शर्ट तुमचा लूक पूर्णपणे बदलू शकतो. तुम्ही हा शर्ट वेगवेगळ्या पद्धतीने कॅरी करू शकता. शर्ट एकच असला तरी वेगवेगळे लूक मिळवू शकता. चला तर मग डेनिमचा हा शर्ट कसा कॅरी करायचा ते पाहु या.

* नेहमीचा पांढरा शर्ट ठेवा बाजूला आणि डेनिम शर्टने कूल लूक मिळवा. कोणत्याही रंगाच्या चिनोजवर हा शर्ट कॅरी करता येईल. यासोबत व्हाईट स्नीकर्स घाला. स्टार्ट अपचे मालक कॅज्युअल मिटगला हा लूक कॅरी करू शकतात. यासोबतच डिनर कवा कॅज्युअल पार्टीलाही तुम्ही डेनिम शर्ट घालू शकता.

* डेनिम शर्ट आणि शॉर्टस हे कॉम्बिनेशनही छान दिसतं. तुम्ही न्यूट्रल रंगाची शॉर्टस विकत घ्या. त्यावर डेनिम शर्ट घाला. यासोबत ब्राउन रंगाच्या लोफर्स शोभून दिसतील. कॅज्युअल आउटिंगला हा लूक कॅरी करा.

* सौम्य रंगाचा डेनिम शर्ट आणि डार्क ब्लू जीन्स कॅरी करून डेनिम ऑन डेनिम लूक मिरवता येईल.

* डेनिम शर्टचा वापर लेअरिगसाठीही करता येईल. पांढरा टी शर्ट त्यावर डेनिम शर्ट आणि ब्लॅक जीन्स हा पेहराव झक्कास दिसेल.

* काळ्या फॉर्मल पँटवर डेनिम शर्ट उठून दिसतो.

* मिक्स अँड मॅचचं तंत्र फक्त मुलींपुरतं मर्यादित नाही. मुलंही आता अशी फॅशन करत आहेत. डेनिम शर्ट ब्लेझार पँटसोबतही कॅरी करता येईल.

# व्यायामानंतरही का वाढतं वजन?

**फिटनेस फंडा**



दोस्तांनो, आपण व्यायाम सुरू करतो. व्यायाम सुरू केल्यानंतर खरं तर वजन कमी व्हायला हवं. पण सुरूवातीच्या टप्प्यात ते वाढलेलं दिसतं. व्यायाम सुरू केल्यानंतर साधारण आठवडाभरातच वजन कमी व्हावं अशी आपली अपेक्षा असते. मग आपण वजन काट्यावर उभे राहतो आणि आधीपेक्षा वाढलेलं वजन बघून आपले डोळे विस्फारतात. व्यायाम सुरू केल्यानंतर का वाढतं वजन? जाणून घेऊ.

* व्यायाम सुरू केल्यानंतर स्नायूंमध्ये वेदना जाणवतात. स्नायूंमधल्या टिश्यूंवर ताण आल्याने असं होतं. व्यायाम सुरू केल्यानंतर एक–दोन दिवसांनी हा त्रास सुरू होतो. यामुळे वजन थोडं वाढू शकतं. स्नायूंमधल्या या वेदना तात्पुरत्या स्वरूपाच्या असतात आणि साधारण दोन आठवड्यांनी थांबतात.

* नव्या व्यायामाला सुरूवात केल्यानंतर स्नायू बचावात्मक पवित्रा घेतात. या टप्प्यात शरीरात पाणी साठून राहू शकतं. यामुळे स्नायू सुजल्यासारखे वाटतात. शरीरात पाणी साठून राहिल्याने वजन वाढतं.

* स्नायूंमध्ये पेशींसह पाणीही असतं. व्यायामाला सुरूवात केल्यानंतर स्नायूंचा आणि त्यातही पायाच्या स्नायूंसारख्या मोठ्या आकाराच्या स्नायूंचा आकार वाढू लागतो. पण फॅट्सच्या तुलनेत स्नायू कमी जागा व्यापतात. त्यामुळे वजन वाढलं तरी तुम्ही बारीक दिसता. अर्थात ही वजनवाढ वाईट नसते. उलट तुम्ही आधीपेक्षा जास्त तंदुरुस्त होता.




# कारकिर्दीसाठी वेगळे पर्याय

**करीअरवेध**

पूर्वी डॉक्टर किंवा इंजिनीयर झाले म्हणजे चांगल्या पगाराची नोकरी मिळणार असे सर्रास मानले जायचे; पण आता स्वतःची ओळख निर्माण करण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. त्यामुळे चांगले पैसेदेखील मिळतात आणि ओळखदेखील तयार होते. आजच्या काळात तुम्ही आयआयटी किंवा नीट उत्तीर्ण झाला नसलात तरी निराश होण्याची गरज नाही. आजच्या युगात, कारकिर्दीचे असे अनेक पर्याय आहेत, जे कौशल्य आणि सर्जनशील विचारांना प्राधान्य देतात.

*** डिजाइन :**

आता वेबसाइट किंवा ॲप फक्त काम करण्यासाठी नाही, तर त्यांचा लूकदेखील (यूजर एक्सपिरियन्स आणि यूजर इंटरफेस) चांगला हवा असतो. डिझायनर्स हेच काम करतात. टेक कंपन्यांपासून ई–कॉमर्स आणि फिनटेक स्टार्टअप्सपर्यंत सर्वत्र त्यांची आवश्यकता आहे. या क्षेत्रात सुरुवातीचा पगार दर वर्षी सहा ते दहा लाख रुपये असू शकतो. कामात पारंगत झाल्यावर तुम्ही २० ते २५ लाख रुपये कमवू शकता.

***डिजिटल मार्केटिंग :**

आजच्या जगात कंपन्यांपासून नेत्यांपर्यंत सर्वांना डिजिटल स्पेसची गरज भासते. एसइओ, पेड जाहिराती, कंटेंट स्ट्रॅटेजी आणि सोशल मीडिया ट्रेंड समजून घेणाऱ्या डिजिटल मार्केटर्सना आज मोठी मागणी आहे. या क्षेत्रात फ्रेशर्सना पाच ते आठ लाख रुपये पगार मिळू शकतो आणि तज्ज्ञ पातळीवर ते वीस लाख रुपयांपर्यंत कमावू शकता.

***एथिकल हॅकिंग आणि सायबर सुरक्षा :**

जग ऑनलाइन होत असताना सायबर सुरक्षेची मागणीदेखील वाढत आहे. कंपन्या नैतिक हॅकर्सना कामावर ठेवतात, जेणेकरून ते खऱ्या हॅकर्सच्या आधी त्यांच्या सिस्टीममधील कमतरता शोधू शकतात. या क्षेत्रात फ्रेशर्सना वार्षिक आठ ते दहा लाख रुपये पगार मिळू शकतो आणि तज्ज्ञ पातळीवर तीस लाख रुपयांपर्यंत कमावता येतात.

*** ॲनीमेशन आणि गेम डिझाइन :**

ओटीटी, गेमिंग ॲप्स आणि व्हर्च्युअल रियलिटीने ॲनिमेशन आणि व्हीएफएक्स इंडस्ट्री उच्च शिखरावर नेले आहे. यामध्येदेखील उत्तम करियर घडू शकते. सुरुवातीली तुम्ही वर्षाला चार ते आठ लाख रुपये कमवू लागता. पोर्टफोलिओ चांगला असेल तर पुढे तुम्ही १५ लाख रुपये किंवा त्याहून अधिक कमवू शकता.

*** सायकॉलोजी आणि मानसिक आरोग्य :**

आता लोक मानसिक आरोग्याबद्दल जागरूक होत आहेत. शाळा, कार्यालय, रुग्णालय किंवा खासगी थेरपी क्लिनिक, सर्वत्र मानसशास्त्रज्ञांना मोठी मागणी आहे.

# भोपाळजवळची प्रेक्षणीय हिल स्टेशन्स

**भटकंती**



भारतात भन्नाट भटकंतीसाठी अनेक ठिकाणे आहेत. ऐतिहासिक किंवा निसर्गाच्या सानिध्यात शांततेत वेळ घालवण्यासाठी अनेकजण या ठिकाणांना भेट देण्यासाठी जात असतात. हिल स्टेशन्सदेखील जगभरातील लाखो पर्यटकांना आकर्षित करतात. मध्य प्रदेशची राजधानी असलेल्या भोपाळ शहराच्या आसपास अनेक सुंदर हिल स्टेशन्स आणि पर्यटनस्थळे आहेत. ती स्वर्गापेक्षा कमी नाहीत! येथील हिरवळ, धबधबे, ऐतिहासिक किल्ले आणि धार्मिक स्थळे पर्यटकांना एक वेगळच अनुभव देतात.

*पंचमढी

भोपाळपासून सुमारे २०६ किलोमीटर अंतरावर असलेल्या पंचमढीला सातपुड्याची राणी म्हटले जाते. हे ठिकाण जोडप्यांसाठी, कुटुंबासाठी आणि मित्रांसाठी एक परिपूर्ण ठिकाण आहे. येथील बी फॉल्स, अप्सरा विहार आणि पांडव गुहा पर्यटकांना आकर्षित करतात. जवळच असलेल्या राष्ट्रीय उद्यानात तुम्हाला हिरवीगार निसर्ग, जंगले आणि वन्य प्राणी देखील पाहायला मिळतील.

पाताळकोट खोरे

पाताळकोट हे ठिकाण म्हणजे भोपाळपासून २५६ किलोमीटर अंतरावर असलेली एक दरी आहे, जी घनदाट जंगलांनी आणि उंच झाडांनी वेढलेली आहे. ट्रेकिंग आणि ॲडव्हेंचरची आवड असलेल्यांसाठी हे ठिकाण उत्तम आहे. येथे पोहोचल्यानंतर निसर्गाच्या कुशीत पोहोचल्याचा अनुभव येतो. जवळचे छिंदवाडा शहर स्थानिक पदार्थांची चव चाखण्यासाठी आणि भेट देण्यासाठी एक उत्तम ठिकाण आहे.

*मांडू

भोपाळपासून २८७ किलोमीटर अंतरावर असलेले मांडू हे जहाज महाल आणि प्राचीन वास्तुकलेसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणाचे सौंदर्य पाहून एखाद्या युरोपीयन शहरात असल्याचा भास होतो. दोन तलावांच्या मध्ये बांधलेला जहाज महाल एखाद्या बोटीसारखा दिसतो आणि ही त्याची सर्वात मोठी खासियत आहे. मांडू हे त्याच्या ऐतिहासिक वारशामुळे आणि सुंदर बागांमुळे पर्यटकांचे आवडते ठिकाण बनलेलं आहे.

मायकेल हिल्स

भोपाळपासून २८५ किलोमीटर अंतरावर असलेल्या अमरकंटकजवळील मायकेल हिल्सवरून घनदाट जंगल आणि नद्यांचे अद्भूत दृश्य पाहता येईल. येथून नर्मदा आणि वनगंगा नद्यांचा संगम दिसतो. अमरकंटक शहर धार्मिक दृष्टिकोनातून देखील खूप खास आहे आणि वीकेंड गेटवेसाठी एक उत्तम पर्याय आहे.

*सांची स्तूप आणि भोजपूर मंदिर

नैसर्गिक सौंदर्याव्यतिरिक्त भोपाळमध्ये अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळेदेखील आहेत. तिसऱ्या शतकात सम्राट अशोक यांनी बांधलेल्या सांची स्तूप बौद्ध धर्माच्या प्रमुख स्मारकांमध्ये गणला जातो. भोपाळपासून ३२ किलोमीटर अंतरावर असलेल्या भोजपूर मंदिरात अपूर्ण असलेले जगातील सर्वात मोठे शिवलिंग आहे.

## सरकार शेतकऱ्यांना मदत करण्याच्या भूमिकेत : चंद्रशेखर बावनकुळे

# ५० लाख हेक्टरवरील पिकांचे पंचनामे पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

राज्यातील कोणताही शेतकरी हा पंचनाम्यापासून सुटू नये, यासाठी आम्ही जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांच्यासोबत बैठक घेतली आहे. नैसर्गिक आणि अनैसर्गिक परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, पण कुठल्याही शेतकऱ्यांच्या जमिनीचे पंचनामे सुटू नाही याची काळजी महाराष्ट्र सरकार घेत आहे, असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.



चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, नेत्यांच्या दौऱ्यामध्ये अनेक अधिकारी त्यांच्यासोबत असतात, अधिकारी आणि कर्मचारी जर फील्डवर राहिले तर शेतकऱ्यांना खरी मदत होईल. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूरच्या कळमेश्वर मध्ये झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यात आली. कमळेश्वर तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात संत्रा बागांचे नुकसान झाले आहे. याची पाहणी बावनकुळे यांनी केली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, नागपूर जिल्ह्यामध्ये परवा प्रचंड गारपीट आणि पाऊस झाला आहे. यामध्ये ६० हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये सोयाबीन, कपास, संत्री संपूर्ण पणे उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवलं आहे.

शेतकऱ्यांना सरकारकडून नुकसान भरपाई मिळावी यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. पण शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे, त्यांची संपूर्ण फळबाग उद्ध्वस्त झाली आहे. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये झाडेच राहिलेली नाही शेतात काहीच शिल्लक नाही.

राज्यभरात हीच परिस्थिती दिसून येत आहे. मी परवा अमरावती मध्ये गेलो तेव्हा हीच परिस्थिती दिसून आल्याने आपण तिथे सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्यातील शेतकरी हा संकटामध्ये आहे. राज्यातील संपूर्ण पंचनाम्यावर मी लक्ष ठेवून होतो. ऑगस्टचा विचार केला तर आम्हाला २५ लक्ष हेक्टरचे पंचनामे आम्हाला प्राप्त झाले आहे. तर सप्टेंबरमध्ये २२ लाख हेक्टरचे पंचनामे आम्हाला मिळाले आहेत. जवळपास ५० लाख हेक्टरचे पंचनामे आमच्याकडे आले असून ऑक्टोबरच्या ४ ते ५ तारखेपर्यंत संपूर्ण परिस्थिती लक्षात येईल.

राज्यातील शेतकऱ्यांचे किती नुकसान झाले आणि किती जनावरे वाहून गेले ही संपूर्ण माहिती आपल्याकडे येत्या ४ ते ५ दिवसात येईल. मानवी मृत्यूचा आकडा आपल्यासमोर आला आहे. काही घरांची पडझड झाली आहे. शेतकऱ्यांचे पंचनामे करत असताना सर्व काही वेगवेगळे असतात. नियमांवर बोट न ठेवता सरसकट पंचनामे करण्यात येणार आहे.

## भाजप-संघाच्या विचारसरणीला उत्तर देणारी पदयात्रा : अनिल देशमुख

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २९ :



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपकडून आज देशात सामाजिक न्याय, शांतता आणि संविधानावर सातत्याने हल्ले होत आहेत. या पार्श्वभूमीवर संविधानाच्या रक्षणासाठी आणि लोकजागृतीसाठी सामाजिक कार्यकर्ता तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा निघाली आहे, असे मत माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांनी व्यक्त केले.

नागपूरच्या दीक्षाभूमीपासून सुरू झालेल्या संविधान सत्याग्रह पदयात्रेचा उद्देश फक्त चालणे नव्हे, तर संविधान रक्षणाची चळवळ उभारणे आहे. देशमुख म्हणाले, ही यात्रा म्हणजे सामाजिक प्रश्नांची उकल करण्याचे माध्यम आहे. आज अनेक वर्गांना न्याय मिळत नाही, शांती ढळली आहे, आणि संविधानाची मूल्यं धोक्यात आली आहेत. अशा स्थितीत ही यात्रा जनतेला सजग करणारी आहे. तुषार गांधी, विविध सामाजिक कार्यकर्ते आणि अनेक पक्षांचे नेते या यात्रेत सहभागी झाले असून, नागपूर ते सेवाग्राम या मार्गावरून ती पुढे सरकत आहे. आपण सर्वांनी मिळून संविधानाच्या रक्षणासाठी आणि सामाजिक समतेसाठी आवाज उठवला पाहिजे, असेही देशमुख यांनी आवर्जून सांगितले.

हम भारत के लोग या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली संविधान सत्याग्रह पदयात्रेला आज सकाळी वाजता नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीतून जल्लोषात सुरुवात झाली. ही पदयात्रा सेवाग्राम येथील बापू कुटीपर्यंत आयोजित करण्यात आली आहे.

हम भारत के लोग या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली संविधान सत्याग्रह पदयात्रेला आज सकाळी साडेसहा वाजता नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीतून जल्लोषात सुरुवात झाली.

## गांधी जयंतीला हत्याऱ्यांचा उत्सव : तुषार गांधी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

ही संविधान सत्याग्रह पदयात्रा संविधान, लोकशाही मजबूत करण्यासाठी आणि जे संविधानावर हल्ले होत आहेत त्याबद्दल लोकजागृती करण्यासाठी आहे, असे महात्मा गांधी यांचे पणतू आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी म्हणाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांचा शताब्दी सोहळा २ ऑक्टोबर रोजी विजयादशमीच्या दिवशी साजरा करीत आहे. त्याबद्दल विचारले असता तुषार गांधी म्हणाले ही विटंबना आहे. बापूंचे हत्यारे त्यांच्या जयंतीदिनी त्यांचा शताब्दी सोहळा साजरा करीत आहेत ही विटंबना लोकांपर्यंत पोहोचवण्याचाच या पदयात्रेचा हेतू आहे, असेही ते म्हणाले.

हम भारत के लोग या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली संविधान सत्याग्रह पदयात्रेला आज सकाळी साडेसहा वाजता नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीतून जल्लोषात सुरुवात झाली.

ही पदयात्रा सेवाग्राम येथील बापू कुटीपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. संविधानाच्या रक्षणासाठी, लोकशाहीच्या मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी व गांधी विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने ही यात्रा सुरू करण्यात आली आहे.

## काँग्रेस विधिमंडळ पक्षनेत्याचे राज्यपालांना पत्र

### ओला दुष्काळाच्या मागणीसाठी विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर तातडीने विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी केली आहे. याबाबत वडेट्टीवार यांनी राज्याचे राज्यपाल यांना पत्र लिहिले आहे. वडेट्टीवार यांनी पत्राद्वारे मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र यांसह राज्याच्या अनेक भागांमध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या गंभीर आपत्कालीन परिस्थितीकडे राज्यपालांचे लक्ष वेधले आहे. राज्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आणि सामान्य नागरिक संकटात सापडले असून त्यांचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे.



राज्यात तब्बल ४ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील उभी पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक ठिकाणी शेतजमिनी खरवडून गेल्याने शेतकऱ्यांचे श्रम मातीमोल झाले आहेत.

पूरपरिस्थितीत अनेक जनावरे वाहून गेली, घरे कोसळली आणि दुर्दैवाने जीवितहानी देखील झाली आहे. विजेचे खांब व तारा कोसळल्याने अनेक ठिकाणी वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे. गाव आणि शहरांना जोडणारे महत्त्वाचे रस्ते खचल्याने दळणवळण व्यवस्था पूर्णपणे खंडित झाली आहे.

पिण्याचे पाणी दूषित झाल्याने सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, ही माहिती वडेट्टीवार यांनी पत्रात नमूद केली आहे. गंभीर संकटातून राज्याला बाहेर काढण्यासाठी तातडीने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. राज्यात तातडीने 'ओला दुष्काळ' जाहीर करून बाधित शेतकरी आणि सामान्य नागरिकांसाठी सरसकट, आर्थिक मदत आणि पुनर्वसन पॅकेज जाहीर करावे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याच्या आश्वासनाची पूर्तता करावी. तसेच, पिके आणि मालमत्तेचे योग्य मूल्यमापन करून तात्काळ नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसने आपल्या पत्राद्वारे केली आहे.

तातडीच्या या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यासाठी, तसेच जनतेला दिलासा देणारे ठोस धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन त्वरित बोलावण्याचा आग्रह करावा, अशी विनंती काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यपालांना केली आहे.

## ओबीसींच्या हक्कासाठी १० ला महामोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २९ :

मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यासंबंधी जीआरमुळे मूळ ओबीसी नागरिकांचे भवितव्य अंधकारमय झाले आहे. हा जीआर म्हणजे ओबीसींना उद्ध्वस्त करण्याचे षड्यंत्र असून, तो आमच्या नरडीचा घोट घेणारा ठरणार आहे. त्यामुळे तो तत्काळ रद्द करावा, या मागणीसाठी १० ऑक्टोबरला नागपुरात महामोर्चा काढला जाईल. त्यानंतरही सरकारने आमच्या बाजूने निर्णय न घेतल्यास भविष्यात मुंबई बंद पाडू, असा इशारा ओबीसी जनमोर्चाचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश अण्णा शेंडगे यांनी दिला. २ सप्टेंबरला राज्य शासनाने मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यासंबंधी जीआर जारी केला. हा जीआर रद्द करण्याच्या मागणीसाठी ओबीसी जनमोर्चाचे जिल्हा संघटक तुषार वाढोणकर व दुसरे प्रमुख पदाधिकारी चंद्रशेखर देशमुख यांनी २४ सप्टेंबरपासून जिल्हा कचेरी समोर उपोषण सुरू केले होते.

## हायपरपिग्मेंटेशन : कारण लक्षण आणि उपचार

: हॅलो डॉक्टर :

लोकारोग्य

सोळावं वरीस धोक्याच असं म्हणतात. अर्थात याच सोळाव्या वर्षात म्हणजे तारुण्याच्या उंबरठ्यावर पौगंडावस्थेतील तरुण मूल आणि मुलींच्या शरीरात हार्मोन्स बदलतात.आणि त्याचाच एक परिणाम म्हणजे तारुण्य पिटिका किंवा चेहऱ्यावर मुरुम आणि काळे डाग आपोआप उमटू लागतात. शरीरातील हार्मोन्स आणि रक्तामध्ये देखील विशिष्ट बदल होत असल्यामुळे अशा तारुण्य पिटिका चेहऱ्यावर उमटत असल्या तरी अनेकदा या काळ्या डागामुळे चेहऱ्याच्या सौंदर्यात बाधा येते. खर तर हा एक त्वचा विकार असतो ज्याला हायपर पिग्मेंटेशन असे संबोधतात. मुळात हा त्वचा विकार नेमका काय आहे? या त्वचाविकारची कारण काय असतात? लक्षण काय असतात? आणि सर्वात महत्वाचे म्हणजे हायपर पिग्मेंटेशन या त्वचाविकारवर उपचार काय आहेत? या संदर्भात त्वचाविकार तज्ञन्य डॉ.महेंद्र काब्रा यांच्याशी संवाद.



**हायपर पिग्मेंटेशन हा त्वचाविकार नेमका काय आहे?**

■ हायपर पिग्मेंटेशन हा एक त्वचेचा सामान्य विकार आहे. ज्यामध्ये त्वचेवर विशेषत चेहऱ्यावर काळे डाग किंवा काळे ठिपके दिसतात. हायपर पिग्मेंटेशन सर्व प्रकारच्या आणि रंगांच्या व्यक्तींना प्रभावित करणारा विकार आहे. हा विकार सर्वसामान्य वाटत असला तरी अनेकांसाठी हा विकार म्हणजे एक चिंतेचा विषय वाटतो. कारण चुकीच्या उपचारामुळे किंवा या चेहऱ्यावरील. पुटकुळ्या नखाने फोडण्याची सवय लागल्यामुळे हा त्वचाविकार अधिक फैलावतो.

**हायपर पिग्मेंटेशन हा त्वचाविकार उद्भवण्याची कारण काय आहेत?**

■ हायपर पिग्मेंटेशन हा विकार बहुदा आनुवंशिक असू शकतो. मेलासमा सारख्या आजारात गर्भधारणेदरम्यान किंवा हार्मोनल औषध घेतल्यामुळे त्वचेवर दुष्परिणाम होतो. लुपस सारखे ऑटो एम्युइन रोग देखील जळजळ आणि त्वचेच्या नुकसानीमुळे त्वचेच्या रंगद्रव्यात बदल घडवून आणतात. आहारातील बदल म्हणजे फास्टफुडचां अतिरेक आणि जीवनशैलीतील बदल देखील या विकारासाठी कारणीभूत असू शकतात.

शिवाय खनिजे आणि अँटी ऑक्सिडेंटची कमतरता देखील या आजाराचे एक कारण आहे. सूर्याच्या अल्ट्रा व्हायोलेट किरणच्या सानिध्यात राहिल्यामुळे देखील हा विकार होतो. त्वचेचा एकझिमा विकार किंवा दुखापत यामुळे देखील हायपर पिग्मेंटेशन होतो.

**हायपर पिग्मेंटेशनची लक्षण काय असतात? आणि निदान कसे करतात?**

■ हायपर पिग्मेंटेशन विकारात सर्व साधारण पने चेहऱ्यावर बारीक पुटकुळ्या दिसतात किंवा काळे डाग दिसतात. चेहऱ्यावर काळसर लालसर पण दिसते. सूज किंवा पुटकळ्या मधून पू येतो.या विकाराचे निदान हे काही प्रकारच्या वैद्यकीय चाचण्या करूनच केले जाते.

रुग्णाचा तपशीलवार इतिहास तपासला जातो. मागील काही आजार किंवा दुखापतीचा तपशील घेतला जातो. त्वचेचा प्रकार, वय आणि त्यानुसार निदान केले जाते.काही प्रकारची रासायनिक क्रीम लावल्यामुळे देखील त्याचा त्वचेवर दुष्परिणाम होऊन हायपर पिग्मेंटेशन विकार होतो.अनेकदा सर्व साधारण दिसणारी लक्षण असली तरी हा त्वचाविकार म्हणजे त्वचेचा कर्करोग असल्याचा धोका देखील असू शकतो. म्हणून वेळीच त्वचा विकाराचे निदान करणे गरजेचे असते.

**या विकारावर उपचार उपलब्ध आहेत का? कोणते?**

■ हायपर पिगमेंटेशन या विकाराकरिता अनेक वैद्यकीय उपचार उपलब्ध आहेत. यामध्ये सामायिक औषधांचा वापर करून चेहऱ्यावरील काळे डाग घालवू शकतो. हायड्रोक्विकोन, रेटिनॉइड्स किंवा कॉर्टिकोस्टिरॉईड्स असलेली क्रीम काळे डाग घालवण्यास मदत करतात . याशिवाय रासायनिक साले उपचार पद्धतीत त्वचेला एक्सफॉलिएट करण्यासाठी आणि रंगद्रव्य कमी करण्यासाठी रासायनिक द्रावणाचा वापर केला जातो.

लेझर थेरपी यामध्ये त्वचेतील मेलेनिनला लक्ष करून काळे डाग घालवले जातात. मायक्रोडर्माब्रेशन हि प्रक्रिया त्वचेचे स्वरूप सुधारण्यास आणि रंगद्रव्य कमी करण्यासाठी त्वचेला एक्सफॉलिएट करते. या वैद्यकीय उपचारासोबतच सूर्यप्रकाशापासून त्वचेचे संरक्षण करणे, आहारातील बदल म्हणजे सकस, ताजा आहार घेणे, भरपूर पाणी पिणे या उपचारांनी देखील त्वचा सुधारण्यास मदत होते. ■ ■

## झेनो हेल्थ सर्वेक्षणानुसार रुग्णांमध्ये फार्मासिस्टची विश्वासार्हता




आज जग फार्मासिस्टचा उत्सव साजरा करत असताना, झेनो हेल्थने आरोग्याच्या बाबतीत भारत खरोखर कोणावर विश्वास ठेवतो याबद्दलचे सत्य उघड केले आहे. मुंबई, पुणे आणि नाशिकमधील ५०० हून अधिक फार्मासिस्टच्या सर्वेक्षणावर आधारित, अहवाल दर्शवितो की, डॉक्टरांव्यतिरिक्त, फार्मासिस्ट विश्वास, स्पष्टता आणि परवडणाऱ्या किमतीच्या चौकटीत उभे आहेत.आंतरराष्ट्रीय फार्मास्युटिकल फेडरेशनची या वर्षीची जागतिक थीम आरोग्य विचार करा, फार्मासिस्ट विचार करा ही अधिक वेळेवर असू शकत नाही.

ज्या देशात दीर्घकालीन आजार वाढत आहेत आणि खिशातून होणारे खर्च जास्त आहेत, तेथे फार्मासिस्ट औषध विक्रेतेपेक्षा जास्त बनत आहेत. ते आरोग्य शिक्षक, खर्च वाचवणारे आणि भावनिक आधारस्तंभ बनत आहेत.

सर्वेक्षणातील महत्त्वाचे मुद्दे एका दृष्टिक्षेपात सांगायचे झाले तर फक्त वाटपच नाही तर मार्गदर्शन प्रदान करणे म्हणजे फार्मासिस्टना येणारे सर्वात सामान्य प्रश्न ब्रँड नावांबद्दल नसून, ते औषधे कशी आणि केव्हा घ्यावी याबद्दल असतात.२७% प्रश्न डोस आणि वेळेबद्दल असतात. अनेकदा दुष्परिणाम आणि विद्यमान परिस्थितींशी परस्परसंवाद याबद्दलच्या प्रश्नांसह जोडले जातात. ज्येष्ठ नागरिक आणि काळजीवाहक हे प्रश्न विचारण्याची शक्यता जास्त असते, ६०.२% लोक फॉलो-अप शंका घेऊन परत येतात. परवडणारी क्षमता अजूनही पालन करण्यास अडथळा - वाढती जागरूकता असूनही, औषधांची किंमत उपचार बंद करण्याचे एक कारण आहे.

३९% फार्मासिस्ट म्हणतात की रुग्ण खर्चाच्या चिंतेमुळे औषध सोडून देतात. नाशिकचे रुग्ण परवडणाऱ्या पर्यायांसाठी सर्वात खुले आहेत, ७५% लोक ते संकोच न करता स्वीकारतात. अध्यार्हून अधिक ग्राहक आता व्यवहारापलीकडे त्यांच्या फार्मासिस्टवर विश्वास ठेवतात, परंतु शहरानुसार धारणा तीव्रपणे बदलते.

डोस स्पष्टतेपासून ते परवडणाऱ्या पर्यायांपर्यंत, ५७% ग्राहक म्हणतात की ते त्यांच्या फार्मासिस्टला विश्वास ठेवू शकणारा आरोग्यसेवा व्यावसायिक म्हणून पाहतात. ही वाढती ओळख भारतातील आरोग्यसेवेच्या प्रवासात काळजी घेण्याच्या पहिल्या टप्प्यावर फार्मासिस्ट किती महत्त्वाची भूमिका बजावतात हे अधोरेखित करते.

■ ■ ■

## बहुगुणी अळंबी



भारतातील अनेक भागात मशरूमचे विविध प्रकार आढळतात. मशरूमला अळंबी नावाने देखील ओळखले जाते. आजकाल बाजारात मशरूम सहज उपलब्ध होतात. ही एक अशी भाजी आहे, जी वेगवेगळ्या प्रकारे बनवली जाते. मशरूम चवीला देखील उत्तम लागतात.

मशरूममध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि अमीनो ॲसिड आढळतात. यामुळेच मशरूमला आरोग्याच्या दृष्टीने रामबाण औषध मानले जाते. चवीष्ट असल्याने अनेकांना मशरूम खायला आवडते. पण, अनेकांना त्याचे फायदे माहीत नसतात.

मशरूमच्या सेवनाने रोगप्रतिकार शक्ती मजबूत होते. मशरूमला नैसर्गिक अँटीबायोटीक मानले जाते. याच्या सेवनाने मायक्रोबियल आणि इतर फंगल इन्फेक्शन देखील बरे होते. यामध्ये आढळणारे गुणधर्म शरीरातील पेशींची दुरुस्ती करतात.

मशरूमच्या सेवनाने हृदयाचे आरोग्य सुधारते. मशरूममध्ये हाय न्यूट्रियंट्स आणि अनेक प्रकारचे एन्झाइम्स असतात, जे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात.

कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहिल्यास हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी होतो. मधुमेहाच्या रुग्णांसाठीही मशरूम खूप फायदेशीर आहे. मशरूममध्ये साखर अजिबात नसते. मशरूमच्या सेवनाने शरीरात इन्सुलिनची पातळी संतुलित राखण्यास मदत होते. मशरूमच्या सेवनाने बद्धकोष्ठता, अपचन इत्यादी. पोटाच्या समस्या दूर होतात. फॉलिक ॲसिडमुळे ते शरीरात रक्त बनवण्याचेही काम करते. मशरूमच्या सेवनाने हाडे मजबूत होतात. त्यात व्हिटॅमिन डी मुबलक प्रमाणात आढळते. व्हिटॅमिन डीच्या सेवनाने हाडे मजबूत होतात. ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

### सहायक महसुल अधिकारी नरेंद्र खांडेकर

## लाच स्वीकारताना अटक

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २९ :

जिल्हा पुर्नवसन कार्यालय येथील सहायक महसुल अधिकारी नरेंद्र विठोबाजी खांडेकर यांना ३० हजार रुपए लाच रक्कम मागणी करून स्विकारल्या प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली.

तक्रारदार चंद्रपूर येथील रहिवासी असून त्यांच्या आईची मौजा चारगांव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथील घर व खुली जागा औष्णीक विद्युत केंद्र चंद्रपूर येथे गेलेली असल्याने सदर मालमत्तेवर तक्रारदार यांचे मुलीचे नांव प्रकल्पग्रस्त व्यक्ती म्हणुन नामनिर्देशीत केले होते. महाराष्ट्र राज्य वीज निमीर्ती कंपनी मर्या, मुंबई यांचेकडून घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये तक्रारदार यांची मुलगी ही प्रकल्पग्रस्त या राखीव जागेतून कनिष्ठ अभियंता या पदाकरीता निवड झालेली होती. तकारदार यांचे मुलीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची पुर्नपडताळणी करण्याकरीता जुलै /२०२५ मध्ये जिल्हा पुर्नवसन कार्यालय चंद्रपूर येथे पत्र प्राप्त झाले होते. त्यानुसार तक्रारदार हे त्यांच्या मुलीसह प्रशासकीय भवन चंद्रपूर येथील जिल्हा पुर्नवसन कार्यालय येथे सहा. महसुल अधिकारी नरेंद्र खांडेकर यांना भेटले २ लाख रुपए लाचेची मागणी केली. तडजोडी अंती १ लाख रुपए व अहवाल तयार झाल्यानंतर ३० हजार रुपए पैशाची मागणी केली होती. त्यानुसार तक्रारदार यांनी १ लाख रुपए जुलै /२०२५ मध्ये दिलेले होते. दरम्यान खांडेकर यांनी तक्रारदार यांना २६ सप्टेंबर रोजी कार्यालयात बोलावून उर्वरीत ३० हजार घेवून या अन्यथा अहवाल पाठविणार नाही असे म्हणाले. परंतु तक्रारदार यांना आलोसे सहायक महसुल अधिकारी नरेंद्र खांडेकर यांना लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील अधिकाऱ्यांना भेटुन तक्रार दिली. प्रतिबंधक विभागाने सापळा रचून सहायक महसुल अधिकारी नरेंद्र खांडेकर यांची पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी स्वतः करीता ३०,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली.

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव शेतकऱ्यांच्या बांधावर



### अतिवृष्टीबाधीत भागांची केली पाहणी

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा, दि. २९ :

राज्यात अतिवृष्टी व पुरामुळे सुमारे ७० लाख हेक्टरपेक्षा जास्त शेतजमिनीचे नुकसान झाले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील ७१ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. या अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या भागांची केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पाहणी केली. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई मिळावी यासाठी युद्धपातळीवर पंचनामे करुन मदतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याचे निर्देश त्यांनी यावेळी प्रशासनाला दिले.

बुलढाणा आणि मोताळा तालुक्यातील अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या पाडळी, नळकुंड, उबाळखेड आणि गुळभेली या गावातील शेतकऱ्यांच्या शेतात जावून पाहणी करतांना केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी शेतकऱ्यांची व्यथा जाणून घेतली. शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र व राज्य सरकार खंबीरपणे उभे आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या आपत्तीला शेतकऱ्यांनी हिमतीने सामोरे गेले पाहिजे. आपत्तीग्रस्त भागांतील गावकऱ्यांनी गावाचे तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांना पंचनाम्यासाठी सहकार्य करुन योग्य पद्धतीने नुकसानीची पंचनाम्ये करून घ्यावेत. या पंचनाम्याचे चावडी वाचन करून घ्यावे जेणेकरून कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांसोबत संवाद साधतांना केले.

या पाहणी दौऱ्यात त्यांच्यासोबत आमदार संजय गायकवाड, उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, तहसिलदार अजितराव जंगम, ओमसिग राजपूत, धनंजय बारोटे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## भूमी फाउंडेशनचा ऐतिहासिक गरबा महोत्सव संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, अकोट, दि. २९ :

काल भूमी फाउंडेशनच्या वतीने सेंट पॉल स्कूल येथे ऐतिहासिक असा भव्य दिव्य गरबा महोत्सव पार पडला त्यामध्ये अकोला येथील मोबाईल व्यावसायिक दास मोबाईल व दैनिक सत्य लढा यांच्याकडून लाखोंची बक्षिसे देण्यात आले.




त्यामध्ये पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाला सोन्याची नाणी देण्यात आली तर इतर सर्व विजयी स्पर्धकांना चांदीच्या प्रतिमा, हेडफोन, पावर बँक तथा सॅमसंग मोबाईल देण्यात आला असून यामध्ये प्रथम क्रमांक हा उडान ग्रुप तर दुसरा क्रमांक राजलक्ष्मी ग्रुप यांनी पटकावला आहे यांना सोन्याचे नाणे देण्यात आले तर इतर सर्व विजेत्या स्पर्धकांना मोमेंटो सह अनेक बक्षीसे दास मोबाईलचे संचालक रितेश मिझापूरि तथा दैनिक सत्य लढा चे मुख्य संपादक सतिश देशमुख यांच्याकडून देण्यात आले.

या गरबा महोत्सवामध्ये जवळपास ३०० वेगवेगळे ग्रुप व सोलोमध्ये स्पर्धकांनी भाग घेतला तर सोबतच प्रेक्षकांचा राऊंड घेऊन त्यांना सुद्धा प्रोत्साहन पर बक्षीसे देण्यात आली. या ऐतिहासिक उपक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दास मोबाईलचे संचालक रितेश मिझापूरि, दैनिक सत्य लढाचे संपादक सतिश देशमुख, सहसंपादक रविराज मोरे, उपसंपादक अथर्व देशमुख, छावा संघटनेचे अध्यक्ष शंकरराव वाकोडे, विदर्भ केसरी साप्ताहिक चे संपादक अनिल मावळे, अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत पाचडे, डॉ. विशाल इंगोले, डॉ.योगेश गुप्ता, मंगेश चिखले,डॉ गुंजन वालसिंगे, स्वाती चिखले, अस्मिता पाचडे, प्रमोद पाटील,आकाश कोकाटे, समर्थ देशमुख, रेखा चांडक व आकोट शहर चे ठाणेदार अमोल माळवे सह स्वातीताई माळवे उपस्थित होते.

# महासागर
# नागपूर वृत्तसागर

■ मंगळवार, दि. ३०, सप्टेंबर २०२५ ■


## हेरोईन, एमडीसह दोघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथक (एनडीपीएस)ने वेगवेगळ्या कारवाईमध्ये हेरोईन आणि एमडीसह दोघांना अटक केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून अमली पदार्थांसह एकूण ८ लाख रुपये किंमतीचा माल जप्त केला. पहिली कारवाई पाचपावली ठाण्यांतर्गत करण्यात आली.

पोलिसांनी एका व्यक्तीला हेरोईनसह अटक केली. तो अनेक वर्षांपासून अंमली पदार्थांच्या व्यवसायात सक्रीय आहे. अटकेतील आरोपी ड्रग्ज माफिया कय्युमचा भाऊ आहे. दुसरी कारवाई प्रतापनगर ठाण्यांतर्गत करण्यात आली. एका ड्रग्ज पेडलरला एमडीसह अटक करण्यात आली. पोलिस बऱ्याच दिवसांपासून त्याच्यावर पाळत ठेवून होते.

रविवारी रात्री १ वाजताच्या सुमारास एनडीपीएसचे पथक पाचपावली ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारावर वैशालीनगर घाटाजवळ सापळा रचून रकीब अहमद अमिनुद्दिन मलिक (५५) रा. ताजनगर, टेका याला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ १२ ग्रॅम हेरोईन मिळाले. पोलिसांनी रकीबकडून फोन आणि दुचाकी वाहनासह एकूण १ लाख ७९ हजार रुपयांचा माल जप्त केला. चौकशीदरम्यान रकीबने सांगितले की, तो ड्रग्ज माफिया कय्युम अहमद अमिरुद्दिन मलिक (रा. रझा टाऊन) याचा भाऊ आहे. कय्युम हा अनेक वर्षांपासून अंमली पदार्थांच्या धंद्यात सक्रीय आहे. एकेकाळी तो शहरातील सर्वात मोठा ड्रग्ज पेडलर होता.

# कामठी-घोरपड-लिहीगाव रेल्वे उड्डाणपूल लोकार्पित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

भारतासह बाहेरच्या देशांमध्ये ड्रॅगन टेम्पलबद्दल प्रचंड आकर्षण आहे. हजारो पर्यटक व श्रद्धाळू ड्रॅगन टेम्पलला भेट देत असतात. या सर्वांसाठी आता नवीन रेल्वे उड्डाणपूल सोयीचा ठरणार आहे, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (सोमवार, दि. २९ सप्टेंबर २०२५) व्यक्त केला.

केंद्रीय रस्ते निधीमधून कामठी-घोरपड-लिहीगाव रस्त्यावर बांधलेल्या ७०८.६६ मीटरच्या रेल्वे उड्डाण पुलाचे लोकार्पण नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी गडकरी बोलत होते. या कार्यक्रमाला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माजी राज्यमंत्री सुलेखा कुंभारे, भाजपचे जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत, माजी आमदार टेकचंद सावरकर आणि मल्लिकार्जुन रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्य अभियंता संभाजी माने, अधिक्षक अभियंता जनार्दन भानुसे, कार्यकारी अभियंता पराग टमके, उपविभागीय अभियंता संतोष खोब्रागडे यांचीही उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, कामठी शहर सुंदर, स्वच्छ व्हावे अशी सर्वांचीच इच्छा आहे. येथून कन्हानपर्यंत मेट्रो जाणार आहे. आता मेट्रोच्या खाली चारपदरी रस्ता झाला तर सौंदर्यात भर पडेल. या कामासाठी शंभर कोटी रुपये केंद्रीय रस्ते निधीतून द्यायला तयार आहे. पार्किंगची सोय झाली तर वर्दळ कमी होईल. व्यावसायिक संकुलांमध्ये छोटी दुकाने सामावून घेता येतील. कामठी शहराला चोवीस तास पाणी मिळेल अशी योजना तयार करण्याचे आवाहनही नितीन गडकरी यांनी केली.

### रेल्वे उड्डाण पुलाचे वैशिष्ट्य

नागपूर-जबलपूर व कामठी-गुमथळा-कुही तसेच नागपूर-कोलकता मार्ग जोडले जातील. नागपूर शहर, कामठी शहर व कामठी ग्रामीण भागाची वाहतूक सुरळीतपणे जोडण्यास मदत होणार आहे. ड्रॅगन पॅलेस व आंतरराष्ट्रीय प्रार्थना स्थळाकडे पोहोचणे सोयीचे झाले आहे. नागपूर-कामठी शहरातील अवजड वाहने पुलावरुन भंडाऱ्याकडे जाणे सोयीचे होईल. हा उड्डाणपूल ७०८.६६ मीटरचा असून या प्रकल्पाची किंमत ६५ कोटी रुपये आहे.



ड्रॅगन टेम्पलसह अनेक मार्गांना जोडणार : नितीन गडकरी

## बाल सुधारगृहातून २ मुलांचे पलायन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

वेगवेगळ्या घटनांमध्ये बाल सुधारगृहातून दोन मुले पळून गेल्याचे पुढे आले आहे. १२ वर्षांचा मुलगा शाळेत जाण्याच्या बहाण्याने सुधारगृहातून निघाला आणि परतलाच नाही. तर दुसरा मुलगा करमत नसल्याने कोणाला काही न सांगता निघून गेला. या दोन्ही घटनांनी सुधारगृह प्रशासनात एकच खळबळ उडाली. पोलिसांनी दोघांनाही शोधून काढले असून ते सुरक्षित आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गत २५ सप्टेंबरला १२ वर्षीय मुलगा संकेत (बदललेले नाव) हा नेहमीप्रमाणे सकाळी शाळेत गेला. मात्र सुटी होऊन बराच वेळ होऊनही तो परत न आल्याने प्रशासनात खळबळ उडाली. तत्काळ त्याचा शोध घेण्यात आला, मात्र तो मिळाला नाही. या प्रकरणी शाळेतील शिक्षिका यांच्या तक्रारीवरून कपीलनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा समांतर तपास अनैतिक मानवी वाहतूक पथकाचे अधिकारी व अंमलदार करीत होते. अल्पवयीन मुलगा यशोधरानगर परिसरात असल्याची माहिती पथकाला मिळाली. खात्रीलायक माहितीच्या आधारे पथकाने त्याला कपीलनगर पोलिसांच्या ताब्यात दिले. ही कारवाई पोलिस निरीक्षक ललिता तोडासे, पोहवा सुनील वाकडे यांनी केली.

## संघाच्या प्रतिगामी प्रवृत्तींचे दहन होणे आवश्यक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :



रावणाचा दहन म्हणजे एखाद्या व्यक्तीचा नव्हे, तर एका वाईट प्रवृत्तीचा अंत होय. आजही अशीच प्रतिगामी प्रवृत्ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून समाजात पसरवली जात आहे. संघाचे दहा तोंड म्हणजेच दहा प्रकारची प्रतिगामित्वाची रूपे आहेत. त्या सगळ्यांचा समाजाने धिक्कार केला पाहिजे आणि त्याचे दहन व्हायला हवे, अशा शब्दांत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टीका केली.

संविधान सत्याग्रह पदयात्रेदरम्यान ते बोलत होते. ते म्हणाले, ही दहा तोंड दहा दिशांना नाहीत, तर संविधानविरोधी, धर्मविरोधी, लोकशाहीविरोधी अशा दहा प्रतिगामी प्रवृत्तींत लपलेली आहेत. अशा प्रवृत्तींचे दहन होणे हीच खरी विजयादशमी ठरेल. सपकाळ यांनी संविधानाच्या संरक्षणासाठी सर्व भारतीयांनी एकत्र येऊन काम करण्याचे आवाहन केले. आपण सर्वांनी हातात हात घालून संविधानाला अपेक्षित असलेल्या भारताच्या निर्मितीसाठी पुढे यावे, असे ते म्हणाले.

हम भारत के लोग या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली संविधान सत्याग्रह पदयात्रेला आज सकाळी साडेसहा वाजता नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीतून जल्लोषात सुरुवात झाली. ही पदयात्रा सेवाग्राम येथील बापू कुटीपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. संविधानाच्या रक्षणासाठी, लोकशाहीच्या मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी व गांधी विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने ही यात्रा सुरू करण्यात आली आहे.

पदयात्रेच्या उद्घाटनप्रसंगी मोठ्या संख्येने नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष म्हणजे काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते यामध्ये सहभागी झाले होते. यामध्ये काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री सुनील केदार, राजेंद्र मुळक, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, तसेच सामाजिक कार्यकर्त्या व शिवसेना उद्धव गटाच्या नेत्या सुषमा अंधारे, अवंतिका लेकुरवाळे, काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे, कुंदा राऊत यांचा सहभाग लक्षणीय होता.

हम भारत के लोग संस्थेचे कार्यकर्ते व पदाधिकारीही पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पदयात्रेचा आरंभ ढोल-ताशांच्या गजरात व भजन मंडळींच्या भक्तिगीतांनी झाला. संपूर्ण मार्गात हरे राम हरे कृष्ण, देवकीनंदन गोपाला, वोट चोर गद्दी छोड़, संविधान बचाओ, लोकशाही वाचवा, अशा घोषणा देण्यात येत होत्या. या घोषणांमधून सरकारविरोधी भावना आणि संविधान रक्षणाबाबत जनजागृतीचा स्पष्ट संदेश दिला जात होता. ही पदयात्रा नागपूरच्या दीक्षाभूमीपासून सुरू होऊन विविध गावांतून आणि शैक्षणिक संस्थांमधून जात सेवाग्रामच्या बापू कुटीत पोहोचणार आहे. बापूंच्या स्मृतींना वंदन करत संविधान, अहिंसा, समानता आणि न्याय या मूल्यांची पुनःप्रस्थापना करण्याचा उद्देश या यात्रेमागे आहे.

## केबल वायर चोरी करणारे गजाआड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

वाडी पोलिसांनी ठाण्यात नोंद ३.३४ लाख किंमतीचा केबल वायर चोरीचा छडा लावून तीन आरोपींना अटक केली. संचितकुमार शत्रुघ्न सिंह (२०) रा. सहरेगामा, बिहार, दीपककुमार फेकन महतो (२०) रा. चांदी रजवाडा, बिहार आणि योगेश रामबिहारी शाहू (२६) रा. गोरेवाडा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

खडगाव मार्गावर लावा गावात साईनाथ ईलेक्ट्रिक कंपनीचे गोदाम आहे. गोदाम परिसरात २१३२ मीटर केबर वायर ठेवलेला होता. अज्ञात आरोपीने ३ लाख ३४ हजार ७०८ रुपये किंमतीचा हा वायर चोरून नेला. वाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवून घटनेचा तपास सुरू केला. गोपनिय माहितीवरून संचित आणि दीपकला ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली. चोरीच्या मालाबाबत विचारले असता त्यांनी भंगार व्यवसायी योगेश शाहू याला माल विकल्याचे सांगितले. पोलिसांनी योगेशविरुद्धही गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. त्याच्याकडून २४० मीटर केबल वायर आणि गुन्ह्यात वापरलेला मिनी ट्रक असा एकूण ४.५० लाख रुपयांचा माल जप्त केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## ब्रह्मांडस्वामी शीतला माता मंदिर येथे
### जगात भारी पंढरीची वारी देखाव्याचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

पंढरपूरची वारी ही वारकरी संप्रदायाची एक महत्त्वाची परंपरा आहे. भारतीय संस्कृती व अध्यात्माचा एक मानबिंदू आहे. या संस्कृतीचे जतन व परिमार्जन करण्याच्या हेतूने ब्रह्मांडस्वामी शीतला माता मंदिर येथे पंढरपूरच्या वारीचे नयनरम्य दृश्य साकारण्यात आले आहे.

कार्तिक महिन्यांतील एकादशीला पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी वारकरी पायी चालत जातात. यात्रेमध्ये संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम, श्री संत एकनाथ महाराज श्री संत गजानन महाराज महाराजांच्या पालख्यांचा समावेश असतो, आणि वारकरी विठ्ठलाच्या गजरात, भक्ती गीते गात आणि नृत्य करत पुढे जातात. पदाधिकारी दुशांत जुनघरे, भावेश बुरीले, आर्यन तायवाडे, अनिकेत निनावे, ओम डांगोरे, रोहित बुधे, मानस रोडे, मेहुल बेले, कुणाल वाडोदे, शुभम इखार, मंदार पहाडे, अथर्व साठवने शीतला माता मंदिर गाभारा सजावट दिनेश कांबळे, मनीष ठवकर, सोहम पालोदे, प्रणय कळमकर, वैभव शंग्रपवार, लोकेश



शंग्रपवार, टीम रामा, पदाधिकारी खुशांक बुरीले, कान्हा अंबारे, पार्थ चकोले, वेदांत खानोरकर, अथर्व तातेकर, मीत चंद्रगिरे, कार्तिक भोयर, श्लोक लांजेवार, यश साटवणे, श्रीमय देवते, ओम इंगोले, अभिनव सूर्यवंशी, राम रोकडे यांनी पंढरपूरच्या वारीला आगळ वेगळे प्रदर्शन केले. मंदिर समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर टोंगे, प्रविण सावंत, तुळशीराम पिंपळघरे, किशोर नांदरे, विनोद टोंगे, किशोर शिंगणे, हरिशचंद्र ईखार, दामोधर बुरघाटे, नागोराव इखार महेंद्र थिगळे समस्त विश्वस्त पदाधिकारी गण, कमल हाथीबेड, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अयोध्या भाग सागर ठाकरे, अनिकेत गिरधर, स्वप्नील इळपाते, आनंद लेडांगे यांचे अमूल्य सहकार्य लाभले. यावर्षीची संकल्पना पंढरपूरची वारी ही मंदिर समिती चे युवा अध्यक्ष मयुर गीता रामदास वाजगे यांची होती.

## 'छबी' चित्रपटाच्या टीमचा नागपुरात प्रचार दौरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :



प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेला आणि थिएटर्समध्ये लोकप्रिय ठरत असलेला छबी हा नवा मराठी चित्रपट आता विदर्भाच्या सांस्कृतिक राजधानी नागपुरात आपली जादू दाखवण्यासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अभिनेत्री डॉ.सृष्टी बाहेकर आणि अभिनेता ध्रुव छेडा लवकरच नागपुरातील थिएटर्सना आणि गरबा महोत्सवाला भेट देणार आहेत. अशी माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

विदर्भाची कन्या व दंतवैद्यकातून अभिनेत्री बनलेली सृष्टी विजय बाहेकर स्वतः आपल्या सहकलाकार ध्रुव सोबत नागपूरकरांशी संवाद साधणार आहे. ध्रुव आणि सृष्टीने ह्या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली असून, हा दोघांचा पहिला मराठी चित्रपट आहे.

ध्रुव छेडा याने यापूर्वी बालकलाकार म्हणून अनेक जाहिरातींमध्ये काम केले आहे, ज्यामध्ये सुपरस्टार शाहरुख खान सोबतचा जाहिरातीचा अनुभव विशेष ठरला. तो एक कुशल नर्तक असून त्याने शामक डावर यांच्याकडे प्रशिक्षण घेतले आहे. "माझं पदार्पण मराठी चित्रपटातून होत आहे याचा मला खूप आनंद आहे, कारण मी आणि माझं कुटुंब मराठी कंटेंटचे मोठे चाहते आहोत," असे ध्रुवने सांगितले.

' छबी' दिग्दर्शित केला आहे अद्वैत मसुरकर यांनी, निर्मिती जया चेडा यांची असून, संगीत लोकप्रिय जोडी रोहन-रोहन यांचे आहे. यात मकरंद देशपांडे, समीर धर्माधिकारी, शुभांगी गोखले, राजन भिसे, संजय कुलकर्णी, अनघा अतुल, जयवंत वाडकर, लीना पंडित यांसारखे दिग्गज कलाकार सहभागी झाले आहेत.

या प्रसंगी सृष्टी बहेकर म्हणाली, "विदर्भातुन अभिनयाच्या प्रवासाला सुरुवात करून आज पहिल्या चित्रपटाद्वारे मोठ्या पडद्यावर पदार्पण करणे ही माझ्यासाठी मोठी बाब आहे. माझ्या आई-वडिलांच्या आशीर्वादाशिवाय हे शक्य झाले नसते. नागपूरच्या प्रेक्षकांना प्रत्यक्ष भेटण्याची आतुरता आहे.

## धम्मचक्र दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

दरवर्षीप्रमाणेच यंदाही 69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, त्याअनुषांगाने संपूर्ण तयारी करण्यात आल्याची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सचिव डॉ. राजेंद्र गवई यांनी पत्रबपरिषदेत दिली.

गवई यांनी पत्रकारांना सांगितले की, दरवर्षी दीक्षाभूमीवर अनुयायांची गर्दी वाढत आहे. यंदाही मोठ्या प्रमाणात गर्दी होणार आहे. त्यासाठी नागपूर महापालिका, नागपूर विकास प्राधिकरण, वीज मंडख, म. रा. परिवहन मंडळ, आरोग्य सेवा विभागाच्या वतीने तयारी करण्यात आली आहे.

30 सप्टेंबरपासून सकाळी 9 वाजेपासून कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे. 30 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबरपर्यंत भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई दीक्षाभूमीवर येणाऱ्या भाविकांना दीक्षा देतील. 1 ऑक्टोबरला सकाळी 9 वाजता सुरेई ससाई यांच्या उपस्थितीत पंचशील झेंड्याचे ध्वजारोहण करण्यात येईल. सायंकाळी 6 वाजता धम्म परिषद होईल. या परिषदेला जपान, थायलंड, मलेशिया आदी देश विदेशातील भंते प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. रात्री 9 वाजता सांस्कृतिक जलसा होईल.

2 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 6 वाजता मुख्य कार्यक्रम होईल. भदंत ससाई यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला सारनाथ (उ. प्र.) येथील धम्म लर्निंग सेंटरचे संस्थापक अध्यक्ष भदंत चंदीमा थेरो, भंते विनाचार्य आणि चंदीगड येथील प्रशासकीय अधिकारी डॉ. राजशेखर वृंदृ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. सध्या पावसाचे दिवस असल्याने ऐनवेळी पाऊस आल्यास भाविकांची व्यवस्था दीक्षाभूमीच्या जवळपास असलेल्या शाळांमध्ये करण्यात येईल. वेळ आल्यास डॉ. आंबेडकर महाविद्यालय देखील सुरु करण्यात येईल. मात्रब, भाविकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली असल्याचे डॉ. गवई यांनी पत्रकारांना सांगितले. पत्रबपरिषदेला डॉ. सुधीर, विलास गजघाटे, एन. आर. सुटे, डॉ. प्रदीप आगलावे आदी उपस्थित होते.

## ड्रॅगन पॅलेस येथे
### दोन दिवसीय धम्मचक्र महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

कामठीतील विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस टेंपल येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त बुधवार १ ऑक्टोबरपासून दोन दिवसीय धम्मचक्र महोत्सव आयोजित करण्यात आल्याची माहिती ड्रॅगन पॅलेस टेंपलच्या प्रमुख माजी राज्यमंत्री अॅड. सुलेखा कुंभारे यांनी पत्रपरिषदेत दिली.

१ ऑक्टोबरला सकाळी १०.३० वाजता ६९व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानीमित्त ६९ मीटर लांबीच्या पंचशील ध्वजासह शांती मार्च निघेल. दुपारी १२.५० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब मल्टीमिडिया छायाचित्र प्रदर्शनीचे आंबेडकर महामानवाच्या जीवन प्रवास उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होईल. यावेळी केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी सौरभ खेकरे उपस्थित असतील. सायंकाळी ७ वाजता बुद्ध व भीम गीतांचा प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम होईल. २ ऑक्टोबरला सकाळी १० वा. पुज्य भिक्षूसंघाच्या प्रमुख उपस्थितीत विशेष बुद्ध वंदना होईल. सकाळी १०.३० वाजता परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिल्पास समता सैनिक दलातर्फे मानवंदना दिली जाईल. दुपारी १२ वा. भारतीय संविधानाच्या जगातील सर्वात मोठ्या आकाराची प्रतिकृती निर्मिती संकल्पाचे प्रसारण होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले उपस्थित राहतील. दुपारी १ वा. आठवले यांच्या हस्ते त्यांच्या खासदार निधीतून ओगावा सोसायटीला प्राप्त झालेल्या ग्रीन एसी बसचे लोकार्पण होईल.

# जीवनाची फलश्रुती सांगणाऱ्या संघगीतांच्या रचनेमागे जीवनाची तपस्या
## मोहन भागवत यांचे प्रतिपादन, संघगीत संग्रहाचा लोकार्पण सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

संघगीतांमधील शब्द आणि संगीत हे केवळ भावांचे वाहक आहे. यामध्ये गायक आणि संगीतकार हा दुय्यम स्थानी असून या शब्दांमागे असलेल्या निर्मितीकाराच्या जीवनाची तपस्या ही संघगीतांच्या निर्मितीमागील खरी प्रेरणा आहे. संगीत किंवा गायन यापेक्षा या गीतांची परिणामकारकता या गीतांची शक्ती आहे. या गीतांमधील खऱ्या शक्तीचे प्रगटीकरण प्रख्यात गायक व संगीतकार शंकर महादेवन यांनी आजच्या या सभागृहात करून संघ गीतांचा सरगम केला आहे. अशी भावना संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केली.

खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती



नागपूर द्वारे आयोजित संगीतकार शंकर महादेवन यांनी संगीतबद्ध केलेल्या काही निवडक संघगीतांचा लोकार्पण सोहळा सुरेश भट सभागृह येथे संपन्न झाला. या संघ गीत संग्रहाचे लोकार्पण परमपूज्य सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. या विशेष सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे, अनिल सोले उपस्थित होते.

यावेळी मोहन भागवत म्हणाले की विजयादशमीच्या कार्यक्रमाला शंकर महादेवन आले असता ते म्हणाले होते की संघगीत म्हणजे देशाचे सरगम आहेत. पण आज त्यांनी आपल्या सरगममधून संघ उभा केला आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात निर्माण के पावन युग मे हम चरित्र निर्माण ना भुले, या संघगीताने झाली. यानंतर मनसा सतत स्मरणीय हे संघगीत सादर करण्यात आले. हम करे राष्ट्र आराधना आणि साने गुरुजी रचित बलसागर भारत होवो हे गीत सादर होताच सभागृह भारत माता की जय च्या जयघोषाने निनादले. मानव आणि आपल्या ध्येयप्राप्तीसाठी सतत पुढे चालत राहिले पाहिजे ही शिकवण देणारे चरैवेती यही तो मंत्र हमारा है, मानवाच्या सुसंस्कृती करण्यासाठी आवश्यक मूल्यांची शिकवण देणारे संस्कृती सबकी एक चिरंतन, ध्वज केसरी शिवाचा, एकतेची भावना उजागर करणारा एकता, स्वतंत्रता, समानता रहे, सूर संगम ताल संगम ही गीते आपल्या उत्स्फूर्त व दिलखेचक गायनातून सादर करीत जाजवल्य देशभक्तीचे स्फुरण रसिकांमध्ये निर्माण केले.

यावेळी नितीन गडकरी म्हणाले की जीवनामध्ये जे काही चांगले शिकण्याची संधी मिळाली ती संघ गीतांच्या शिकवणीतून मिळाली. संघ गीतामध्ये जीवनाची संगीत सामावले ते मनावर किती परिणाम करतात याची प्रचिती आज या कार्यक्रमात आली आहे. शंकर महादेवन यांनी आपल्या सार्थ गायनातून आजचा कार्यक्रम अजरामर केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले की मानवाच्या जीवनात त्याला पुढे जायचे असेल तर त्याच्या जीवनात असंख्य काटे येतात अशा निराशामध्ये संघगीते आपल्याला नेहमीच प्रेरणा देत असतात. आजच्या कॉपीराईटच्या जगामध्ये संघगीतांचे कोणीही कॉपीराईट मागितले नाही हेच या संघगीतांचे विशेषत्व सांगून जाते.

शंकर महादेवन यांनी आपल्या अमोघ साधनेतून हा कार्यक्रम जितका यशस्वी केला तितकाच या यशामध्ये निवेदक शरद केळकर यांचा वाटा आहे. त्यांनी आपल्या निवेदनातून भारतीय इतिहास, भारतीय संस्कृतीची उदाहरणे देत कार्यक्रमाला एक वेगळी उंच प्राप्त करून दिली. त्यांचाही विशेष सत्कार येथे करण्यात आला.

# सीपींनी हाणून पाडला मानवी तस्करीचा प्रयत्न

## मध्यप्रदेशातील ३७ मजुरांची एजंटच्या तावडीतून सुटका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

काम देण्याचे आमिष दाखवून मजुरांची मानवी तस्करी करणाऱ्या कंत्राटदार एजंटचा प्रयत्न सीताबर्डी पोलिसांनी हाणून पाडला. मध्यप्रदेशातील ३७ मजुरांची एजंटच्या तावडीतून सुटका केली. पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांना याबाबत माहिती मिळाली होती.

त्यांनी त्वरित दखल घेत सीताबर्डी पोलिसांना मजुरांना सुरक्षित आणण्याचे निर्देश दिले. या प्रकरणी सीताबर्डी पोलिसांनी आरोपी एजंट विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सर्व ३७ मजूर छिंदवाडा जिल्ह्यातील (मध्यप्रदेश) रहिवासी आहेत.

जगण्यासाठी आणि कुटुंबाला जगविण्यासाठी मोलमजुरी करण्याशिवाय दुसरा कुठलाच मार्ग त्यांच्याकडे नाही.

याच संधीचे सोने करीत काही एजंटने त्यांना काम देण्याचे आमिष देखविले. ५०० ते २००० रुपये अग्रीमही दिले. सौंसरला काम असल्याचे सांगून त्या सर्वांना नागपूरला आणले. यात २३ महिला, ५ प्रौढ पुरुष आणि ९ अल्पवयीन मुले (३ मुली आणि ६ मुले) यांचा समावेश आहे. त्यांना वाशिममार्गे सातान्याला घेऊन जात होते. मात्र, वाशिमच्या पेट्रोल पंपावर मजुरांनी विरोध दर्शविला.

आम्ही येवढ्या लांब कामाला जात नाही. दरम्यान एका जागरूक मजुराने ११२ वर पोलिसांना माहिती दिली.

वाशिम पोलिस पोहोचले. तसेच या घटनेची माहिती एका एनजीओपर्यंत पोहोचवली. एनजीओने पोलिस आयुक्त सिंगल यांच्याशी संपर्क केला.

दरम्यान पोलिसांनी हस्तक्षेप करून मजुरांना नागपुरात पाठविले.

पोलिस आयुक्तांनी या गंभीर प्रकरणाची त्वरित दखल घेतली. सीताबर्डी पोलिसांना सांगितले.

सीताबर्डी पोलिस रेल्वे स्थानक मार्गावरील मध्यप्रदेश बस स्थानकावर पोहोचले. कामगार नागपुरात येताच दुसरा एजंट तयारच होता. काम नाकारले म्हणून त्या एजंटने मजुरांकडे एक लाख रुपयांची मागणी केली. तडजोडीनंतर बळजबरीने त्यांच्याकडून ५७ हजार रुपये घेतले. त्या सर्वांना एका बसमध्ये बसविले आणि घेऊन जाण्याच्या तयारित होता.

बस सुटणार त्याच वेळी सीताबर्डी पोलिस पोहोचले. सर्व मजुरांना सुरक्षित ठाण्यात आणले. त्यांच्या तक्रारीवरून आरोपी एजंट विरुद्ध मानवी तस्करी, खंडणी, चाईल्ड लेबर अॅक्ट आदी गुन्ह्यांची नोंद केली.


सुटका झालेल्या मजुरांची विचारपूस सरताना पोलिस आयुक्त डॉ. सिंघल

### शोषण होण्यापासून बचाव

मानव तस्करी ही मानवी प्रतिष्ठेचे एक गंभीर उल्लंघन आहे. तत्काळ कारवाईमुळे ३८ निरपराध जीव शोषणापासून वाचले. सर्व आरोपींना अटक करण्यासाठी कठोर प्रयत्न सुरू आहेत. आंतराज्यीय टोळी असण्याची शक्यता आहे. ऑपरेशन शक्ती अंतर्गत नागपूर पोलिस ह्युमन ट्रॅफिकिंग आणि संवेदनशील गटांच्या शोषणाविरुद्ध मोहीम राबवत आहेत. नागपूर पोलिस नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी, ट्रॅफिकिंग नेटवर्क्सचे विघटन करण्यासाठी आणि न्याय सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध आहेत.

–रवींद्रकुमार सिंगल, पोलिस आयुक्त

### सीताबर्डी पोलिसांची मानवता

सीताबर्डी पोलिसांनी भयभीत झालेल्या ३७ मजुरांसाठी भोजनाची व्यवस्था केली. ठाण्याच्या परिसरातच बसून त्यांना पोटभर भोजन दिले. त्यांच्यासाठी चहाची व्यवस्था केली. घाबरू नका, पोलिस तुमच्या सोबत आहेत, असा विश्वास त्यांना दिला आणि सुरक्षित त्यांच्या गावी रवाना केले. पोलिस निरीक्षक विजय दिघे, उपनिरीक्षक विनोद तिवारी, उमेश तसरीकर, कपील राऊत, राहुल भोपळे, मोसमी कटरे, अनिकेत सोनवणे यांनी सहकार्य केले.


सोयबीनला वापले कोंब


जवळच्या शेतकऱ्याच्या शेतात घुसले पाणी

## जागतिक गर्भसमापन दिनानिमित्त जनजागृती




■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २९ :

ऊर्जा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कामगार महिलांसाठी २८ सप्टें. जागतिक सुरक्षित गर्भसमापन दिनाचे निमित्ताने जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुरक्षित गर्भसमापन या विषयावर अध्यक्ष, ऊर्जा बहुउद्देशीय सामाजिक संस्था संगीता पडोळे यांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले. सुरक्षित व असुरक्षित गर्भसमापन यातील फरक समजावून सांगितले. एमटीपी कायदा या बद्दल सविस्तर माहिती समजावून दिली. डॉ. हर्षा पडोळे यांनी सुरक्षित गर्भसमापन या विषयावर मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्ती समीक्षा गणवीर यांनी सुरक्षित गर्भसमापन संबंधित केस स्टडी स्टोरीज रुपात महिलांना समजावून सांगितली. पोलिस पाटील विणा रेहपाडे यांनी सुरक्षित गर्भसमापन हा विषय कवितेच्या माध्यमातून समजावून सांगितला. कार्यक्रमाला गोठणगाव नवेगाव, गोठणगाव, मसली, उमरी, सोनारवाही, सिर्सी, राजोली, येथील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### जागतिक अल्झायमर दिनानिमित्त भव्य आरोग्य शिबिर

नागपूर , जागतिक अल्झायमर दिनानिमित्त भाऊसाहेब मूळक आयुर्वेद महाविद्यालय, नंदनवन व 'विरंगुळा ज्येष्ठ नागरिक संघटना' यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पार पडला. या कार्यक्रमाला मान्यवर पाहुणे म्हणून विरंगुळा केंद्राचे अध्यक्ष कलंबे सर, आबुलकर सर व महिला अध्यक्षा अरसपुरे मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आ.प्रा.डॉ. युवराज काळे होते. यावेळी कायचिकित्सा विभागाच्या प्रमुख डॉ.सी. एस. तनमने तसेच स्वस्थवृत्त विभागाच्या प्रमुख डॉ. माधवी रेहपाडे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

## ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्याने २ ऑक्टोबर ला भव्य कार्यक्रमाचे आयोजन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

संविधान बचाव आंदोलना समिती तर्फे पत्रकार परिषद घेण्यात आली. ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा निमित्ताने भव्य कार्यक्रमाचे आयोजन काचीपुरा चौक येथे करण्यात आले. असून अशी माहिती एड. मिलिंद खोब्रागडे यांनी पत्रकारांना दिली.दि.१६ ऑक्टोबर १९५६ रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसपुत्र बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या आग्रहाने चंद्रपूर येथे लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली.

दि.२ ऑक्टोबर ला पवित्र दीक्षाभूमी नागपूर स्थित काचीपुरा येथे भव्य कार्यक्रम आयोजित केले असून या कार्यक्रम मध्ये, प्रबोधनात्मक, सांस्कृतिक भीम-बौद्धगीतांचे गायन, गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार, महापुरुषांचे साहित्य (पुस्तके) वितरण तसेच भव्य भोजनाचा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्याच प्रमाणे दि.१५ व १६ ऑक्टोबर ला पवित्र दीक्षाभूमी परिसर चंद्रपूर येथे सुद्धा भव्य कार्यक्रम आयोजिले आहे. करिता, सर्व बौद्ध अनुयायांनी सदर कार्यक्रम मध्ये आपण उपस्थित राहण्याचे निमंत्रण संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अॅड. मिलिंद खोब्रागडे, उपाध्यक्ष मेघराज राऊत, महासचिव पपिताताई जुनघरे, कार्यक्रमाचे आयोजक गायक सुभाष कोठारे, धिरज निकाळजे, डॉ. भिमराव मेश्राम यांनी केले आहे. पत्रपरिषदेत संविधान बचाव आंदोलन चे राष्ट्रीय अध्यक्ष एड. मिलिंद खोब्रागडे, मेघराज राऊत, धीरज निकाळजे, भीमराव मेश्राम, बी बी कोचे, महेंद्र सातपुते, राजू गायकवाड, बबलू कडवे, नामदेवराव निकोसे, सुरेश गाणार, राजेंद्र सोनटक्के, अशोक खोब्रागडे, सुखदेव मेश्राम, निकेश ढोके, संघर्ष डवले आदींची उपस्थिती होती.

## महात्मा गांधी इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी सुरक्षितता व जनजागृती कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २९ :

महात्मा गांधी इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी सुरक्षितता व जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना वैयक्तिक सुरक्षितता, जबाबदार वर्तन तसेच आपत्कालीन परिस्थितीत योग्य तयारी याबाबत मार्गदर्शन करणे हा होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती डॉ. योगिता श्रीवास विभागप्रमुख दत्ता मेघे आयुर्वेदिक कॉलेज, वानाडोंगरी तसेच डॉ. शिल्पा गभने व शाळेतील मुख्याध्यापक धर्मेंद्र पारशिवनीकर, उपमुख्याध्यापिका दिपाली कोठे यांचा हस्ते झाले. डॉ. शिल्पा गभने यांनी आपल्या भाषणात शालेय वातावरणात तसेच शाळेबाहेरही सुरक्षिततेचे महत्व अधोरेखित केले. असुरक्षित परिस्थितींना नाही म्हणण्याचे महत्व याविषयी माहिती दिली. चांगला व वाईट स्पर्श याबद्दल प्रात्यक्षिकाद्वारे अवगत केले. डॉ. योगिता श्रीवास यांनी कुपोषन या विषयावर माहिती दिली व त्यावर केल्याजाणाऱ्या उपाययोजना शासनाचे विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके व प्रश्नोत्तर सत्रांद्वारे सक्रिय सहभागाची संधी मिळाली. आग लागल्यास किंवा नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगी सुरक्षिततेची तयारी कशी करावी यासाठी प्रत्यक्ष सराव देखील करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

या उपक्रमाचे शिक्षक व पालकांनी कौतुक केले. आजच्या युगात सुरक्षितता जनजागृती ही शिक्षणाचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेचा समारोप विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची शपथ घेऊन करण्यात आला.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेबाबतची जाणीव अधिक बळकट झाली आणि संकटाच्या प्रसंगी जबाबदारीने व आत्मविश्वासाने वागण्याची प्रेरणा त्यांना मिळाली.

संचालन नाजुका मैस्कर यांनी केले तर आभार प्रदर्शन अनुष्का यादव यांनी केले.

कार्यशाळेच्या यशस्वितेकरिता सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले



## शहीद भगतसिंग यांना अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २९ :

रामटेक येथील श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक येथे दि. २९ सप्टेंबर २०२५ सोमवारी राष्ट्रीय सेवा योजना कनिष्ठ व वरिष्ठ पथकाच्या संयुक्त विद्यमाने अभिवादन करण्यात आले. या रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष जाधव आणि प्रा. किशोर धांडे यांच्या नेतृत्वाखालील स्वयंसेवक व स्वयंसेविकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे यांनी भारतीय क्रांतीचे जनक शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून क्रांतिकारी अभिवादन केले. तसेच आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ अभिवादन न करता त्यांचे विचारांचे अध्ययन करून आपल्या वर्तनात आणावे असे प्रतिपादन केले.यावेळी डॉ. बाबासाहेब लाड आणि डॉ. स्वप्निल मनघे उपस्थित होते.तथा बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहकार्य लाभले.

## वुई द पीपल' (धम्मक्रांती)

### ऐतिहासिक संगीतमय नाट्य : आज




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ : भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल समता फोर्स महिला यांच्या अंतर्गत ६९ व्या धम्मचक्र वर्धापन दिनानिमित्ताने रेशीमबाग चौक, सुरेशभट सभागृहात आज मंगळवार, ३० सप्टेंबर रोजी, दुपारी १२:३० ते ३:३० वाजता या दरम्यान, 'वुई द पीपल' (धम्मक्रांती) ऐतिहासिक संगीतमय नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. यासंबंधी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने टिळक भवन येथे परिषदेमध्ये भीमराव फुसे यांनी कार्यक्रमा संदर्भात माहिती दिली.

यावेळी शाहीर सीमाताई पाटील व संगीत दिग्दर्शक जॉली मोरे यांची उपस्थिती होती. संगीतमय नाट्य प्रयोग सादरकर्ते संगीत दिग्दर्शक व निर्माता जॉली मोरे तसेच सुप्रसिद्ध भारतीय महिला शाहीर सीमाताई पाटील यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक तथा राष्ट्रीय अध्यक्ष समता सैनिक दलाचे व राष्ट्रीय कार्याध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे डॉ. भिमराव आंबेडकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमाचे अतिथी पाहुणे डॉ. हरीश राबलिया, कॅप्टन प्रवीण निखाडे, आकाशजी लामा, भदंत विनाचार्य, अॅड. एस के भंडारे, यु जी बोराडे आणि प्रमुख अतिथी म्हणून इंजि. अरविंद गेडाम डॉ.एन. डी. पाटील, इंजि. हेमंत सुटे इंजि. मदन माटे आणि इंजि. राहुल परुळकर यांची उपस्थिती राहतील. असे भीमराव फुसे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी उपस्थित शाहीर सीमाताई पाटील, जॉली नारायण मोरे, भंते राहुल बोधी, महाराष्ट्र संघटक भीमराव फुसे, डॉ.भीमराव जाधव, धर्मेश प्रेसेनजीत, इंजिनिअर नंदलाल मेश्राम, मनोहर तायडे, आनंद सायरे, सुभाष गणवीर, डॉ.तक्षिल बासनिक आणि इंजिनियर पद्माकर गणवीर यांची उपस्थिती होती.

## चार किंवा पाच रेल्वे लाईन होईल पण नरखेड, प्रवाशांसासाठी काय फायदा ?

■ महासागर प्रतिनिधी,
नरखेड , दि. २९ :

चार किंवा पाच रेल्वे लाईन होईल पण नरखेड प्रवाशांसाठी काय फायदा? २०१९ कोरोना काळापासून नरखेड जंक्शन या शहराच्या रेल्वे चे थांबे बंद करण्यात आले आहे. नरखेड वासियांनी फार मेहनत करून फक्त गोंडवाना एक्सप्रेस या गाडीला थांबवलं आहे . नागपूर जंक्शन ते आमला जंक्शन च्या मध्ये येणारे जंक्शन गाव फक्त नरखेड आहेत. तरी या शहरात गाड्यांचा थांबा का नाही? कोरोना काळाच्या आधी नरखेड जंक्शन ला थांबणाऱ्या रेल्वे गाड्या -चेन्नई -नवी दिल्ली ग्रँड ट्रंक एक्सप्रेस, हैदराबाद -हजरत निजामुद्दीन दक्षिण एक्सप्रेस, रायगड - हजरत निजामुद्दीन व भुसावळ- हझरत निजामुद्दीन गोंडवाना एक्सप्रेस, कोल्हापूर- धनबाद दीक्षाभूमी एक्सप्रेस, रायपूर - अमृतसर छत्तीसगढ एक्सप्रेस, चेन्नई - इंदौर जयपूर एक्सप्रेस, नागपूर- खंडवा दादाधाम एक्सप्रेस, विशाखापट्टणम -दानापूर दानापूर एक्सप्रेस, नागपूर -डॉ. आंबेडकर डॉ. आंबेडकर एक्सप्रेस अमरावती - जबलपूर जबलपूर एक्सप्रेस आणि नागपूर - आमला मेमू पॅसेंजर . या सर्व गाड्यांचा नरखेड जंक्शन ला थांबा होता. परंतु कोरोना काळापासून या सर्व गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या. फक्त नागपूर -आमला मेमू पॅसेंजर ही गाडी चालू होती. मात्र २ वर्षा नंतर रायगड व भुसावळ -नवी दिल्ली गोंडवाना एक्सप्रेस या गाडीचा नरखेडला थांबा मिळाला. परंतु २ वर्षापर्यंत नरखेड वासियांना हा त्रास सहन करावा लागला . आणि ५ वर्षा नंतर चेन्नई -नवी दिल्ली ग्रँड ट्रंक एक्सप्रेस, कोल्हापूर - धनबाद दीक्षाभूमी, अमरावती -जबलपूर जबलपूर एक्सप्रेस, रायपूर - अमृतसर छत्तीसगढ एक्सप्रेस . या गाड्यांना नरखेड जंक्शन येथील थांबा मिळाला. परंतु हैदराबाद - हजरत निजामुद्दीन दक्षिण एक्सप्रेस, चेन्नई -जयपूर जयपूर एक्सप्रेस, नागपूर - खंडवा दादाधाम एक्सप्रेस, विशाखापट्टणम -दानापूर दानापूर एक्सप्रेस , आदी या गाड्यांना अजून पर्यंत थांबा मिळाला नाही. नरखेड वासियांनी या सर्व गाड्या थांबवायला खूप प्रयत्न केला परंतु गाड्या आजुन पर्यंत थांबविल्या नाहीत. तरी ज्या कोरोना काळाच्या आधी नरखेड जंक्शन ला थांबणाऱ्या गाड्या होत्या , त्या सर्व गाड्यांचा नरखेड जंक्शन ला रेल्वे प्रशासनाने थांबा दिला पाहिजे. जेणेकरून नरखेड वासियांना त्रास होणार नाहीत . या सर्व रेल्वे गाड्यांचा थांबा नरखेड जंक्शन ला मिळाला पाहिजे.



### चाकूसह फिरताना गुंडाला अटक

नागपूर: गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने गंगा-जमुना परिसरात गस्ती दरम्यान एका गुंडाला चाकू घेऊन फिरताना अटक केली. सुनील सेवकराम रहांगडाले (५०) रा. हिरापूर, गोंदिया असे अटकेतील गुंडाचे नाव आहे.

शनिवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेचे पथक लकडगंज ठाण्यांतर्गत गंगा-जमुना परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान सीमेंट रोडवर एक इसम पोलिसांचे वाहन पाहून पळताना दिसला. संशय आल्याने पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकू मिळाला. चौकशीदरम्यान सुनीलविरुद्ध यापूर्वीही गुन्हे नोंद झाले आहेत आणि त्याच्यावर प्रतिबंधक कारवाईही करण्यात आली असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी चाकू जप्त करून सुनीलला अटक केली. पुढील कार्यवाहीसाठी त्याला लकडगंज पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. तो परिसरात काय करीत होता याचा शोध पोलिस घेत आहेत.

## 'हिट अॅन्ड रन'मध्ये एका तरुणासह दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

वाडी आणि प्रतापनगर ठाण्यांतर्गत हिट अॅन्ड रनच्या दोन घटनांमध्ये एका तरुणासह दोघांचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. पहिल्या घटनेत नागपूर-अमरावती मार्गावर रस्त्याच्या कडेला एक व्यक्ती जखमी अवस्थेत आढळला होता. पोलिसांनी त्याला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले होते. पोलिसांनी या प्रकरणात अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरु केला. तपासात अज्ञात वाहनाच्या धडकेत त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. आता पोलिसांनी अज्ञात वाहनाच्या चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. रोशन पांडुरंग ढोणे (३५) रा. पांढराबोडी, अंबाझरी असे मृताचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गत २३ सप्टेंबरच्या सकाळी ६ वाजताच्या सुमारास रोशन हे त्यांच्या एमएच-४०/सीएल-३६२२ क्रमांकाच्या मोटारसायकलवर नागपूर-अमरावती मार्गाने जात होते. रजत उत्सव बिल्डिंगसमोर भरधाव असलेल्या अज्ञात वाहनाच्या चालकाने त्यांना जबर धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, रोशन दूरवर फेकल्या गेले. अपघातानंतर आरोपी वाहन चालक घटनास्थळावरून पसार झाला. बराच वेळपर्यंत रोशन रस्त्यावर जखमी अवस्थेत पडून गेले. सकाळी मॉर्निंग वॉकसाठी निघालेल्या लोकांनी त्यांना जखमी पाहून घटनेची माहिती पोलिसांना दिली. वाडी पोलिस घटनास्थळी पोहोचले. रोशन रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत पडून होते, तर त्यांची मोटारसायकल काही अंतरावर पडलेली होती. पोलिसांनी तत्काळ त्यांना उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून रोशनला मृत घोषित केले. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. तपासात अज्ञात वाहनाच्या चालकाने त्यांना धडक दिल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरु केला आहे.

### अज्ञात वाहनाने मजुराला उडविले

अपघाताची दुसरी घटना प्रतापनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. काम संपवून घरी जात असलेल्या मजुराला अज्ञात वाहनाच्या चालकाने जबर धडक दिली आणि पळून गेला. प्रमोद सदई धुर्वे (३२) रा. भेंडे लेआऊट, लेबर कॅम्प सोनेगाव असे मृत मजुराचे नाव आहे. प्रमोद हा मुळचा छिंदवाडा येथील छाताकला येथील रहिवासी होता. तो मोलमजुरी करण्यासाठी नागपूरला आला होता. जयताळा परिसरात रस्त्याचे काम सुरू आहे. या ठिकाणी प्रमोद मजुरी करीत होता. शनिवारी रात्री ७.३० वाजताच्या सुमारास प्रमोद काम संपवून लेबर कॅम्पकडे जात होता. सुर्वेनगरच्या गल्ली क्र. ४ मध्ये मागून भरधाव आलेल्या वाहनाच्या चालकाने त्याला जबर धडक दिली आणि पळून गेला. गंभीर जखमी अवस्थेत प्रमोदला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# जीआयआयएस नागपूरतर्फे तालुका स्तरावरील शालेय कबड्डी स्पर्धा २०२५चे आयोजन

महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :



ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस), लावा, नागपूर यांच्यातर्फे तालुका स्तरावरील शालेय कबड्डी स्पर्धा २०२५चे यशस्वी आयोजन करण्यात आले. दोन दिवस सुरू असलेल्या या स्पर्धेत तालुक्यातील २५ हून अधिक शाळांमधील ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखाली, जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्थानिक पातळीवर या स्पर्धेचे पर्यवेक्षण तालुका जिल्हा क्रीडा अधिकारी उमेश चौरे यांनी केले. १४ वर्षांखालील, १७ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील मुलगे आणि मुली अशा तीन वयोगटांमध्ये ही स्पर्धा रंगली. लीग-कम-नॉकआऊट पद्धतीनुसार सामने खेळवण्यात आले. त्यामुळे न्याय्य प्रकारे सामने झाले आणि प्रत्येकाला समान संधी लाभली.

सामन्यांमध्ये संपूर्ण कॅम्पस उत्साहाने भरून गेला होता आणि सर्व सहभागींचे कौशल्य, संघभावना आणि शिस्तीचे उत्तम प्रदर्शन पाहायला मिळाले. या प्रसंगी जीआयआयएस नागपूरच्या मुख्याध्यापिका निधी गुप्ता म्हणाल्या, 'आपल्या संस्कृतीत खोलवर रुजलेल्या कबड्डी या खेळाची स्पर्धा आयोजित करणे ही आमच्या शाळेसाठी बहुमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांना इतक्या तळमळीने खेळताना पाहून आणि त्यांचा या खेळाबद्दलचा आदर पाहून पारंपरिक खेळ जपण्याच्या आणि त्यांचा प्रसार करण्याच्या महत्त्व अधोरेखित होते. या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय डुंबले म्हणाले यांनी उपस्थितांसमोर मनोगत व्यक्त केले आणि त्यांनी आयोजकांच्या मेहनतीची प्रशंसा केली. ते म्हणाले, ञ्कबड्डी आपल्या भूमीची ओळख आहे आणि ती शिस्त, समन्वय आणि मानसिक चपळता शिकवते. हे तरुण खेळाडू इतक्या उत्साहाने आणि खिलाडू वृत्तीने स्पर्धा करताना पाहणे खरोखर प्रेरणादायी आहे. शाळा आणि क्रीडा प्राधिकरण यांच्यातील सहकार्यामुळे तरुण खेळाडूंसाठी अर्थपूर्ण संधी कशा निर्माण होऊ शकतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही स्पर्धा होय. खेळाडूंचा उत्साह आणि त्यांची निष्ठा यासोबत जीआयआयएस नागपूरच्या काटेकोर नियोजनामुळे कबड्डी सारखे पारंपरिक खेळ कसे फुलू शकतात आणि पुढच्या पिढीला प्रेरणा देऊ शकतात, हे स्पष्ट होते,ह असे नागपूरचे तालुका जिल्हा क्रीडा अधिकारी उमेश चौरे म्हणाले. तालुका स्तरावरील शालेय कबड्डी स्पर्धा २०२५ यशस्वी होण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद आणि जीआयआयएस नागपूरची टीम तसेच शारीरिक शिक्षण विषयाचे शिक्षक प्रतिक भोयर यांच्या नेतृत्वाखालील प्रयत्न महत्त्वाचे ठरले.

# दवलामेटीत पं. दीनदयाल उपाध्याय
## जयंतीनिमित्त स्वच्छता व वृक्षारोपण कार्यक्रम

महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २९ :



पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त वार्ड क्रमांक १ मधील बूथ क्रमांक ९६ मध्ये स्वच्छता व वृक्षारोपण कार्यक्रम आयोजक बूथ प्रमुख प्रशांत श्रीवास्तव यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून पूजनाने झाली. त्यानंतर हनुमान मंदिराच्या आवाराची झाडू लावून स्वच्छता करण्यात आली. यानंतर वृक्षारोपण कार्यक्रमही पार पडला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य सतीश खोबरागडे, भारतीय जनता पार्टीचे महामंत्री विनोद चापेकर, माजी सरपंच भीमराव मोटघरे, छत्रपती जी शेंडे, अशोक जी बागडे, बूथ प्रमुख रश्मी ताई पाटील, ग्राम पंचायत सदस्य व बूथ प्रमुख मुन्नालाल टेंभरे, छबिलाल यादव, सुखनाथ गायधने, उषाताई गौतम, वर्टी तसेच समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हनुमान मंदिराच्या आवाराची स्वच्छता आणि वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीपणे पाडण्यात आला.

## रवीनगर उड्डाणपुलावर पुन्हा अपघात
### ट्रॅव्हल्स बसची कारला धडक, तीन जखमी

**नागपूर:** केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते नुकतेच उद्घाटन झालेल्या रवीनगर उड्डाणपुलावर अपघाताची पुन्हा एक घटना पुढे आली आहे. ट्रॅव्हल्स बसच्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत चारचाकी वाहनाला मागून जबर धडक दिली. यामुळे ती चारचाकी समोरच्या कारवर जाऊन धडकली. या अपघातात तीनजण गंभीर जखमी झाले, तर दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. या प्रकरणी सीताबर्डी पोलिसांनी आरोपी ट्रॅव्हल्स बसचा चालक सुजशकुमार श्रीगोपालसिंग (३२) रा. समरपूर दिल्लीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. जखमींमध्ये चारचाकी चालक नीतेश बाबाराव पाटील (३४) रा. गारपीठ, वर्धा, उज्वला अशोक रामटेके (५१) आणि स्नेहल अशोक रामटेके (२५) दोन्ही रा. कारंजा, वर्धा यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, उद्घाटनाच्या दुसऱ्याच दिवशी या पुलावर अपघाताची घटना घडली होती. त्यानंतर हा पूल बंद करण्यात आला होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नीतेश यांचे मित्र स्वप्निल कालोकार यांची नातेवाईक स्नेहल हिचा मुंबईला पेपर होता. शुक्रवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास तिला नागपूर रेल्वेस्थानकावर सोडायचे होते. त्यामुळे स्वप्निल यांनी नीतेश यांच्याकडे चारचाकी वाहन असल्याने नागपूर रेल्वे स्थानकावर सोडण्याची विनंती केली. नीतेश नागपूरला जाण्यासाठी तयार झाले. शुक्रवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास नीतेश, त्यांचा मित्र राहुल भागे, स्नेहल आणि तिची आई उज्वला असे चारजण एमएच-२७/एआर-४६७क्रमांकाच्या चारचाकी वाहनाने नागपूरकडे निघाले. जवळपास दोन तासात ते नागपूरला पोहोचले. रवीनगर उड्डाणपुलावरून रेल्वे स्थानकाकडे जात असताना मागून आलेल्या झिंग बस ट्रॅव्हल्स क्र. एमएच-४३/सीके-८००६ चा चालक सुजशकुमार याने त्यांच्या वाहनाला जबर धडक दिली. या धडकेमुळे त्यांचे वाहन समोरच्या कारवर जाऊन धडकले. या अपघातात नीतेश, स्नेहल आणि उज्वला यांना गंभीर दुखापत झाली, तर दोन्ही कारचेही मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच सीताबर्डी पोलिस घटनास्थळी पोहोचले. तिन्ही जखमींना उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात घेऊन गेले. नीतेश यांचा जबाब नोंदवून आरोपी ट्रॅव्हल्स बस चालक सुजशकुमारविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## १०२५ लीटर डिझेलचा अवैधसाठा पकडला
### वाठोडा डीबी पथकाची कारवाई

**नागपूर:** वाठोडा ठाण्याच्या डीबी पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर धाड टाकून अवैधरित्या डिझेलचा साठा करणाऱ्या दोन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून १०२५ लीटर डिझेल जप्त करण्यात आले. सचिन संतोष बेनीबागडे (२७) रा. आराधनानगर, बेडगाव आणि आशिष मनभरण यादव (२१) रा. वाठोडा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पवनपूत्रनगर परिसरात प्लॉट क्र. ४६ वरील आऊट हाऊसमध्ये मोठ्याप्रमाणात डिझेलची साठवणूक होत असल्याची माहिती रविवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास डीबी पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक हरीशकुमार बोराडे यांच्या मार्गदर्शनात आऊट हाऊसवर धाड टाकली. या दरम्यान वरील आरोपी अवैधरित्या डिझेलची साठवणूक करताना आढळले. आऊट हाऊसच्या झडतीमध्ये १०२५ लिटर डिझेल असलेल्या ३४ प्लॅस्टिकच्या कॅन आढळल्या. पोलिसांनी ९६,३५० रुपये किंमतीच्या डिझेलसह एकूण १ लाख ९५० रुपये किंमतीचा माल जप्त केला. दोन्ही आरोपींविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियमासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात आली.

**तर नागरिकांच्या जीविताला होता मोठा धोका**

आरोपी लोकवस्तीच्या परिसरात अवैधरित्या डिझेलची साठवणूक करीत होते. डिझेल हे अत्यंत ज्वलनशील पदार्थ आहे. दुर्दैवाने या ठिकाणी आग लागली असती तर परिसरातील नागरिक व त्यांच्या मालमत्तेला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता होती. आरोपी इतक्या मोठ्या प्रमाणात डिझेल कुठून आणत होते आणि या डिझेलचे काय करणार होते याचा तपास पोलिस घेत आहेत.

# कत्तलखान्यात जाण्यापासून १९ गोवंशांना वाचवले

**नागपूर:** हिंगणा पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारावर गोवंशांनी भरलेला एक ट्रक अडवला. झडतीदरम्यान ट्रकमध्ये १९ गोवंश मिळाले, ज्यांना कत्तलखान्यात नेले जात होते. पोलिसांनी ट्रक जप्त करून गोवंशाची सुटका केली. ट्रक चालक अख्तर सत्तार अहमद (३१) रा. टेका आणि वाहक शादाब अजीम खान (३१) रा. कान्हीवाला, बालाघाट या दोघांविरुद्धही गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात आली.

रात्री १.३० वाजताच्या सुमारास हिंगणा पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान समृद्धी महामार्गावर वायफळ टोल नाक्याजवळ एमएच-४०/सीटी-०१७क्रमांकाचा संशयितरित्या उभा असल्याची माहिती नियंत्रण कक्षातून मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस पथक परिसरात दाखल झाले. ट्रकची झडती घेतली असता गोवंश आढळले. त्यांना चारा-पाण्याविना अत्यंत क्रूरपणे बांधून ठेवलेले होते. पोलिसांनी चालक अख्तर आणि वाहक शादाब दोघांनाही ताब्यात घेऊन चौकशी केली असता गोवंशांना कत्तलखान्यात नेत असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी गोवंश आणि ट्रक असा एकूण १७.२४ लाख रुपये किंमतीचा माल जप्त करून दोघांनाही अटक केली. आरोपींविरुद्ध प्राणी क्रूरता अधिनियमासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गोवंशांना बुट्टीबोरीच्या औदुंबर गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्या स्वाधिन करण्यात आले. पुढील तपास सुरू आहे.

# सायबर सुरक्षा अत्यावश्यक गरज पोलीस निरीक्षक राजेश तटकरे



महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

आजच्या डिजिटल जगात सायबर सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. कारण दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारी वाढत असून, यामुळे आर्थिक नुकसान, गोपनीय माहितीची चोरी आणि इतर अनेक धोके निर्माण होत आहेत. सायबर सुरक्षा तंत्रज्ञानाच्या मदतीने संगणक प्रणाली, नेटवर्क आणि डेटाचे अनधिकृत वापर, चोरी किंवा नुकसानापासून संरक्षण करते. म्हणून, प्रत्येक व्यक्ती, व्यवसाय आणि संस्थांसाठी सायबर सुरक्षा ही एक अत्यावश्यक गरज असल्याचे प्रतिपादन ठाणेदार राजेश तटकरे यांनी केले.

खडगाव रोड कोहळे लेआउट स्थित महाकाली शीतला माता मंदिरात वाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश तटकरे यांच्या हस्ते स्वागत समितीचे पदाधिकारी सुरेश बारई, सुरेश फलके,प्रवीण डाखोरे,योगेश कुमकुमवार, दिलीप लांजेवार, मयूर चौधरी, विजय कनेर ,शरद साखरकर ,शंकर राठी,अर्जुन जांभुळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआरती करण्यात आली. यावेळी महाकाली महिला भजन मंडळाचे पदाधिकारी व स्वागत समितीचे सहयोगी सदस्य शंकर भगत ,पंकज सिंह ,देविदास गोहने, निखिल देशमुख, राकेश पांडे,सुरेश रायडू,अरुण धोटे व मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होता. मंदिर परिसरातील आयोजकांनी केलेली व्यवस्था स्वच्छता, सूचना फलक ,पिण्याचे शुद्ध पाणी, सुलभ शौचालय, शिस्तबद्ध रास गरबा याबाबत राजेश तटकरे यांनी समाधान व्यक्त केले.

## मध्य रेल्वे, नागपूर विभागामार्फत पेन्शन अदालत डिसेंबर २०२५ चे आयोजन

**नागपूर:** मध्य रेल्वे, नागपूर विभागामार्फत पेन्शन अदालत - डिसेंबर २०२५चे आयोजन दिनांक १५ डिसेंबर २०२५ (सोमवार) रोजी सकाळी ११:०० वाजता गुंजन सभागृह, अॅनेक्स बिल्डिंग, विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, नागपूर येथे करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पेन्शनशी संबंधित तक्रारींच्या त्वरित निवारणासाठी एक विशेष व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. अर्हताधारक पेन्शनधारकांनी आपल्या पेन्शन अथवा सेटलमेंटशी संबंधित समस्या असल्यास, निर्धारित नमुन्यात अर्ज सादर करावा. अर्जामध्ये खालील माहिती स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे -नाव, पदनाम, ग्रेड, विभाग, नियुक्ती व सेवानिवृत्तीची तारीख, पीपीओ क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई-मेलआयडी, संपूर्ण टपाल पत्ता तसेच तक्रारीचे स्वरूप. संबंधित कागदपत्रांच्या छायाप्रती संलग्न करणे अनिवार्य आहे जेणेकरून तक्रारीचे योग्यरीत्या परीक्षण करता येईल. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३० ऑक्टोबर २०२५ सायंकाळी १७:०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. ज्येष्ठता, बदली, पदोन्नती, एमएसीपी तसेच सेवानिवृत्त/मृत कर्मचाऱ्यांच्या नाममात्र वेतनवाढीसंबंधीच्या तक्रारी स्वीकृत केल्या जाणार नाहीत.

# बँकेला ७.२२ लाखांचा चुना

महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ : दुसऱ्याचे धनादेश चोरी करून त्यावर स्वत:चे नाव लिहिले आणि नंतर ते धनादेश वटवून बँकेची ७ लाख २२ हजार रुपयांनी फसवणूक केली. या प्रकरणी सदर पोलिसांनी बँक व्यवस्थापक अभिषेक महेशचंद्र गुप्ता (३९) रा. मनीषनगर, बेलतरोडीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गुप्ता हे पंजाब नॅशनल बँकेच्या किंग्सवे शाखेत मुख्य व्यवस्थापक आहेत. त्यांच्या बँकेत राम गोविंद वाधवानी (५६) आणि मयूर मुरलीधर वाधवानी (३५) यांचे खाते असून दोघेही बँकेचे नियमित ग्राहक आहेत. ३ जुलै ते ८ जुलै दरम्यान राम यांच्या कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने तीन वेगवेगळ्या रकमेचे धनादेश जमा केले होते. या तिन्ही धनादेशांची एकूण रक्कम ४ लाख ९ हजार ५०० रुपये होती. तसेच मयूर वाधवानी यांच्या कार्यालयातूनही ३ लाख १३ हजार १३६ रुपये किंमतीचे ४ धनादेश बँकेच्या ड्राफ्ट बॉक्समध्ये जमा करण्यात आले होते. मात्र अज्ञात आरोपीने ड्राफ्ट बॉक्समधून दोघांचेही धनादेश बाहेर काढले आणि त्यावर असलेले नाव खोडून हर्ष शर्मा असे नाव लिहिले. त्यानंतर सर्व सातही धनादेशांवर नमूद एकूण ७ लाख २२ हजार ६३६ रुपयांची रक्कम स्वत:च्या एचडीएफसी बँकेच्या इतवारी शाखेतील खात्यात जमा करून घेतली. बरेच दिवस होऊनही खात्यात धनादेशांची रक्कम जमा न झाल्याने राम आणि मयूर यांनी बँक अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता फसवणुकीचा हा प्रकार पुढे आला.

## ९ ऑक्टोबर च्या संपात कंत्राटी कामगार सहभागी होणार
### तांत्रिक अॅप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनचा जाहीर पाठिंबा

**नागपूर:** महावितरण,महापारेषण, महानिर्मिती विज क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेल्या खाजगीकरण विरूध्द व एकतर्फी कर्मचारी पुनर्रचना तसेच कंत्राटी कामगारांना कायम सेवेमध्ये समाविष्ठ करावे व ईतर मागण्या करीता महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी अभियंते, अधिकारी कृती समिती ने विविध स्वरूपाचे आंदोलनाचे टप्पे जाहीर केले आहे. तसेच दि. ९ आक्टोबर २०२५ ला एक दिवशीय संप सुध्दा जाहीर केला आहे. या विविध टप्यातील आंदोलनामध्ये संघटना सक्रीय सहभाग नोंदवेल तसेच तिन्ही कंपनीतील कार्यरत कंत्राटी कामगारांच्या वतीने पाठिंबा देण्यात येत आहे. या आंदोलनात राज्यातील कंत्राटी कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन राजाध्यक्ष प्रभाकर लहाने, कार्याध्यक्ष विक्की कावळे, सरचिटणीस प्रदीप पाटील, नितिन चव्हाण, अनिल चव्हाण, शेख , मंगेश चिमोटे यांनी केली.

# मध्य नागपूरचे लोकप्रिय आमदार प्रवीण दटके ह्यांच्या संकल्पनेतून आमदार सांस्कृतीक महोत्सव

महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २९ :



समिती व महिला जागृती जनकल्याण बहुउद्देशिय संस्था ह्यांच्याद्वारे दिनांक २५.०९.२०२५ ते २८.०९.२५ या कालावधीत संध्याकाळी ७ ते १० या वेळेत महिलांसाठी रास गरबा आयोजित करण्यात आला होता. प्रथम दिवशी श्रीमंत राणी यशोधराराजे भोसले व श्रीमंत राणी माधुरी राजे भोसले व बुलढाणा जिल्हा चिखलीच्या आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील, भाजपा महिला मोर्चा शहर अध्यक्ष सौ दिव्याताई धुरडे यांचे हस्ते आरती करुन उद्घाटन करण्यात आले व दिनांक २७.०९.२५ रोजी सुप्रसिध्द अभिनेत्री तेजस्विनी पंडीत व दिनांक २८.०९.२५ रोजी सायली संजीव सुप्रसिध्द टिव्ही स्टार व अभिनेत्री यांनी महीलांसोबत गरबा खेळून महिलांचा उत्साह द्विगुणीत केला. मुसळधार पावसातही रास गरबा करुन महीलांनी नारीशक्तीचा परिचय दिला. प्रथम पारितोषीक २१,०००/-वे शितलामाता ग्रुप ह्यांनी पटकावला व द्वितीय क्रमांक गंगादेवी ग्रुप तृतीय पारितोषीक स्वामीनी गरबा ग्रुप, यांना मिळाला बेस्ट ग्रुपचा सम्मान माऊली ग्रुप, वैष्णोदेवी ग्रुप, रॉकस्टार ग्रुप यांना मिळाला. सर्व मातृशक्तींनी आमदार प्रवीणजी दटके यांचे आभार मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रयत्न करणाऱ्या आयोजक सौ अर्चना डेहनकर यांचेसह अनिता काशीकर, रेखा निमजे, श्वेता निकम, सरला नायक, निकीता परावे, कविता इंगळे, गीता पार्डीकर, सारिका नांदुरकर व आमदार सांस्कृतीक महोत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी सहकार्य केले.

# भिवापूर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करण्या बाबतचे सर्वपक्षीयांच्या वतीने निवेदन



महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. २९ :

भिवापूर तालुक्यात यावर्षी अतिवृष्टी व मागील बऱ्याच दिवसापासून पडणाऱ्या पावसामुळे शेत मालाचे प्रचंड नुकसान झाले असून संपूर्ण ओला दृष्काळ सदृश्य परिस्थिती तयार झाली असून सोयाबीन, धान कापूस इत्यादी पिके पाण्याखाली बुजलेली असून याबाबत तातडीने मदत करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार )तालुकाध्यक्ष सुधीर मोहड यांच्या नेतृत्वात सर्वपक्षीय निवेदन तहसिलदार बाबासाहेब टेळे यांच्या मार्फत मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

यावेळी नक्षी सरपंच अनिकेत वराडे, प्रहार जनशक्ती पक्ष व उपसरपंच रोशन गायधने, अध्यक्ष आरपीआय गुलाब जनबंधू, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी उपसभापती वसंतराव ढोणे, अभय ठवकर, वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष जितेंद्र सवाईकर, युवक कॉंग्रेस तालुकाध्यक्ष अभय ठवकर ,महिला कॉंग्रेस पक्ष अध्यक्ष छायाताई ढोणे, जितेंद्र सवाईकर, पाडूरंग तितरमारे, बोधिसत्व सुर्यवंशी, दिलीप श्रीरामे व इतर नागरीक उपस्थित होते.

यावेळी सरसकट संपूर्ण कर्ज माफी करण्यात यावी, हेक्टरी ५० हजार आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी. रब्बी हंगामा करीता शेतकऱ्यानां बी बियाणे मोफत देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

# सोनाटा फेस्टिव्ह कलेक्शन २.० वाढवते उत्सवाची चमक

महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :



उत्सवाचा हंगाम जवळ आला आहे, सोनाटा आपले फेस्टिव्ह कलेक्शन २.०' सादर करत आहे. वेळ आणि परंपरा साजरी करणारी हि घड्याळे. भेटवस्तू देण्याचा आनंद द्विगुणित करतात. ही नवीन घड्याळे आधुनिक डिझाइन आणि उत्सवाच्या भव्यतेचे मिश्रण आहेत. या मुळे ते विशेष क्षण साजरा करण्यासाठी परिपूर्ण पर्याय ठरत आहे. पुरुषांच्या संग्रहातील प्रत्येक घड्याळ समृद्ध डायल, बोल्ड केस बॅकड्रॉप किंवा सोनाटाच्या क्लासिक रोमन मार्कर आणि क्रोको-पॅटर्न स्ट्रॅप्ससह भव्यता दर्शवते. निळ्या आणि हिरव्या रंगाचे रंगीत डायल त्यांचे आकर्षण वाढवतात, तर क्रोनोग्राफ, मल्टीफंक्शन डे आणि डेट आणि डायलवरील सूर्य आणि चंद्र निर्देशक यासारख्या कार्यात्मक वैशिष्ट्यांमुळे त्यांना केवळ एक आकर्षक लूक मिळत नाही तर उत्कृष्ट कारागिरीसह व्यावहारिकता देखील प्रदान होते. या सर्व तपशीलांमुळे हा संग्रह उत्सवपूर्ण आणि सुंदर बनतो, ज्यामुळे ते खास क्षणांचे स्मरण करण्यासाठी आणि भेटवस्तू देण्यासाठी परिपूर्ण बनतात. महिलांच्या संग्रहाबद्दल बोलायचे झाले तर, ही घड्याळे उत्कृष्टपणे बनवलेल्या जाळीदार ब्रेसलेट, चमकणारे स्टड पीस आणि विविध आकारांच्या लिंक्ससह चमकदार रोजगोल्ड च्या पट्ट्यांनी भरलेली आहेत. पॉलिश केलेले फिनिश आणि उत्सवाचे ग्लॅमर हे सुनिश्चित करते की प्रत्येक घड्याळ विशेष प्रसंगी कोणत्याही पोशाखाला पूरक आहे आणि भेटवस्तू देण्यासाठी देखील आदर्श आहे.

या प्रसंगी बोलताना, सोनाटाचे उत्पादन प्रमुख निशांत मित्तल म्हणाले, 'फेस्टिव्ह कलेक्शन २.० हे सर्व काही स्टाईलमध्ये उत्सव साजरे करण्याबद्दल आहे. आम्हाला या हंगामात प्रत्येक घड्याळ आनंद आणि उबदारपणाची अभिव्यक्ती बनवायची होती -तुम्हाला ते स्वत: घालायचे असेल, भेटवस्तू द्यायचे असेल किंवा फक्त उत्सव साजरे करायचे असतील तर ते अगदी योग्य आहे .

# पदवीधरांच्या हक्कांच्या निर्णायक लढाईत युवा ग्रॅज्युएट फोरम मैदानात

महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :




महाराष्ट्र विधान परिषद, नागपूर विभागातील पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत युवा ग्रॅज्युएट फोरम, आता लढ्या एकीनेच', ठामपणे उतरत असल्याची घोषणा या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून करत आहोत. या वेळी ही केवळ एक निवडणूक नाही, तर पदवीधरांच्या हक्कांची, प्रतिष्ठेची आणि भविष्यातील सुरक्षिततेची निर्णायक लढाई म्हणून युवा ग्रॅज्युएट फोरम निवडणूक लढणार आहे. मागच्या निवडणुकीत अत्यंत अल्प मतांच्या फरकाने युवा ग्रॅज्युएट फोरमचा पराभव झाला होता. मात्र, यावेळी पदवीधर मतदार राहीलेली कसर पूर्ण करणार आहेत आणि संपूर्ण ताकदीने ही निवडणूक लढणार असेही सांगितले.

पदवीधरांच्या सुधारणेसाठी कटिबद्ध असणारे युवा ग्रज्युएट फोरम त्यांच्या जीवनात सकारात्मक प्रभाव पाडण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून नागपूर विभागात जमीनस्तरावर काम करत आहे. यंदा ही निवडणूक खालील मुद्यांवर लढणार आहोत.

खाजगी नोकऱ्यांमध्ये अरक्षण: खाजगी नोकऱ्यांमध्ये पदवीधरांना आरक्षण मिळण्याची तरतूद युवा ग्रॅज्युएट फोरम करेल याच बरोबर सरकारी नोकऱ्यांमधील कंत्राटी भरती कायम बंद करून पदवीधरांसाठी नियमित व स्थिर नोकऱ्यांची हमी.रोजगार मार्गदर्शन केंद्र: नागपूर विभागातील प्रत्येक जिल्ह्यात पदवीधरांसाठी सरकारच्या माध्यमातून करिअर गायडन्स प्लेसमेंट सेल सुरू करणे. आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा यामागचा उद्देश आहे. असे पत्रकार परिषदेत बोलतांना युवा ग्रॅज्युएट फोरमचे, अतुल खोब्रागडे यांनी सांगितले. त्यावेळी उपस्थित राहुल हनवते ,रंजना सुरजुसे ,विक्रम बोरकर,नरेश साखरे,पल्लवी आटे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रशासनाबद्दल सर्वसामान्य जनतेमध्ये विश्वास निर्माण करा : विजयलक्ष्मी बिदरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :
नव्याने निवड झालेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जलद व भ्रष्टाचार मुक्त सेवा देतांनाच कर्तव्यनिष्ठेने व सामाजिक भावनेने काम करून सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन करा, असा सल्ला विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिला.

वनामती येथे राज्य सेवा परिक्षेच्या माध्यमातून निवड झालेल्या 85 अधिकाऱ्यांच्या दोन वर्षीय एकत्रित 11 व्या परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते झाला. त्यावेळी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या.

यावेळी वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेच्या संचालक आशा पठाण,



प्रशिक्षण सत्राच्या संचालिका सुवर्णा पांडे, सामान्य प्रशासन विभागाचे सुनिल निकम, अपुर्वा रोडे, भारसाकळे, वनामतीचे निबंधक निर्भय जैन आदी उपस्थित होते.

भारतीय प्रशासकीय सेवेच्या धरतीवर राज्यातील अधिकार्यांना प्रशिक्षण देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. नव्याने रुजू होणाऱ्या अधिकाऱ्यांना दोन वर्षीय प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण कालावधीत एम ए (विकास प्रशासन) ही पदवी सुद्धा देण्यात येणार आहे.

भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्याला प्राधान्य असावे, तसेच दैनंदिन कामात गतिमानता वाढवायला प्राधान्य द्यावे अशी सूचना बिदरी यांनी केली.

प्रशासकीय सेवेमध्ये दाखल होतांना सर्वसामान्य जनतेमध्ये विश्वास निर्माण करतांनाच उत्कृष्ट अधिकारी म्हणून नावलौकीक मिळवा. राज्याच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी आपलीच आहे, ही भावना ठेवून सेवेला सूरवात करा. असा सल्ला विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी यावेळी दिला. प्रत्येक काम कर्तव्यनिष्ठेने व प्रामाणिकपणे करतांनाच आपल्या दैनंदिन कामामध्ये पारदर्शकता ठेवतांना प्रशासनाबद्दल गैरसमज निर्माण होणार नाही. याची खबरदारी घेण्याचा सल्ला देतांना वनामीच्या संचालक आशा पठाण यांनी यावेळी दिला.

प्रारंभी एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या संचालक सुवर्णा पांडे यांनी 11 व्या बॅचसाठी 85 अधिकाऱ्यांची निवड झाली असून पायाभूत प्रशिक्षण चार सत्रात पूर्ण करावयाचे आहे. प्रशिक्षण कालावधीनंतर 1 हजार 600 माकार्ची परिक्षा घेण्यात येणार आहे.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे सुनिल निकम यांनी राज्य प्रशासकीय सेवेमध्ये दाखल होणारे अधिकाऱ्यांसाठी वनामती येथे राज्यस्तरीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. प्रारंभी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी निवड झालेल्या अधिकाऱ्यांना कर्तव्य पालनाची शपथ दिली. कार्यक्रमाचे संचलन मिलिंद तारे यांनी तर आभार प्रदर्शन वनामतीचे निबंधक निर्भय जैन यांनी केले.

# दीक्षाभूमीवरील धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळयाला गालबोट

## भंते विनाचार्यांना बोलावण्यावरून तीव्र आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या दिवसाची आठवण आणि बाबासाहेबांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही अनुयायी दीक्षाभूमीवर दाखल होत आहेत.



६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा गुरुवारी सायंकाळी ६ वाजता भिक्खू संघाच्या उपस्थितीत पार पडणार आहे. यंदाही मंचावर कुठल्याही राजकीय नेत्याला स्थान देण्यात आलेले नाही. धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून धम्म लर्निंग केंद्र सारनाथ उत्तर प्रदेशचे भदन्त चन्दिमा थेरो, उत्तरप्रदेश येथील भंते विनाचार्य, डॉ. राज शेखर वृंद्र, स्मारक समितीचे अध्यक्ष आर्य नागार्जुन सुरई ससाई यांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती स्मारक समितीचे सचिव डॉ. राजेंद्र गवई यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्याला ३० सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. मंगळवार ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत धम्मदीक्षा सोहळा होणार असून सुरई ससाई हे बौद्ध धम्माची दीक्षा देणार आहे. दीक्षाभूमीवर ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा गुरुवारी सायंकाळी ६ वाजता भिक्खू संघाच्या उपस्थित पार पडणार आहे. यंदाही मंचावर कुठल्याही राजकीय नेत्याला स्थान दिले गेले नसले तरी सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून उत्तरप्रदेश येथील भंते विनाचार्य यांना बोलावण्यात आले आहे.

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनामध्ये त्यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. आंदोलनाच्या नावावर त्यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचा फटका ठेवत अशा लोकांना कार्यक्रमास लावण्यावरून आंबेडकरी समाजामधून प्रचंड विरोध होत आहे. यासाठी काही समाजबांधवांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या सदस्यांसमोर सोमवारी सायंकाळी आंदोलन केले. तसेच दीक्षाभूमी सोहळ्यात भंते विनाचार्य आणि महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे प्रणेते आकाश लामा यांना बोलावू नये, अशी मागणी करण्यात आली.

दीक्षाभूमीवरील धम्मचक्र प्रवर्तन दिन कार्यक्रमाला विविध पक्षाच्या राजकीय पुढाऱ्यांना बोलावले जात होते. मात्र, याला आंबेडकरी समाजातील नागरिकांचा वाढता विरोध पाहता २०२४ पासून दीक्षाभूमीच्या मुख्य सोहळ्याला राजकीय नेत्याला स्थान दिले गेले नाही. मात्र, यावेळी उत्तरप्रदेश येथील भंते विनाचार्य यांना निमंत्रण देण्यात आले आहे. महाबोधी विहाराच्या आंदोलनात त्यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले. त्यामुळे अशा व्यक्तींना दीक्षाभूमीवर बोलावू नये, यासाठी सोमवारी सायंकाळी आंदोलन करण्यात आले. यावेळी स्मारक समितीच्या काही सदस्यांच्या विरोधात घोषणाही देण्यात आल्या. यानंतर आंदोलकांच्या शिष्टमंडळाची स्मारक समितीच्या सदस्यांसोबत बैठक झाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## वाहन चोर गुन्हे शाखेच्या जाळयात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :
बजाजनगर हद्दीतील एका सोसायटीच्या पार्किंगमधून दुचाकी वाहन पळविणाऱ्या आरोपीला त्याच्या २ अल्पवयीन साथीदारांसह गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर पकडले. पोलिसांनी आरोपींकडून चोरीच्या दोन वाहनांसह एकूण दीड लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. आर्यन धीरज गायकवाड (१९) रा. बेसा रोड, अलंकारनगर चौक असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी फिर्यादी कमलाकर जागोबा जिभकाटे (६५) रा. गणेश सोसायटी, बजाजनगरच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला होता. गत २ सप्टेंबरच्या सकाळी कमलाकर यांनी त्यांची एमएच-३१/एएस-१८६९ क्रमांकाची दुचाकी सोसायटीच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. या दरम्यान अज्ञात आरोपीने सोसायटीच्या पार्किंगमध्ये प्रवेश करून त्यांची दुचाकी चोरून नेली. कमलाकर यांच्या तक्रारीवरून बजाजनगर पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला होता. दरम्यान गोपनिय माहितीच्या आधारावर पोलिसांनी चोरीचे वाहनाने फिरताना आर्यन व त्याच्या दोन अल्पवयीन साथीदारांना पकडले.

# आ.समीर मेघे यांच्या हस्ते मालकी हक्क पट्टे वाटप

## सर्वांसाठी घरे या धोरणांतर्गत घरकुल योजनेला नवी दिशा

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २९ :
छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत तसेच महाराष्ट्र शासनाच्या सेवा पंधरवाडा निमित्ताने सर्वांसाठी घरे या धोरणांतर्गत वाडी नगरपरिषद हद्दीतील बक्षी ले-आऊट येथील नागरिकांना सोमवार २९ सप्टेंबर रोजी दुपारी नगरपरिषद कार्यालयात आमदार समीर मेघे यांच्या हस्ते उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांच्या उपस्थित एकुण २४ लाभार्थ्यांना मालकी हक्क पट्ट्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार समीर मेघे होते. पट्टे मिळाल्यामुळे कुटुंबांना घराच्या मालकी हक्काचा दिलासा मिळून भविष्यातील सामाजिक व आर्थिक स्थैर्यासाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमात प्रास्ताविक करताना मुख्याधिकारी डॉ. धाबर्डे यांनी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री



आवास योजना, रमाई आवास योजना तसेच राज्य शासनाच्या घरकुल योजनांचा लाभ प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्याचे मनोगत व्यक्त केले. तर, प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ शेवटच्या माणसापर्यंत पोहोचावा यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे असे आवाहन आमदार समीर मेघे यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन जेष्ठ लिपीक योगेश जहागीरदार यांनी तर आभार उपमुख्याधिकारी गौरव गाडगे यांनी मानले. हा उपक्रम शासनाच्या घरकुल योजनेला नवी दिशा देणारा ठरणार असून कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नगररचना सहायक शुभम तारापुरे, धनश्री कोरे, आवास योजना अभियंता मयूर झाडे व इतर अधिकारीझकर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी डॉ. आंबेडकर नगर, टेकडी वाडी, गौतम नगर, इंदिरानगर आदी भागातील नागरिकही आगामी पट्टे वाटपाची आतुरतेने प्रतीक्षा करत असल्याचे दिसून आले.

यावेळी माजी नगरसेवक कैलास मंथापुरवार,केशव बांदरे, नरेंद्र मेंढे, दिनेश कोचे, आशिष नंदागवळी माजी नगरसेविका सरिता यादव,कल्पना सगदेव , अस्मिता मेश्राम, प्रज्ञा वासनिक, मंजुळा चौधरी,भाजपचे पुरुषोत्तम रागीट, माजी जि.प. सदस्य दिनेश बन्सोड, राष्ट्रवादीचे संतोष नरवाडे, राष्ट्रपाल वाघमारे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिट अॅन्ड रनमध्ये पादचाऱ्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :
अज्ञात वाहनाच्या चालकाने निष्काळजीपणे आणि भरधाव वाहन चालवून रस्त्याने पायदळ जात असलेल्या एका वृद्धाला जबर धडक दिली आणि पळून गेला. यात गंभीर जखमी वृद्धाचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना पारडी ठाण्यांतर्गत घडली. मृत वृद्धाचे वय ६० वर्षे असून त्यांचे नाव समजू शकले नाही.

रविवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास वृद्ध व्यक्ती नागपूर-भंडारा मार्गाने पायदळ जात होता. पारडीच्या नाका क्र. ५ जवळील पेट्रोल पंपजवळ अज्ञात वाहनाच्या चालकाने वृद्धाला जबर धडक दिली आणि पळून गेला. आसपासच्या लोकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पारडी पोलिस घटनास्थळी पोहोचले. जखमी वृद्धाला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सौंदर्यीकरणाची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :
उत्तर नागपूर प्रभाग क्र. ७ मधील इंदोरा चौकात (अॅड. सखाराम मेश्राम चौक) असलेल्या बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या पूणार्कृती पुतळ्याजवळ नुकताच 25 सप्टेंबर रोजी त्यांचा १०० वा जन्मदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी त्यांच्या कायार्चा गौरव करत, या ऐतिहासिक स्थळाचे सुशोभीकरण करण्याची जोरदार मागणी उपस्थित प्रशासन आणि स्थानिक प्रतिनिधींकरवी केली. अजय सहारे म्हणाले की, १९५६ च्या दशकात बॅरिस्टर साहेबांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'उजवा हात' म्हटले जात असे. ते बाबासाहेबांचे खरे राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक वारसदार होते. केशव लव्हात्रे यांनी माहिती दिली की, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी १९५८ ते १९६४, १९६६ ते १९७२ आणि १९७८ ते १९८४ या कालखंडात राज्यसभेचे सदस्य म्हणून काम पाहिले. यातील १९६९ ते १९७२ दरम्यान त्यांनी रा एसज्यसभेचे उपसभापती म्हणूनही कार्य केले.

यावेळी पुतळ्यासमोरील स्तंभावर बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जीवनावर शिलालेख कोरणे, तसेच भित्तीचित्र (म्युरल) तयार करून स्थळाचे सौंदर्यकरण करण्याची मागणी करण्यात आली. ही मागणी देवानंद पानतावणे, राजेश राऊत, प्रभू गजभिये, विनय घरडे, प्रशांत साखरे, हेमराज जांभुळकर, विलास नितनवरे, संजय फुलझेले, राजेश जांभुळकर यांनी संयुक्तरित्या केली आहे.

# शस्त्राच्या धाकावर पळविली दुचाकी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :
तरुणाला चाकूचा धाक दाखवून दुचाकी वाहन पळविणाऱ्या आरोपींना नंदनवन पोलिसांनी अटक केली. अटकेतील आरोपींमध्ये एका तडीपार गुंडाचा समावेश आहे. इमरान आणि शोएब पटेल अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. फियार्दी वैभव कानपुरे (२८) रा. जयभीम चौक हा रात्री ९.३० वाजताच्या सुमारास एमएच-३१/व्हीएस-३४९७ क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने घरी जात होता. रस्त्यात फोन आल्याने त्याने दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी केली आणि बोलत काही अंतरावर गेला. या दरम्यान त्याच्याच वस्तीत राहणारे इमरान आणि शोएब तेथे आले. त्यांनी वैभवची दुचाकी घेऊन जाण्यासाठी इंजन सुरू केले. आवाजाने वैभवचे लक्ष त्यांच्याकडे गेले. त्यांनी वाहन घेऊन जाण्यास विरोध केला असता आरोपींनी चाकू काढला. जिवे मारण्याची धमकी देत आरोपी त्याचे वाहन घेऊन गेले. वैभवने पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून दोन्ही आरोपींना अटक केली. चौकशीदरम्यान शोएब हा अभिलेखावरील गुन्हेगार असून याच वर्षी जुलै महिन्यात त्याला नागपूर जिल्ह्यातून तडीपार केल्याचे पुढे आले. तडीपार असतानाही तो शहरात परतून लुटमार करताना आढळला. पोलिसांनी आरोपींकडून चाकू आणि दुचाकी वाहन जप्त केले. पुढील तपास सुरू आहे.

## ५५३ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर :** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ५५३ वाहन चालकांवर कारवाई करून १,४०,५०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ५ व एनडीपीएस अन्वये २ अशा ७ प्रकरणात ७ आरोपीवर कारवाई करून ६,२४६ रुपयांचा माल जप्त केला. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहन चालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# माजी आमदार सुधीर पारवे शेतकऱ्याच्या बांधावर

## कुही तालुक्यात पिक पाहणी दौरा



■ (गजानन लांजेवार)
कुही, दि. २९ :
तालुक्यातील चार जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत तितूर, नवरगाव, चापेगडी, राजोला, वेलतूर, बोथली, मांढळ, रुयाड येथिल अतिवृष्टीग्रस्त भागाला भेट देऊन नुकसान झालेल्या शेती पिकांची व घरांची माजी आमदार तथा तालुका समन्वय समिती अध्यक्ष सुधीर पारवे यांनी तहसीलदार डॉ.अमित घाडगे, गट विकास अधिकारी डॉ.स्वप्निल मेश्राम, तालुका कृषी अधिकारी राजेश जारोंडे यांच्या समेत पाहणी केली.

यात सलग झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर उभ्या पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहे,शेती पिकांचे नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे तात्काळ करून घ्यावेत.

तसेच शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई मिळावी यासाठी त्वरीत कारवाई करून शासनाने ज्या निकषांनुसार मदत देणे अपेक्षित आहे ते निकष शिथिल करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अशा सुचना यावेळी पारवे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या. शेतकरी हे आपल्या राष्ट्राचे कणखर आधारस्तंभ आहेत. त्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणविस साहेब, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब आणि राज्य कृषी मंत्री आशिष जयस्वाल जी हे नागपूर जिल्ह्यातील असल्यामुळे अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार उभी असुन त्यांना ठाम पने मदत करेल असा विश्वास त्यांनी यावेळी माध्यमांशी बोलतानी व्यक्त केला.

यावेळी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष डॉ. शिवाजी सोनसरे, माजी पंचायत समिती उपसभापती ईस्तारी तळेकर, उपसभापती वामन श्रीरामे, सौरभ दंडारे, गजानन धांडे, हुकूमचंद लांबाडे, ईश्वर भारती, अतुल सोनसरे, राहुल भोयर, ग्यानीवंत साखरवाडे, अनिल कुकुडकर, डॉ.विनोद जुवार, तुकाराम शिवणकर, संजू निरगुरकर, संदीप सुखदेवे, राजेश तिवस्कर, स्वप्नील राऊत, धनपाल लोहारे यांच्या सह तालुक्यातील ग्रामसेवक, साहाय्यक कृषी अधिकारी, तलाठी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महासागर प्रभाग वार्ता**

# बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सौंदर्यकरणाची मागणी

**प्रमोद जांभूळकर,**
**नागपूर दि. २९**
उत्तर नागपूर प्रभाग क्र. ७ मधील इंदोरा चौकात (ऍड. सखाराम मेश्राम चौक) असलेल्या बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ नुकताच २५ सप्टेंबर रोजी त्यांचा १०० वा जन्मदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत, या ऐतिहासिक स्थळाचे सुशोभीकरण करण्याची जोरदार मागणी उपस्थित प्रशासन आणि स्थानिक प्रतिनिधींकरवी केली.
अजय सहारे म्हणाले की, १९५६ च्या दशकात बॅरिस्टर साहेबांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उजवा हात म्हटले जात असे. ते बाबासाहेबांचे खरे राजकीय,



सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक वारसदार होते. केशव लव्हात्रे यांनी माहिती दिली की, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी १९५८ ते १९६४, १९६६ ते १९७२ आणि १९७८ ते १९८४ या कालखंडात राज्यसभेचे सदस्य म्हणून काम पाहिले. यातील १९६९ ते १९७२ दरम्यान त्यांनी रा एसज्यसभेचे उपसभापती म्हणूनही कार्य केले. प्रवीण पाटील यांनी विचारले, हे स्थळ आंबेडकरी चळवळीचे केंद्र आहे. नागपूरमधील इतर चौकांची सजावट प्रभावी आहे, मात्र इथेच दुर्लक्ष का होत आहे?
यावेळी पुतळ्यासमोरील स्तंभावर बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जीवनावर शिलालेख कोरणे, तसेच भित्तीचित्र (म्युरल) तयार करून स्थळाचे सौंदर्यकरण करण्याची मागणी करण्यात आली.
ही मागणी देवानंद पानतावणे, राजेश राऊत, प्रभू गजभिये, विनय घरडे, प्रशांत साखरे, हेमराज जांभुळकर, विलास नितनवरे, संजय फुलझेले, नवीन शहारे, सत्यजित लांजेवार, डॉ. अभय शेंडे, भूपेश कांबळे, जयेश गेडाम, मंगेश नागबौद्ध, सचिन कांबळे, शैलेंद्र बेहेरे, विश्वजित डोंगरे, राज कोटांगळे, प्रसन्न सहारे, विवेक मेश्राम आणि राजेश जांभुळकर यांनी संयुक्तरित्या केली आहे.
स्थानिक नागरिक आणि आंबेडकरी कार्यकर्ते यांनी प्रशासनाकडे लवकरात लवकर ही मागणी मान्य करून स्मृतीस्थळाचे सुशोभीकरण हाती घेण्याचे आवाहन केले आहे.

# बुद्धास आयुर्वेदिक हॉस्पिटल समोर कचऱ्याचा ढिगारा नागरिक त्रस्त


**प्रमोद जांभूळकर,**
**नागपूर दि. ३०**
इंदोरा प्रभाग क्रमांक ९ मधील बुद्धास आयुर्वेदिक हॉस्पिटल समोरून सुदर्शन कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सध्या कचऱ्याचा मोठा ढिगारा साचलेला आहे. या परिसरात दुर्गंधी पसरली असून, पावसामुळे कचरा ओला झाल्याने डास व माशांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झालेला आहे. परिणामी रोगराई पसरण्याची गंभीर भीती निर्माण झाली आहे.
हा रस्ता म्हणजे विद्यार्थ्यांसह नागरिकांची नेहमीची वर्दळीची जागा आहे. विशेषतः धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त इंदोरा येथील मोठ्या बुद्ध विहारात हजारो नागरिक येत असतात. अशा वेळी स्वच्छतेचा अभाव ही सार्वजनिक



आरोग्याची मोठी समस्या ठरत आहे.
परिसरातील नागरिक व कार्यकर्त्यांनी महापालिकेच्या संबंधित विभागाचे लक्ष वेधले असून, तातडीने स्वच्छता करण्यात यावी, अशी जोरदार मागणी केली आहे. या मागणीसाठी पुढील नागरिकांनी पाठपुरावा केला आहे:राजेश राऊत, सुरेंद्र रामटेके, मनोज पाटील, राजेंद्र रामटेके, सूरज बोरकर, अश्व्जीत उके, रोशन गजभिये, किशोर डोंगरे, दिलीप गजभिये, राहुल डोंगरे, नितीन सोनटक्के, आनंद वासनिक, संदीप डोंगरे ,सरोज मेश्राम यांनी संयुक्तरित्या महानगर पालिका आशी नगर झोनच्या तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

# नागपूर शहरात शहीद भगत सिंह यांचा पुतळा उभारण्याची मागणी

**प्रमोद जांभूळकर,**
**नागपूर दि. २९**
आज देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे महान क्रांतिकारक शहीद भगत सिंह यांची जयंती संपूर्ण देशभर साजरी होत आहे. देशासाठी हसत-हसत फाशीच्या फासावर झुलणाऱ्या या अमर शहीदाला खरी श्रद्धांजली वाहण्यासाठी नागपूरातील नागरिकांनी महत्त्वाची मागणी पुढे केली आहे.
नागपूर शहर पुतळ्यांचे शहर म्हणून ओळखले जाते, मात्र दुर्दैव असे की आजपर्यंत या शहरात शहीद भगत सिंह यांचा एकही शासकीय पातळीवरील पुतळा उभारण्यात आलेला नाही. सध्या केवळ कॉटन मार्केट ते मोक्षधाम रोडदरम्यान एका ठिकाणी भगत सिंह यांचा फोटो असून, दरवर्षी तेथे माल्यार्पण करून त्यांना अभिवादन केले जाते.या पार्श्वभूमीवर, संजय फुलझेले, अजय सहारे, नवीन शहारे, प्रशांत साखरे, विनय घरडे, राजेश राऊत, राजरत्न टेंभुर्णे, राजेश पांडे, केशव लव्हात्रे, हरीश सहारे, संकेत



उपाध्ये, पद्माकर पाटील, देवानंद पानतावणे, सुधीर खोब्रागडे, शशिकांत जांभुळकर, दिनेश सहारे, हेमराज जांभुळकर, शैलेंद्र बेहेरे, अनुप राहाटे, शैलेश बोदेले,सरोज मेश्राम ,मनोहर राऊत आदी नागरिकांनी एकत्र येऊन नागपूर महानगरपालिकेला मागणी केली आहे की, मनपाने एकमताने ठराव पारित करून शहरात शहीद भगत सिंह यांचा भव्य व देखणा पुतळा उभारावा. ही मागणी पूर्ण झाली तर ती शहीद भगत सिंह यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरातील तरुण पिढीला प्रेरणा देणारा हा पुतळा भविष्यातील पिढ्यांसाठीही आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.